वायोतत्वाचे ॥ १९ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हे पांचही तेजाचे गुण । आतां आप सावधान । होऊन ऐका ॥ २० ॥ वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध । आतां पृथ्वी विशद । निरूपिली ॥ २१ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे गुण विशद । ऐसे हे पंचवीस तत्वभेद । सूक्ष्मदेहाचे ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तनुचतुष्टयनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ आवरणोदकीं हटकेश्वर । त्यासी घडे नमस्कार । महिमा अत्यंतचि थोर । तया पाताळलिंगाचा ॥ १ ॥ परंतु तेथें जाववेना । शरीरें दर्शन घडेना । विवेकें आणावें अनुमाना । तया ईश्वरासी ॥ २ ॥ सातां समुद्रांचे वेढे । उदंड भूमि पैलीकडे । सेवटीं तुटले कडे । भूमंडळाचे ॥ ३ ॥ सात समुद्र वोलांडावे । तेथें जाणें कैसें फावे । म्हणोन विवेकी असावे । साधुजन ॥ ४ ॥ जें आपणांस नव्हे ठावें । तें जाणतयास पुसावें । मनोवेगें तनें फिरावें । हें तों घडेना ॥ ५ ॥ जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें । ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ ६ ॥ मध्यें आहे भूमिचें चडळ । म्हणोनी आकाश आणी पाताळ । चडळ नस्तां अंतराळ । चहूंकडे ॥ ७ ॥ तयासी परब्रह्म म्हणावें । जें उपाधीवेगळें स्वभावें । जेथें दृश्यमायेच्या नांवें । शून्याकार ॥ ८ ॥ दृष्टीचें देखणें दृश्य । मनाचें देखणें भास । मनातीत निराभास । विवेकें जाणावें ॥ ९ ॥ दृश्य भास अवघा विघडे । विवेक तेथें पवाडे । भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्मदृष्टीचे ॥ १० ॥

पूर्ण निरसावें व आपला ब्रह्मानुभव घ्यावा (१–११). स्थूळ व सूक्ष्म देहांचीं तत्वें जीं मागील समासांत सांगितलीं आहेत तीं नीट समजून घ्यावीं, शोधून विवरावीं व मोकळें व्हावें (१२–२२). [द० १७, स० ९]

जंबुद्वीपादि सप्त द्वीपें मिळून पृथ्वी. पृथ्वीला क्षीर (दुधाचा) समुद्र, तसेच सुरा, घृत, दधि, इक्षु, क्षार (खाऱ्या पाण्याचा) व शुद्धजल अशा सप्त समुद्रांचीं आवरणें आहेत. त्यांमध्यें हाटकेश्वर नांवाचें शंकराचें पाताळलिंग आहे. त्यास येथूनच नमस्कार केला म्हणजे पोंचतो. त्याचा महिमा फार थोर आहे. पण तेथें जाववत नाहीं, देहानें त्याचें दर्शन घडत नाहीं, त्या ईश्वराला विवेकानें ध्यानांत आणावें. सप्तसमुद्रांच्या आवरणांच्या (वेढे) पलीकडे ही अफाट भूमि आहे, तेथें भूमंडळाचे कडे तुटलेले आहेत, सप्तसमुद्रांच्या पार जावें तेव्हां तेथें जाणें व्हावयाचें. पण तें शक्य नाहीं म्हणून विवेकी पुरुषांची संगत करावी. जें आपणास ठाऊक नाहीं त्याबद्दल जाणत्याला पुसावें, मनाच्या वेगानें देहासकट तर फिरतां येत नाहीं. म्हणून बसल्याजागींच ब्रह्मांड ध्यानीं आणून समाधानानें राहावें; कांकीं जें चर्मचक्षूला दिसत नाहीं तें ज्ञानचक्षूनेंच पाहिलें पाहिजे. मध्यें भूमीची चडळ (तुकडा) आहे म्हणून वर आकाश आणि खालीं पाताळ असे भेद केले आहेत, ती चडळ नाहीं अशी कल्पना केल्यास सर्वत्र एक अंतराळ (आकाश) भरलेलें आहे (१–७). तें आकाशच (त्याची उपाधि दूर करून पाहिलें म्हणजे) परब्रह्म होय, दृश्य सृष्टीचा तेथें कांहीं एक लाग नाहीं. दृष्टीनें पाहावें तें दृश्य व मनानें पाहावें तो भास; तें परब्रह्म दृश्यभासातीत आहे–इंद्रियें व मन यांहून तें पलीकडे आहे. तेथें विवेकानें जावें, पण सूक्ष्मदृष्टीनें आकाशापलीकडील केवळ ब्रह्माला पाहणारे असे ज्ञाते विरळाच असतात. बाऱ्यांश

वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलतां लक्ष्यांश जाणावा । निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेन योगें ॥ ११ ॥ नाना गुणांस आहे नाश । निर्गुण तें अविनाश । ढोबळ्याहून विशेष । सूक्ष्म देखणें ॥ १२ ॥ जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें । श्रवणमननें पडे ठावें । सकळ कांहीं ॥ १३ ॥ अष्टधेचे जिनस नाना । उदंड पाहातां कळेना । अवघें सगट पिटावेना । कोणीयेकें ॥ १४ ॥ सगट सारिखी स्थिती जाली । तेथें परीक्षाच बुडाली । चविनटानें कालविलीं । नाना अन्नें ॥ १५ ॥ टोणपा नव्हे गुणग्राहक । मूर्खास कळेना विवेक । विवेक आणी अविवेक । येकचि म्हणती ॥ १६ ॥ उंच नीच कळेना ज्याला । तेथें अभ्यासचि बुडाला । नाना अभ्यासें प्राणियांला । सुटका कैंची ॥ १७ ॥ वेड लागोन जालें वोंगळ । त्यासी सारिखेंचि वाटे सकळ । तें जाणावें बाष्कळ । विवेकी नव्हती ॥ १८ ॥ ज्यासी अखंड होतो नाश । त्यासीच म्हणती अविनाश । बहुचकीच्या लोकांस । काय म्हणावें ॥ १९ ॥ ईश्वरें नाना भेद केले । भेदें सकळ सृष्टी चाले । आंधळे परीक्षवंत मिळाले । तेथें परीक्षा कैंची ॥ २० ॥ जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव । गुणचि नाहीं गौरव । येईल कैचें ॥ २१ ॥ खरें खोटें येकचि जालें । विवेकानें काय केलें । असार सांडून सार घेतलें । साधुजनीं ॥ २२ ॥ उत्तम वस्तूची परीक्षा । कैसी घडे नतद्रक्षा । दीक्षाहीनापासीं दीक्षा । येईल कैंची ॥ २३ ॥ आपलेन वोंगळपणें । दिशा करून शौच्य नेणे । वेद शास्त्रें पुराणें । त्यास काय करिती ॥ २४ ॥

आहे तो वाचेनें बोलतां येतो, लक्ष्यांश न बोलतां जाणून घ्यावा, निर्गुण सगुणाच्या (मूळमायेच्या) आधारें जाणावें; गुण नाशवंत व निर्गुण अविनाश, स्थूलापेक्षां सूक्ष्मदृष्टीनें पाहणें विशेष आहे. जें चर्मचक्षूंला दिसत नाहीं तें श्रवणमननानें जाणावें. अष्टधा प्रकृतीपासून ही नानाजिनसी सृष्टि झाली पण ही सारी पाहणार कशी? पण सारे जिन्नस सारखेच समजूं नयेत. सारें सारखें सपाट समजणें हें परीक्षावंतांचें काम नाहीं. ज्याच्या जिभेला चव नाहीं तो साऱ्या अन्नाचा (पदार्थांचा) काला करितो (८–१५). मूर्खटोणपा आहे त्याला वर्म कळत नाहीं – त्याला विवेकानें सार वेगळें निवडावें हें समजत नाहीं. तो विवेक आणि अविवेक सारें एकच समजतो. उंच नीच (सार असार) कळत नाहीं हें अभ्यास नसल्याचें लक्षण होय. नाना अभ्यासें म्ह० बहुधाज्ञानानें (एकाचा अभ्यास न करील तर) प्राण्याला सुटकेचा मार्ग कोठून सांपडेल? जे वेडांत सारे सगट काला करितात ते बाष्कळ होत, विवेकी नव्हत. ज्याचा नित्यनाश होत आहे त्याला अविनाश म्हणतात अशा एकंकार करणाऱ्या (सर्वब्रह्मवादी) बहुचकीच्या लोकांस (बोहोचकांस, गोंधळ्यांस, सारासारशून्य मूर्खांस) काय म्हणावें ? ईश्वरानें नाना भेद केले आहेत. सृष्टि भेदामुळें चालली आहे, पण परीक्षक आंधळे मिळाले तर काय उपयोग? जेथें परीक्षा (सारासारविवेक) नाहीं अशा टोणप्यांचा (मूर्खांचा) समुदाय मिळाला तर त्यांजपाशीं गुण कोठून सापडायचे व गुणांवाचून गारव कसा व्हावयाचा ? टोणपे खरें खोटें एक करूं लागले तर तेथें विवेक कोणचा असणार ? म्हणून संत असार टाकून सार घेतात. करंट्याला (नतद्रष्ट) उत्तम वस्तूची परीक्षा कशी व्हावी ? स्वतः जो दीक्षाहीन आहे त्यापासून दुसऱ्याला दीक्षा (संप्रदायपरंपरेचा उपदेश) कशी मिळावी ? स्वतःच्या घाणेरडेपणानें ज्याला शुद्धि कशी करावी, शुचिर्भूत कसें व्हावें हें कळत नाहीं, त्याला

आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार । आचारविचार पैलपार । पाविजेतो ॥ २५ ॥ जें नेमकास न कळे । तें बाष्कळास कैंवी कळे । डोळस ठकती आंधळे । कोण्या कामाचे ॥ २६ ॥ पापपुण्य स्वर्गनरक । अवघेंच मानिलें येक । विवेक आणी अविवेक । काय मानावें ॥ २७ ॥ अमृत विष येक म्हणती । परी विष घेतां प्राण जाती । कुकर्में होते फजिती । सत्कर्में कीर्ति वाढे ॥ २८ ॥ इहलोक आणि परलोक । जेथें नाहीं साकल्य विवेक । तेथें अवघेंच निरर्थक । सकळ कांहीं ॥ २९ ॥ म्हणोनी सत्संगेंचि जावें । सच्छास्त्रचि श्रवण करावें । उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयत्नें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे टोणपसिद्धलक्षणनाम समास दशम ॥ १० ॥

वेद, शास्त्र, पुराणें काय करितील ? म्हणून आधीं आचार पाळावा, मग निर्मळ होऊन विचार पाहावा, आचार व विचार दोन्ही असतील तरच परतीर गांठतां येईल. नियमानें चालणारास (नेमक) जें कळणें दुर्घट तें नियमबाह्य वागणारांस (बाष्कळ) कसें कळेल ? डोळस अडखळतात तेथें आंधळे काय कामाचे ? पुण्य पाप, स्वर्ग नरक, विवेक अविवेक, एक कसे होतील ? अमृत विष एक कसें मानावें ? विषानें प्राण जातात हें स्पष्ट आहे. कुकर्मानें फजिती होते, सत्कर्मानें कीर्ति वाढते. इहलोक व परलोक या दोहींकडे विवेक नसेल तर सारें व्यर्थ होय, म्हणून सत्संग धरावा, सच्छास्त्र श्रवण करावें व नानाप्रयत्नेंकरून उत्तम गुणांचा अभ्यास करावा (१६–३०). [द० १७, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक अष्टादश बहुजिनसी ॥ १८ ॥

॥ श्रीराम ॥ तुज नमूं गजवदना । तुझा महिमाचि कळेना । विद्या बुद्धि देसी जनां । लहानथोरांसी ॥ १ ॥ तुज नमूं सरस्वती । चारी वाचा तुझेन स्फूर्ती । तुझें निजरूप जाणती । ऐसे थोडे ॥ २ ॥ धन्य धन्य चतुरानना । त्वां केली सृष्टिरचना । वेद शास्त्रें भेद नाना । प्रगट केले ॥ ३ ॥ धन्य विष्णु पाळण करिसी । येकांशें सकळ जीवांसी । वाढविसी वर्तविसी । जाणजाणों ॥ ४ ॥ धन्य धन्य भोळाशंकर । जयाच्या देण्यास नाहीं पार । रामनाम निरंतर । जपत आहे ॥ ५ ॥ धन्य धन्य इंद्रदेव । सकळ देवांचाहि देव । इंद्रलोकींचें वैभव । काय म्हणोनी सांगावें ॥ ६ ॥ धन्य धन्य यमधर्म । सकळ जाणती धर्माधर्म । प्राणिमात्रांचें वर्म । ठाईं पाडिती ॥ ७ ॥ व्यंकटेसी महिमा किती । भले उभ्यां अन्न खाती । वडे घिरडीं स्वाद घेती । अतळस आपालांचा ॥ ८ ॥ धन्य तूं वो बनशंकरी । उदंड शाखांचिया हारी । विवरविवरों भोजन करी । ऐसा कैंचा ॥ ९ ॥ धन्य भीम गोलांगुळा । कोरवड्यांच्या उदंड माळा । दहिंवडे खातां सकळां । समाधान होय ॥ १० ॥ धन्य तूं गा खंडेराया । भंडारें होय पिंवळी काया । कांदे भरीन रोटगे खाया । सिद्ध होती ॥ ११ ॥ धन्य तुळजाभवानी । भक्तां प्रसन्न होते जनीं । गुणवैभवास

बुद्धिदाता गजानन व परादिवाचांना स्फूर्ति देणारी शारदा यांना वंदन करून या समासांत अनेक उपास्य देवतांचे धन्यवाद गायिले आहेत. धन्य तो चतुर्मुख ब्रह्मा कीं ज्यानें सृष्टिरचना केली व भिन्नभिन्न प्रकारें वेदशास्त्रें प्रगट केलीं. एकांशानें जगताचें पाळण करणारा व जाणीव रूपानें सर्व जीवांना वाढविणारा विष्णु धन्य होय. भोळा, वदान्यवर रामनामजप अखंड करणारा शंकर धन्य होय. इंद्र व यम धन्य होत. यमधर्म धर्माधर्म यथार्थ जाणतात व प्राणिमात्रांचें वर्म प्रगट करितात. गिरीवर मोठमोठे लोक उभ्यानेंच प्रसाद भक्षण करितात, वड्याघिरड्यांचा स्वाद घेतात व सर्वत्र घमघमाट व परिमळ पसरणाऱ्या (अतळस) अशा स्वादिष्ट पक्वान्नांचें (आपालांचा) सेवन करितात. तो व्यंकटेश धन्य होय. शाखाहारी बनशंकरी धन्य होय. कोरवड्यांच्या (उडदाच्या पिठाचे वडे करितात त्यांच्या) माळा गळ्यांत घालणारा व दहींवड्यांचा प्रसाद सेवकांस देणारा वानर (गोलांगुल) मारुति धन्य होय. पालीचा किंवा जेजुरीचा खंडेराय धन्य होय. भंडारा उधळल्यानें त्याच्या भक्तांचे देह पिंवळे होतात व कांदे, भरीत व रोडगे भक्तगण मोठ्या आनंदानें खातात व अमर्याद गुणवैभव भोगणारी व भक्तांना देणारी तुळजा भवानी धन्य होय. धन्य तो पंढरपूरनिवासी पांडुरंग कीं

गणी। ऐसा कैंचा ॥ १२ ॥ धन्य धन्य पांडुरंग। अखंड कथेचा होतो धिंग। तानमानें रागरंग। नानाप्रकारीं ॥ १३ ॥ धन्य तूं गा क्षेत्रपाळा। उदंड जना लाविला चाळा। भावें भक्ति करितां फळा। वेळ नाहीं ॥ १४ ॥ रामकृष्णादि अवतार। त्यांचा महिमा अपार। उपासनेस बहुत नर। तत्पर जाले ॥ १५ ॥ सकळ देवांचें मूळ। तो हा अंतरात्माचि केवळ। भूमंडळीं भोग सकळ। त्यासीच घडे ॥ १६ ॥ नाना देव होऊन बैसला। नाना शक्तिरूपें जाला। भोक्ता सकळ वैभवाला। तोचि येक ॥ १७ ॥ याचा पाहावा विचार। उदंड लांबला जोजार। होती जाती देव नर। किती म्हणोनी ॥ १८ ॥ कीर्ति आणि अपकीर्ति। उदंड निंदा उदंड स्तुती। सर्वत्रांची भोगप्राप्ती। अंतरात्म्यासीच घडे ॥ १९ ॥ कोण देहीं काय करितो। कोण देहीं काय भोगितो। भोगी त्यागी वीतरागी तो। येकचि आत्मा ॥ २० ॥ प्राणी साभिमानें भुलले। देहाकडे पाहात गेले। मुख्य अंतरात्म्यास चुकले। अंतरीं असोनी ॥ २१ ॥ अरे या आत्मयाची चळवळ पाहे। ऐसा भूमंडळीं कोण आहे। अगाध पुण्यें अनुसंधान राहे। कांहीं येक ॥ २२ ॥ त्या अनुसंधानासरिसें। जळोनी जाईजे किल्मिषें। अंतरनिष्ठ ज्ञानी ऐसे। विवरोन पाहाती ॥ २३ ॥ अंतरनिष्ठ तितुके तरले। अंतरभ्रष्ट तितुके बुडाले। बाह्याकारें भरंगळले। लोकाचारें ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बहुदेवस्थाननिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ नेणपणें जालें तें जालें। जालें तें होऊन गेलें। जाणतेपणें वर्तलें। पाहिजे नेमस्त ॥ १ ॥ जाणत्याची संगती धरावी।

ज्याच्यापाशीं नाना प्रकारच्या तानमानवाद्यांसह हरिकथेचा रंग अखंड भरून राहिलेला असतो. क्षेत्रफळ (भैरव) हा अनेकींना आपल्या भजनीं लावणारा आहे. रामकृष्णादिकांचा महिमा तर अपार असून त्यांच्या उपासनेंत लाखों जन तत्पर आहेत (१–१५). भरतखंडांत अशा नानाविध उपासना चालू आहेत, पण या सर्व उपास्यांचा मूळपुरुष अंतरात्माच असून पूजादि सर्व भोग त्यालाच पावतात. सर्व देव व त्यांच्या शक्ति यांना मूळ अधिष्ठान अंतरात्मा असून सकळ वैभवांचा भोक्ता तोच आहे. देव आणि भक्त पुष्कळ झाले व आहेत त्यांचा विस्तार कोठवर करावा, पण स्तुतिनिंदा, कीर्तिअपकीर्ति, सर्व भोगांची प्राप्ति अंतरात्म्याला घडते. कांहीं देहांत तो कार्यकर्ता होतो, कांहीं देहांत भोगभोक्ता होतो, भोगी व त्यागी सर्व कांहीं तो आहे. प्राणी देहाकडे पाहतात व देहाभिमानी होतात. पण मुख्य चालक देव अंतरात्मा अंतरीं असून त्याला विसरतात हें नवल आहे. या अंतरात्म्याची सारी चळवळ पाहणारा कोण आहे ? अगाध पुण्य पदरीं असेल तरच त्याचें अनुसंधान राहतें. हें आत्मानुसंधान सर्व पापांचा नाश करितें म्हणून अंतर्निष्ठ ज्ञानी पुरुष त्यालाच विवरून पाहतात. अंतर्निष्ठ तेवढे तरतात व अंतर्भ्रष्ट (बहिर्मुख) हे बाह्य लोकोपचारांतच गुरफटून वाहतात (१६–२४). [द० १८, स० १]

नेणतेपणें आजवर झालें तें झालें, आतां यापुढें तरी जाणतेपणानें शिस्तवार वागण्याचा निश्चय करा, जाणत्याची

जाणत्याची सेवा करावी । जाणत्याची सद्बुद्धि घ्यावी । हळुहळू ॥ २ ॥ जाणत्यापासीं लेहों सिकावें । जाणत्यापासीं वाचूं सिकावें । जाणत्यापासीं पुसावें । सकळ कांहीं ॥ ३ ॥ जाणत्यास करावा उपकार । जाणत्यास झिजवावें शरीर । जाणत्याचा पाहावा विचार । कैसा आहे ॥ ४ ॥ जाणत्याचे संगतीनें भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें । जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥ ५ ॥ जाणत्यापासीं गावें गाणें । जाणत्यासीं वाजवणें । नाना आळाप सिकणें । जाणत्यापासीं ॥ ६ ॥ जाणत्याचे कांसे लागावें । जाणत्याचें औषध घ्यावें । जाणता सांगेल तें करावें । पथ्य आधीं ॥ ७ ॥ जाणत्यापासीं परीक्षा सिकणें । जाणत्यापासीं तालिम करणें । जाणत्यापासीं पोहणें । अभ्यासावें ॥ ८ ॥ जाणता बोलेल तैसें बोलावें । जाणता सांगेल तैसें चालावें । जाणत्याचें ध्यान घ्यावें । नाना प्रकारीं ॥ ९ ॥ जाणत्याच्या कथा सिकाव्या । जाणत्याच्या युक्ति समजाव्या । जाणत्याच्या गोष्टी विवराव्या । सकळ कांहीं ॥ १० ॥ जाणत्याचे पेंच जाणावे । जाणत्याचे पीळ उकलावे । जाणता राखेल तैसे राखावे । लोक राजी ॥ ११ ॥ जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग । जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥ १२ ॥ जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा । जाणत्याचा उलेख समजावा । न बोलतांचि ॥ १३ ॥ जाणत्याचें धूर्तपण । जाणत्याचें राजकारण । जाणत्याचें निरूपण । ऐकत जावें ॥ १४ ॥ जाणत्याचीं कवित्वें सिकावीं । गद्यें पद्यें वोळखावीं । माधुर्यवचनें समजावीं । अंतर्यामीं ॥ १५ ॥ जाणत्याचे पाहावे प्रबंद । जाणत्याचे वचनभेद । जाणत्याचे नाना संवाद । बरे शोधावे ॥ १६ ॥ जाणत्याची तीक्ष्णता । जाणत्याची सहिष्णुता । जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ॥ १७ ॥ जाणत्याची नाना कल्पना । जाणत्याची दीर्घ सूचना । जाणत्याची विवंचना । समजोन घ्यावी ॥ १८ ॥ जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक । जाणत्याचे गुण अनेक ।

संगती धरली म्हणजे जाणतेपणाचे सर्व गुण अनायासें प्राप्त होतात. जाणत्याची सेवा करावी, त्याची सद्बुद्धि शिकावी, त्यापाशीं लिहिणेंवाचणें शिकावें, त्याला सर्वकांहीं विचारून शंकासमाधान करून घ्यावें. जाणत्याच्या संगतींत कष्ट करायला व आनंदानें वर्तायला शिकावें. त्याची कांस धरावी. त्याच्या राहणीप्रमाणें वागावें. त्याच्या कथा, गोष्टी, युक्ति, बोलणें, चालणें, सर्व शिकावें, तो लोकांचे पीळपेंच कसे उकलतो, लोकांना राजी कसें राखतो, तें सर्व पाहावें. त्याचे स्फूर्तीचे

अवघेच घ्यावे ॥ १९ ॥ जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग । जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥ २० ॥ जाणत्याचें पाहावें ज्ञान । जाणत्याचें सिकावें ध्यान । जाणत्याचें सूक्ष्म चिन्ह । समजोन घ्यावें ॥ २१ ॥ जाणत्याचें अलिप्तपण । जाणत्याचें विदेहलक्षण । जाणत्याचें ब्रह्मविवरण । समजोन घ्यावें ॥ २२ ॥ जाणता येक अंतरात्मा । त्याचा काय सांगावा महिमा । विद्याकळागुणसीमा । कोणें करावी ॥ २३ ॥ परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद । तेणेंकरितां आनंद । उदंड होतो ॥ २४ ॥ परमेश्वरें निर्मिलें तें । अखंड दृष्टीस पडतें । विवरविवरों समजावें तें । विवेकीं जनीं ॥ २५ ॥ जितुकें कांहीं निर्माण जालें । तितुकें जगदेश्वरें निर्मिलें । निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधीं ॥ २६ ॥ तो निर्माण करितो जना । परी पाहों जातां दिसेना । विवेकबळें अनुमाना । आणीत जावा ॥ २७ ॥ त्याचें अखंड लागतां ध्यान । कृपाळुपणें देतो अशन । सर्वकाळ संभाषण । तदंशेंचि करावें ॥ २८ ॥ ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त । संसारापासुनी मुक्त । भक्तांस करी ॥ २९ ॥ उपासनेचे सेवटीं । देवां भक्तां अखंड भेटी । अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सर्वज्ञसंग-निरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ दुर्लभ शरीरीं दुर्लभ आयुष्य । याचा करूं नये नास । दास म्हणे सावकास । विवेक पाहावा ॥ १ ॥ न पाहातां उत्तम विवेक । अवघा होतो अविवेक । अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे ॥ २ ॥ हें आपलें आपण केलें । आळसें उदास नागविलें । वाईट संगतीनें बुडविलें । देखत-देखतां ॥ ३ ॥ मूर्खपणाचा अभ्यास जाला । बाष्कळपणें घातला घाला ।

प्रसंग, त्याचा साक्षेप, त्याचें धैर्य, त्याचे नानाविध रंग सर्व समजून घ्यावे. त्याचें पाठपाठांतर, त्याचें कवित्व, त्याचीं मधुर वचनें, त्याचे नाना लोकांशीं होणारे संवाद, त्याची तीक्ष्ण बुद्धि, त्याची सहिष्णुता, त्याचा दूरदर्शीपणा (दीर्घ सूचना), त्याचा अध्यात्मविवेक, त्याची भक्ति, योग, ज्ञान, ध्यान, अलिप्तपण, वैरगय—त्याचे सर्व गुण घ्यावेत (१–२२). जाणता एक अंतरात्मा आहे, त्याचे गुणानुवाद गावेत. त्या जगदीश्वरानें जें जें निर्माण केलें तें विवरून त्याहून त्याचें वेगळेंपण पाहावें. तो सर्व सांभाळतो. त्याचें ध्यान धरील तो भक्त; तो जगदुद्धार करितो (२२–३०). [स० १८, द० २]

नरदेह दुर्लभ व त्याचें आयुष्य दुर्लभ — म्हणून त्यांचा नाश करूं नये, तें व्यर्थ दवडूं नये, मुख्य विवेक पाहिजे. विवेकावांचून प्राणी दैन्यवाणा होय. आळसानें व कुसंगतीनें आपला आपण नाश करून घेतो. मूर्खपणाचा अभ्यास,

काम चांडाळ उठिला। तरुणपणीं ॥ ४ ॥ मूर्ख आळसी आणी तरुणा। सर्वांविषीं दैन्यवाणा। कांहीं मिळेना कोणा। काय म्हणावें ॥ ५ ॥ जें जें पाहिजे तें तें नाहीं। अन्नवस्त्र तेंही नाहीं। उत्तम गुण कांहींच नाहीं। अंतर्यामीं ॥ ६ ॥ बोलतां येना बैसतां येना। प्रसंग कांहींच कळेना। शरीर मन हें वळेना। अभ्यासाकडे ॥ ७ ॥ लिहिणें नाहीं वाचणें नाहीं। पुसणें नाहीं सांगणें नाहीं। नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं। बाष्कळपणें ॥ ८ ॥ आपणास कांहींच येना। आणी सिकविलेंही मानेना। आपण वेडा आणी सज्जना। बोल ठेवी ॥ ९ ॥ अंतरीं येक बाहेर येक। ऐसा जयाचा विवेक। परलोकाचें सार्थक। केसें घडे ॥ १० ॥ आपला संसार नासला। मनामध्यें प्रस्तावला। तरी मग अभ्यास केला। पाहिजे विवेकाचा ॥ ११ ॥ येकाग्र करूनियां मन। बळेंचि धरावें साधन। यत्नीं आळसाचें दर्शन। होऊंच नये ॥ १२ ॥ अवगुण अवघेचि सांडावे। उत्तम गुण अभ्यासावे। प्रबंद पाठ करीत जावे। जाड अर्थ ॥ १३ ॥ पदप्रबंद श्लोकप्रबंद। नाना धाटी मुद्रा छंद। प्रसंगज्ञानेंचि आनंद। होत असे ॥ १४ ॥ कोणे प्रसंगीं काय म्हणावें। ऐसें समजोन जाणावें। उगेंचि वाउगें सिणावें। कासयासी ॥ १५ ॥ दुसऱ्याचें अंतर जाणावें। आदर देखोन म्हणावें। जें आठवेल तें गावें। हें मूर्खपण ॥ १६ ॥ ज्याची जैसी उपासना। तेंचि गावें चुकावेना। रागज्ञाना ताळज्ञाना। अभ्यासावें ॥ १७ ॥ साहित्य संगीत प्रसंग मानें। करावीं कथेचीं घमशानें। अर्थांतर श्रवणमननें। काढीत जावें ॥ १८ ॥ पाठ उदंडचि असावें। सर्वकाळ उजळीत जावें।

बाष्कळपणाची वागणूक, अविवेकी तरुणपणा याचा परिणाम दैन्यांत होतो. जें जें पाहिजे तें तें न मिळणें याचें नांव दैन्य. अन्नवस्त्र नाहीं, उत्तम गुण नाहीं, बोलतां बसतां येत नाहीं, प्रसंग वेळ तर्कत नाहीं, शरीर व मन अभ्यासाकडे वळत नाहीं, लिहिणेंवाचणें किंवा सांगणेंपुसणें नाहीं, नियमितपणाचा अभ्यास नसून सारेंच वागणें बाष्कळपणाचें आहे. येत नाहीं आणि शिकत नाहीं, स्वतः वेडा असून सज्जनांना नांवें ठेवतो. आंत एक व बाहेर एक असा ज्याचा विवेक त्याला परलोकींचें सार्थक कसें घडावें? (१–१०). असो. अशा प्रकारें आपला संसार नासल्यावर एखाद्याला पश्चात्ताप झाला त[illegible]यानें विवेकाचा अभ्यास केला पाहिजे. मन एकाग्र करून बळेंच (हट्टानें, लक्ष प्रथम लागत नसलें तरी) साधन करावें व यत्न करीत असतांना आळस डोळ्यांसमोर येऊं देऊं नये. दुर्गुण सोडावा व सद्गुणांचा अभ्यास करावा. प्रबंध पाठ करावे, जाड (खोल, गहन) अर्थांचें मनन करावें. अनेक लक्षणांचे, वृत्तांतले अनेक श्लोक, पदें वगैरे पाठ करावींत. त्यांच्या प्रसंगांचें ज्ञान झाल्यानें चित्ताला आनंद होत असतो. कोणत्या प्रसंगीं काय म्हणावें हें तारतम्य ठेवावें. उगाच शिणूं नये. दुसऱ्याचें अंतःकरण जाणावें व श्रवणाचा आदर दिसला तरच म्हणावें, आठवेल तेंच गात सुटणें हें मूर्खत्व होय. ज्याला ज्या उपासनेची आवड आहे, त्याचेच गुणानुवाद त्यापुढें गावे, यांत चुकूं नये. ताल राग यांचा अभ्यास करावा. साहित्य, संगीत, प्रसंगमान यांच्या बळावर कीर्तनांत प्रेमसुखाची लयलूट (घमशानें – घमस्थानें, घमंडें द० १९, स० ७–१ पाहा) करावी. श्रवणमननानें अर्थांतर (अर्थांचें अंतर म्ह० रहस्य किंवा भिन्नभिन्न अर्थ) काढीत

सांगितले गोष्टीचें असावें । स्मरण अंतरीं ॥ १९ ॥ अखंड येकांत सेवावा । ग्रन्थमात्र धांडोळावा । प्रचीति येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहसिकवणनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ देहाकरितां गणेशपूजन । देहाकरितां शारदावंदन । देहाकरितां गुरु सज्जन । संत श्रोते ॥ १ ॥ देहाकरितां कवित्वें चालती । देहाकरितां अध्ययनें करिती । देहाकरितां अभ्यासिती । नाना विद्या ॥ २ ॥ देहाकरितां ग्रंथलेखन । नाना लिपीवोळखण । नाना पदार्थशोधन । देहाकरितां ॥ ३ ॥ देहाकरितां महाज्ञानी । सिद्ध साधु ऋषी मुनी । देहाकरितां तीर्थाटणीं । फिरती प्राणी ॥ ४ ॥ देहाकरितां श्रवण घडे । देहाकरितां मननीं पवाडे । देहाकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ॥ ५ ॥ देहाकरितां कर्ममार्ग । देहाकरितां उपासनामार्ग । देहाकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळीं ॥ ६ ॥ योगी वीतरागी तापसी । देहाकरितां नाना सायासी । देहाकरितां आत्मयासी । प्रगटणें घडे ॥ ७ ॥ इहलोक आणी परलोक । देहाकरितां सकळ सार्थक । देहेंविण निरर्थक । सकळ कांहीं ॥ ८ ॥ पुरश्चरणें अनुष्ठानें । गोरांजनें धूम्रपानें । सीतोष्ण पंचाग्नी साधणें । देहाकरितां ॥ ९ ॥ देहाकरितां पुण्यसीळ । देहाकरितां पापी केवळ । देहाकरितां अनर्गळ । शुचिष्मंत ॥ १० ॥ देहाकरितां अवतारी । देहाकरितां वेषधारी । नाना बंडें पाषांडें करी । देहाकरितां ॥ ११ ॥ देहाकरितां विषयभोग । देहाकरितां सकळ त्याग । होती जाती नाना रोग । देहाकरितां ॥ १२ ॥ देहाकरितां नवविधा भक्ती । देहाकरितां चतुर्विधा मुक्ती । देहाकरितां नाना युक्ती । नाना मतें ॥ १३ ॥ देहाकरितां दानधर्म । देहाकरितां नाना वर्म । देहाकरितां पूर्व कर्म । म्हणती जनीं ॥ १४ ॥ देहाकरितां नाना स्वार्थ । देहाकरितां नाना अर्थ । देहाकरितां होइजे व्यर्थ । आणी धन्य ॥ १५ ॥ देहाकरितां नाना कळा । देहाकरितां उणा आगळा । देहाकरितां जिव्हाळा ।

जावें. पाठांतर पुष्कळ असावें, उजळणी करून तार्जे ठेवावें. सांगितलेल्या गोष्टी किंवा अर्थ चित्तांत ठेवावेत, निरंतर अनंत ग्रंथ चाळीत असावेत व प्रचीती येईल तो अर्थ ध्यानीं धरावा (११–२०). [द० १८, स० ३]

देहाकरितां, (देह आहे म्हणून) मनुष्याचे प्रपंचांतील अथवा परमार्थांतील यच्चावत् व्यापार चाललेले असतात. गणेशशारदावंदन, नाना कवित्वें, अध्ययन, ग्रंथलेखन, सत्संग, तीर्थाटन, श्रवण, मनन, कर्मज्ञानउपासनादि मार्ग, इहलोक, परलोक, नाना साधनें, पुण्यशील व पापी, सन्मार्ग व असन्मार्ग, भोग, रोग, त्याग, भक्ति, मुक्ति, युक्ति, नाना विद्या व

भक्तिमार्गाचा ॥ १६ ॥ नाना सन्मार्गसाधनें । देहाकरितां तुटती बंधनें । देहाकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ॥ १७ ॥ देह सकळांमध्यें उत्तम । देहीं राहिला पुरुषोत्तम । सकळां घटीं आत्माराम । विवेकी जाणती ॥ १८ ॥ देहाकरितां नाना कीर्ती । अथवा नाना अपकीर्ती । देहाकरितां होती जाती । अवतारमाळिका ॥ १९ ॥ देहाकरितां नाना भ्रम । देहाकरितां नाना संभ्रम । देहाचेन उत्तमोत्तम । भोगिती पदें ॥ २० ॥ देहाकरितां सकळ कांहीं । देहाविण कांहीं नाहीं । आत्मा विरे ठाईं ठाईं । नव्हताच जैसा ॥ २१ ॥ देह परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरु । नाना रत्नांचा विचारु । देहाचेनी ॥ २२ ॥ देहाचेन गायनकळा । देहाचेन संगीतकळा । देहाचेन अंतर्कळा । ठाईं पडे ॥ २३ ॥ देव ब्रह्मांडाचें फळ । देह दुर्लभचि केवळ । परी या देहास निवळ । उमजवावें ॥ २४ ॥ देहाकरितां लहानथोर । करिती आपुलाले व्यापार । त्याहीमध्यें लहानथोर । कितीयेक ॥ २५ ॥ जे जे देह धरुनी आले । ते ते कांहीं करून गेले । हरिभजनें पावन जाले । कितीयेक ॥ २६ ॥ अष्टधा प्रकृतीचें मूळ । संकल्परूपचि केवळ । नाना संकल्पें देहफळ । घेऊन आलें ॥ २७ ॥ हरिसंकल्प मूळीं होता । तोचि फळीं पाहावा आतां । नाना देहांतरीं तत्वता । शोधितां कळे ॥ २८ ॥ वेलाचे मूळीं बीज । उदकरूप वेली समज । पुढें फळामध्यें बीज । मूळींच्या अंशें ॥ २९ ॥ मूळाकरितां फळ येतें । फळाकरितां मूळ होतें । येणेंकरितां होत जातें । भूमंडळ ॥ ३० ॥ असो कांहीं येक करणें । कैसें घडे देहाविणें । देह सार्थकीं लावणें । म्हणिजे बरें ॥ ३१ ॥ आत्म्याकरितां देह जाला । देहाकरितां आत्मा तगला । उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ॥ ३२ ॥ चोरून गुप्तरूपें करावें । तें आत्मयासी होतें ठावें । कर्तृत्व याचेन स्वभावें । सकळ कांहीं ॥ ३३ ॥ देहामध्यें आत्मा असतो । देह पूजितां आत्मा तोषतो । देह पीडितां

कळा ; तात्पर्य ' देहाकरितां सकळ कांहीं । देहाविण कांहीं नाहीं ' (१–२१). देह हें ब्रह्मांडवृक्षाचें फळ आहे. हरिसंकल्प जो मूळांत (मूळमायेंत) होता तोच फळांत (देहांत) पाहावा ! वेलाचें मूळ बीज व फळांतही बीज, मध्यें उदकरूप वेल असते. मूळापासून फळ व पुन्हां फळापासुन मूळ अशी ही सृष्टि चालली आहे. असो. देहावांचून कांहीं होत नाहीं म्हणून देह सार्थकीं लावावा. आत्म्यामुळें देह व देहामुळें आत्मा असा उभय योगानें सृष्टीचा कारभार चालला आहे. आत्म्याला चोरून गुप्त रूपानें कांहींएक करितां येत नाहीं, कारण कर्तृत्व सारें आत्म्याचें आहे. देहांत आत्मा असतो, देहाची पूजा केली

आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आतां ॥ ३४ ॥ देहावेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना । जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें ॥ ३५ ॥ उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर । तेथेंच पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं ॥ ३६ ॥ सगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण आंगीं लागतें । गाढवासी पूजितां कळतें । काय त्याला ॥ ३७ ॥ पूज्य पूजेसी अधिकार । उगेचि तोषवावे इतर । दुखवूं नये कोणाचें अंतर । म्हणिजे बरें ॥ ३८ ॥ सकळ जगदंतरींचा देव । क्षोभतां राहावया कोठें ठाव । जनावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं ॥ ३९ ॥ परमेश्वराचे अनंत गुण । मनुष्यें काय सांगावी खूण । परंतु अध्यात्मग्रंथश्रवण । होतां उमजे ॥ ४० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहदुर्लभनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ धान्य उदंड मोजिलें । परी त्या मापें नाहीं भक्षिलें । विवरल्याविण तैसें जालें । प्राणिमात्रासी ॥ १ ॥ पाठ म्हणतां आवरेना । पुसतां कांहींच कळेना । अनुभव पाहातां अनुमाना- । मध्यें पडे ॥ २ ॥ शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं । येर तीं अवघीं सांडावीं । येकीकडे ॥ ३ ॥ नांवरूप आवघें सांडावें । मग अनुभवास मांडावें । सार असार येकत्रि करावें । हें मूर्खपण ॥ ४ ॥ लेखकें कुळ समजवावें । किंवा उगेंच वाचावें । येणें दृष्टांतें समजावें । कोणीतरी ॥ ५ ॥ जेथें नाहीं

कीं आत्मा संतोष पावतो व देहाला पीडा दिली कीं आत्मा दुःख पावतो. देहावांचून पूजा करितां येत नाहीं व देहावांचून तिचा स्वीकार होत नाहीं, म्हणून ' जनीं जनार्दन ' ह्या भावनेनें प्राणिमात्रांस संतुष्ट करावें. पुण्यशील सत्पुरुषापासून प्राणिमात्रांस विचार कळतो, अनेकांना तो विचार पटतो व याप्रमाणें धर्मस्थापनेचें महत्कार्य होतें, म्हणून पूजेचा मुख्याधिकार अशा संतांचाच आहे. जनीं जनार्दन म्हणून सर्वांस संतोष द्यावा पण सरसकट सर्वांचीच पूजा करूं म्हटलें तर मूर्खत्व अंगीं येतें. गाढवाची पूजा केली तर त्या गाढवाला काय कळेल ? पूज्य पुरुषांचीच पूजा करावी व इतर जीवांस संतोष द्यावा. कोणाचेंही अंतर दुखवूं नये हें वर्म सांभाळलें पाहिजे. सर्व जगाच्या अंतरींचा देव जर आपण क्षोभविला तर आपल्याला राहायला जागा कोठें उरेल ? जनांवाचून जनास दुसरा आश्रय नाहीं. परमेश्वराचे गुण अनंत आहेत, ते मनुष्याला वाचेनें काय सांगतां येणार ? परंतु अध्यात्मग्रंथ श्रवण करावेत म्हणजे ते कळूं लागतात (२४–४०). [द० १८, स० ४]

एखाद्या पायलीनें खंडोगणती धान्य मोजलें जातें, पण त्यांतले चार दाणे कांहीं पायली स्वतः खात नाहीं– अगदीं असाच प्रकार शेंकडों ग्रंथ वाचून व हजारों श्लोक वगैरेंचें पाठांतर करून त्यांचें विवरण (मनन) न करणाराचा होतो (१). सर्ग, अध्याय, स्तबक कांहीं म्हणायला सांगा, एकदां म्हणायला लागला कीं थांबत नाहीं – पण त्यांतल्या कांहीं श्लोकांचा अर्थ विचारायला जा कीं याला कांहीं कळत नाहीं हें समजून येतें; अनुभव कसचा – अनुमानिक (शाब्दिक) ज्ञानांतच डुबून जातो. सरसकट पाठ करणें हें वेडेपण होय. शब्दरत्नें परीक्षून घ्यावीं; प्रत्यय देणारीं तेवढीं लक्षांत ठेवावीं, बाकीचीं जिथल्या तेथें ठेवून द्यावीं. नामरूप टाकून देऊन अनुभव घ्यावा, सार व असार एकच करणें मूर्खपणाचें होय. लेखकानें लिहिलेल्या गोष्टींचा अर्थ समजून घ्यावा, उगीच अर्थशून्य वाचण्यांत कांहीं अर्थ नाहीं. स्वच्छ समजावून

समजावीस । तेथें आवघी कुसमुस । पुसों जातां वसवस । वक्ता करी ॥ ६ ॥ नाना शब्द येकवटिले । प्रचीतीवीण उपाव केले । परी ते अवघेचि व्यर्थ गेले । फडप्रसंगीं ॥ ७ ॥ पसेवरी वैरण घातलें । तांतडीनें जातें वोढिलें । तेणें पीठ बारिक आलें । हें तों घडेना ॥ ८ ॥ घांसामागें घांस घातला । अवकाश नाहीं चावायाला । अवघा बोकणा भरिला । पुढें कैसें ॥ ९ ॥ ऐका फडनिसीचें लक्षण । विरंग जाऊं नेदी क्षण । समस्तांचें अंतःकरण । सांभाळीत जावें ॥ १० ॥ सूक्ष्म नामें सुखें घ्यावीं । तितुकीं रूपें वोळखावीं । वोळखोन समजवावीं । श्रोतयांसी ॥ ११ ॥ समस्या पुरतां सुखी होती । श्रोते अवघे आनंदती । अवघे क्षणक्षणा वंदिती । गोसावियासी ॥ १२ ॥ समस्या पुरतां वंदिती । समस्या न पुरतां निंदिती । गोसांवी चिण चिण करिती । कोण्या हिशेबें ॥ १३ ॥ शुद्ध सोनें पाहोन घ्यावें । कसीं लावुनी तावावें । श्रवण-मननें जाणावें । प्रत्ययासी ॥ १४ ॥ वैद्याची प्रचीत येना । व्यथा परती होयेना । आणी रागेजावें जना । कोण्या हिशेबें ॥ १५ ॥ खोटें कोठेंचि चालेना । खोटें कोणास मानेना । याकारणें अनुमाना । खरें आणावें ॥ १६ ॥ लिहिणें न येतां व्यापार केला । कांहीं येक दिवस चालिला । पुसतां सुर-नीस भेटला । तेव्हां खोटें ॥ १७ ॥ सर्व अवघें हिशेबीं ठावें । प्रत्यय साक्षीनें बोलावें । मग सुरनीसें काय करावें । सांगाना कां ॥ १८ ॥ स्वयें आपणचि गुंते । समजावीस कैसी होते । नेणतां कोणीयेक ते । आपदों लागती ॥ १९ ॥ बळेंविण युद्धास गेला । तो सर्वस्वें नागवला । शब्द

देतां येत नाहीं तेथें सारा असंतोष असतो, वक्त्याला कोणीं अर्थ विचारला तर तो वसकन् अंगावर येतो. पुष्कळ शब्द घोकले पण प्रचीतीवांचून त्यांचा उपयोग काय ? आपत्काळीं किंवा सभाप्रसंगीं (फड) ते व्यर्थ जातात. जात्यांत पसाभर वैरण घालून घाईनें जातें फिरवलें तर भरड पीठ पडेल, बारीक येणार नाहीं, दांतांखालीं नीट न चावतां बोकणे भरीत कोणी आधाशी बसला तर त्या जेवण्याचा कांहीं एक उपयोग नाहीं. एक क्षणही स्वानंदाशिवाय (विरंग) जाऊं देत नाहीं, सर्वांचीं अंतःकरणें राजी राखतो तो फडणीस (फडा—सभा) किंवा सभानायक खरा. अध्यात्मशास्त्रांत सूक्ष्म शब्द वारंवार येतात, त्यांचा बिनचूक अर्थ ध्यानांत आणून तो श्रोत्यांच्या गळीं उतरवावा. शंका—(समस्या) समाधान झाल्यानें श्रोत्यांचीं मनें प्रसन्न होतात व वक्त्याचे क्षणोक्षणीं ते धन्यवाद गातात ; नाहीं तर निंदितात व वक्ता फणफण करितो. (२–१३). सोनें शुद्ध पाहून घ्यावें, कसीं लावून तापवावें, तसें श्रवणमननानें अनुभवरूप व्हावें. वद्याची प्रचीति आली नाहीं, रोग गेला नाहीं तर मग कोणत्या आधारावर त्यानें रागवावें ? ह्या जगांत खोटें कोठच चालत नाहीं, खोटें कोणालाही मानवत नाहीं, म्हणून खरें समजवावें. स्वतः लिहितां येत नसून व्यापार केला तर कांहीं दिवस निभेल. पण हिशेब तपासनीस भेटल्याबरोबर साऱ्या चुका बाहेर येतील. हिशेब करितांना चुका बाहेर आल्या, लेखांचा पुरावा (प्रत्यय) व साक्षीही (लेखक वगैरे) बोलूं लागले (सत्य सांगूं लागले), मग सुरनीस दोष ठेविल्याशिवाय कसा राहील ? स्वतःच चुकलो

ठेवावा कोणाला । कोणें कैसा ॥ २० ॥ जें प्रचीतीस आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें । अनुभवेंविण जीं उत्तरें । तीं फलकटें जाणावीं ॥ २१ ॥ सिकवूं जातां राग चढे । परंतु पुढें आदळ घडे । खोटा निश्चय तात्काळ उडे । लोकांमध्यें ॥ २२ ॥ खरें सांडुनी खोटें घेणें । भकाघेसं काय उणें । त्रिभुवनीं नारायणें । न्याय केला ॥ २३ ॥ तो न्याय सांडितां सेवटीं । अवघें जगचि लागे पाठीं । जनीं भांडभांडों हिंपुटी । किती व्हावें ॥ २४ ॥ अन्यायें बहुतांस पुरवलें । हें देखिलें ना ऐकिलें । वेडें उगोंचि भरीं भरलें । असत्याचे ॥ २५ ॥ असत्य म्हणिजे तेंचि पाप । सत्य जाणावें स्वरूप । दोहींमध्यें साक्षेप । कोणाचा करावा ॥ २६ ॥ मायेमध्यें बोलणें चालणें साचें । माया नस्तां बोलणें कैंचें । याकारणें निशब्दाचें । मूळ शोधावें ॥ २७ ॥ वाच्यांश जाणोनी सांडावा । लक्ष्यांश विवरोन घ्यावा । याकारणें निशब्द मूळचा गोंवा । आडळेना ॥ २८ ॥ अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष । सांडून अलक्षीं लावावें लक्ष । मननसीळ परम दक्ष । तोचि हें जाणे ॥ २९ ॥ नाना भूस आणि कण । येकचि म्हणणें अप्रमाण । रस सांडूनी चोवडिया कोण । शाहाणा सेवी ॥ ३० ॥ पिंडीं नित्यानित्यविवेक । ब्रह्मांडीं सारासार अनेक । सकळ शोधूनियां येक । सार घ्यावें ॥ ३१ ॥ मायेकरितां कोणीयेक । अन्वय आणि व्यतिरेक । ते माया नस्तां विवेक । कैसा करावा ॥ ३२ ॥ तत्वें तत्व सर्व शोधावें । महावाक्यीं प्रवेशावें । आत्मनिवेदनें पावावें । समाधान ॥ ३३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करंटपरीक्षानिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

गुंतून राहिला तर त्याची समजूत कोणीं पाडावी ? व ती पडली नाहीं म्हणजे कष्टी होतो. फौजफांटा नसतां कोणी युद्धाला गेला तर फजीत पावणारच, त्यांत दोष दुसऱ्याचा नाहीं. जें प्रत्ययाला येतें तें अत्यंत आदरानें घ्यावें, अनुभवावीण बोल फोल होत. कोणी शिकवायला लागलें तर राग येतो, पण न शिकलें तर पुढें अद्दल घडते, खोट्या गोष्टी लोकांत तात्काळ उघडकीस येतात. खरें टाकून कोणी बळेंच खोटें घेऊं लागला व हवें तें बहकूं लागला तरी सृष्टींत न्याय करायला परमेश्वर बसलाच आहे ना ? न्याय सोडल्यास सारें जग पाठीं लागून भंडावून सोडील, मग लोकांशीं भांडभांडून याला शीण मात्र होईल. अन्याय बहुजनसमाजास खपतो असें कधीं ऐकण्यांत किंवा पाहण्यांत नाहीं. वेडे लोक खोट्याचा पक्ष घेऊन उगाच भांडतात (१४–२५). असत्य म्हणजेच पाप, सत्य तें ब्रह्मस्वरूप होय, दोहोंमध्यें कोणाचा पक्ष धरावा तें पाहावें. बोलणें चालणें सारें मायेंतलें आहे, मायेच्या पलीकडे बोलणें कसचें ? म्हणून निःशब्दाचें मूळ (परब्रह्म) शोधावें – वाच्यांश जाणून टाकावा, लक्ष्यांश विवरून घ्यावा, म्हणजे निःशब्दाचा संशय, भ्रम (गोंवा) राहणार नाहीं. अष्टधाप्रकृति हा पूर्वपक्ष – तो विवेकानें सांडून अलक्ष्य ब्रह्माच्या ठिकाणीं लक्ष लावावें. जो अखंड सावध व मनन करील त्यालाच हें कळेल. भूंस व कण एकच हें म्हणणें वेडेपण होय, रस सोडून चिपाडें कोणता शहाणा घेईल ? नित्यानित्यविवेकानें पिंड व सारासारविचारानें ब्रह्मांड याप्रमाणें पिंडब्रह्मांड हें असार टाकून सार (परब्रह्म) घ्यावें. मायेच्या निरसनासाठीं अन्वय व व्यतिरेक पाहायचा, मायानिरास झाल्यावर मग या विवेकाचें कारण उरत नाहीं. तत्त्वानें तत्त्वाचा झाडा करून महावाक्यांत (तत्वमसि) प्रवेशावें व आत्मनिवेदनभक्तीनें परम समाधान पावावें (२६–३३). [द० १८, स० ५]

॥ श्रीराम ॥ नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें । विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारीजे ॥ १ ॥ शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज । अंतरीं नस्तां चातुर्यबीज । कदापी शोभा न पवे ॥ २ ॥ तुंड हेंकाड कठोरवचनी । अखंड तोले साभिमानी । न्याय नीति अंतःकरणीं । घेणार नाहीं ॥ ३ ॥ तऱ्हे सीघ्रकोपी सदा । कदापि न धरी मर्यादा । राजकारणाच्या संवादा । मिळोंचि नेणे ॥ ४ ॥ ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं । पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावे ॥ ५ ॥ समयासारिखा समयो येना । नेम सहसा चालेना । नेम धरितां राजकारणा । अंतर पडे ॥ ६ ॥ अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें । हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ॥ ७ ॥ बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडिले तट । कोणीयेकाचा सेवट । जाला पाहिजे ॥ ८ ॥ बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी । परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ ९ ॥ अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना । परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ १० ॥ समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान । निश्चळ करूनियां मन । लोक असती ॥ ११ ॥ म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसाचें माजलें बंड । याकारणें अखंड । सावधान असावें ॥ १२ ॥ सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारु । तया पुरुषाचा विचारु । विरळा जाणे ॥ १३ ॥ न्यायनीति विवेकविचार । नाना प्रसंगप्रकार । परीक्षणें परांतर । देणें

(अफझुलखानाचा वध करून शिवाजीमहाराज श्रीसमर्थांच्या दर्शनास आले असतां हा समास सांगितला.)

वस्त्रालंकारांनीं शरीर भूषवितात तसें विवेक, विचार व राजकारण यांनीं अंतर शृंगारावें. शरीर सुंदर, सतेज व वस्त्रभूषणांनीं शोभविलेलें असलें तरी अंतरीं चातुर्य नसेल तर त्याला कांहीं शोभा येत नाहीं (१–२). तोंडाळ, हेंकट (हट्टवादी), कठोर बोलणारा, अहंकाराच्या डौलांत राहणारा, न्यायनीतीला न जुमानणारा, तऱ्हेवाईक, झट्दिशीं रागावणारा, राजकारणाच्या कामांत इतरांशीं मिळून न जाणारा, लबाड (लौंद), बेइमानी, खोटा, पापी, परपीडाकारक (अपस्मार) असा मनुष्य राक्षसच समजावा (व त्याला वाऱ्याशीं उभें राहूं देऊं नये). प्रसंगासारखा प्रसंग येत नाहीं म्ह० नित्य नवे नवे प्रसंग उभे राहतात, नित्यनेम चालत नाहींत, नियमांच्या बंधांत फार राहूं लागल्यास राजकारणांत व्यत्यय येतात. अति सर्वत्र वर्जावें, प्रसंगाप्रमाणें चालावें; विवेकी कार्यकर्त्या पुरुषानें हटनिग्रहांत पडूं नये. हट्ट धरिले कीं तट उभे राहिलेच व ते उभे राहिले तर कोणतीच गोष्ट तडीस लागत नाहीं (३–८). असो. ईश्वर तुमचा कैवारी आहे व विशेषतः तुळजाभवानीच्या प्रेमांतले तुम्हीं आहांत, तथापि विचारानेंच कार्य करावें. निरंतर सावधान असावें (गाफीलपणा करूं नये), अधिक काय सांगायचें आहे म्हणा, तथापि कांहीं निश्चय ठेवला पाहिजे. थोरांपाशीं अनेक लोक असतात. त्यांच्याविषयीं आपलेपणा राखला पाहिजे म्हणजे तेहि चंचलपणा सोडून कायमचे टिकून राहतात. हे म्लेंच्छ अतिशय दुष्ट असून त्यांचें फार दिवसांचें बंड माजलें आहे, म्हणून अत्यंत सावध असावें. ईश्वर सर्वकर्ता असून त्यानें ज्याचा अंगीकार केला म्ह. पक्ष घेतला त्या पुरुषाचा विचार फार थोड्या लोकांस कळतो (९–१३). यशकीर्तिप्रताप आपल्या कर्तृत्वाचें फळ आहे असें

ईश्वराचें ॥ १४ ॥ महायत्न सावधपणें । समई धारिष्ट धरणें । अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥ यश कीर्ती प्रताप महिमा । उत्तम गुणांसी नाहीं सीमा । नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥ देव ब्राह्मण आचार विचार । कितेक जनांसी आधार । सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥ येहलोक परलोक पाहणें । सावधानपणें राहणें । बहुत जनांचें साहणें । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥ देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहणें । बहु जनांसी पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १९ ॥ धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ २० ॥ उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक । धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ २१ ॥ सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार । जेणें पाविजे पैलवार । अरत्रपरत्रींचा ॥ २२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे उत्तमपुरुषनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ जनाचा लालची स्वभाव । आरंभींच म्हणती देव । म्हणिजे मला कांहीं देव । ऐसी वासना ॥ १ ॥ कांहींच भक्ती केली नस्तां । आणी इच्छिती प्रसन्नता । जैसें कांहींच सेवा न करितां । स्वामीस मागती ॥ २ ॥ कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं । केल्यावीण होत नाहीं । साध्य जनीं ॥ ३ ॥ आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें । कष्टाकडे चुकावितें । हीन जन ॥ ४ ॥ आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।

मनांत न आणतां हें 'ईश्वराचें देणें' आहे असें समजणें योग्य आहे—न्यायनीतीची आवड असणें, विवेकविचार जागृत असणें, प्रसंगानुसार वागतां येणें, परांतरपरीक्षा असणें हें 'ईश्वराचें देणें' आहे. सावधपणानें महायत्न (मोठाल्लीं पराक्रमाचीं कृत्यें) करणें, प्रसंगीं धारिष्ट धरणें, लोकोत्तर कार्यें अंगावर घेऊन पार पाडणें हें 'ईश्वराचें देणें' आहे. यशकीर्तिप्रतापमहिमा अलौकिक असणें, निरुपम सद्गुण अंगीं असणें, देवब्राह्मण व आचारविचार यांविषयीं प्रेमादर वाटणें, अनेक जनांस आधार होणें, सर्वकाळ परोपकारांत निमग्न असणें, प्रपंचपरमार्थाचा विचार पाहणें, अखंड सावध राहणें, बहुत जनांची उपाधि सोसणें, देवब्राह्मणांचा पक्ष उचलणें, बहुजनांस पाळणें—हें सर्व 'ईश्वराचें देणें' आहे. धर्मस्थापना करणारे पुरुष ईश्वराचे अवतार होत; असे अवतार मागें झाले, आतां आहेत व पुढेंही होतील, तथापि असे महात्मे जन्मास येणें हें 'ईश्वराचें देणें' आहे. गुणग्राहकता, तीक्ष्ण तर्कबुद्धि, स्वच्छ विवेक व जाज्वल्य धर्मबुद्धि हे पुण्यश्लोकाच्या अंगचे गुण आहेत, ही देवाचीच देणगी आहे. (इहलोकींच्या व्यवहाराच्या) तजविजी नित्यानित्यविवेक व सारासारविचार यांच्या योगानें इहलोक व परलोक (प्रपंच व परमार्थ) दोन्ही यथार्थ साधणें—हा सर्व गुणांत सारभूत गुण होय (१४–२२). [द० १८, स० ६]

माणसांचा स्वभाव लालची (लोभी) असतो, ते प्रथमच 'देव' म्हणतात तेव्हां मला कांहीं 'देव' म्ह० द्यावें अशी पोटांत वासना असते. धन्याची सेवा न करितां त्यानें जसें पगार मागणें तसेंच देवाची भक्ति न करितां त्याचा प्रसाद मागणें वेडेपणाचें होय. कष्ट केल्यावांचून फळ मिळत नाहीं, कष्टावांचून राज्य नाहीं, केल्यावांचून कांहींच साध्य होत नाहीं. आळसानें कार्यभाग नासून जातो हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे. कष्टाचें दुःख सोसल्यावरच सुखाचें फळ मिळतें, जे आधीं

आधीं आळसें सुखावती। त्यां पुढें दुःख ॥ ५ ॥ येहलोक अथवा परलोक। दोहींकडे सारिखाचि विवेक। दीर्घसूचनेचें कौतुक। कळलें पाहिजे ॥ ६ ॥ मेळविती तितुकें भक्षिती। ते कठीण काळीं मरोन जाती। दीर्घसूचनेनें वर्तती। तेचि भले ॥ ७ ॥ येहलोकींचा संचितार्थ। परलोकींचा परमार्थ। संचितेंवीण व्यर्थ। जीताचि मेलें ॥ ८ ॥ येकदां मेल्यानें सुटेना। पुन्हां जन्मोजन्मीं यातना। आपणास मारी वांचविना। तो आत्महत्यारा ॥ ९ ॥ प्रतिजन्मीं आत्मघात। कोणें करावें गणीत। याकारणें जन्ममृत्य। कैंवी चुके ॥ १० ॥ देव सकळ कांहीं करितो। ऐस प्राणिमात्र बोलतो। त्याचे भेटीचा लाभ तो। अकस्मात जाला ॥ ११ ॥ विवेकाचा लाभ घडे। जेणें परमात्मा ठाईं पडे। विवेक पाहतां सांपडे। विवेक जनीं ॥ १२ ॥ देव पाहतां आहे येक। परंतु करितो अनेक। त्या अनेकास येक। म्हणों नये कीं ॥ १३ ॥ देवाचें कर्तृत्व आणि देव। कळला पाहिजे अभिप्राव। कळल्याविण कितेक जीव। उगेच बोलती ॥ १४ ॥ उगेच बोलती मूर्खपणें। शाहाणपण वाढायाकारणें। तृप्तिलागीं उपाव करणें। ऐसें जालें ॥ १५ ॥ जेहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून ठेले। येर ते बोलतचि राहिले। करंटे जन ॥ १६ ॥ करंट्याचें करंट लक्षण। समजोन जाती विचक्षण। भल्याचें उत्तम लक्षण। करंट्यास कळेना ॥ १७ ॥ त्याची पैसावली कुबुद्धि। तेथें कैंची असेल शुद्धी। कुबुद्धि तेचि सुबुद्धी। ऐसी वाटे ॥ १८ ॥ मनुष्य शुद्धीस सांडावें। त्याचें काय खरें मानावें। जेथ विचाराच्या नांवें। सुन्याकार ॥ १९ ॥ विचारें यहलोक परलोक। विचारें होतसे सार्थक।

आळसानें सुखावतात त्यांना पुढें दुःखच भोगावें लागतें. प्रपंचांत अथवा परमार्थांत दोहींकडे विवेक पाहिजे, दीर्घसूचना (पुढें होणारें आधींच समजणें) पाहिजे. मिळवितात तितकें खाऊन टाकतात त्यांना बिकट प्रसंगीं मरायची पाळी येते म्हणून जे दीर्घसूचनेनें वागतात तेच शहाणे खरे. इहलोकीं धनादि संचय पाहिजे, परलोकासाठीं परमार्थ जोडला पाहिजे, संचितावांचून मनुष्य जिवंत असून मेल्यासारखाच होय. एकदां मरून भागत नाहीं, जन्ममरणाच्या यातना सुटत नाहींत; जो आपणास मारतो-वांचवीत नाहीं तो आत्मघातकी होय. प्रत्येक जन्मीं आत्मघात करितो त्याला काय म्हणावें ? म्हणून जन्ममरणाच्या यातना कशा चुकतील याचा विचार करावा. सर्व कांहीं देव करितो असें सर्व बोलतात, पण त्या देवाचा लाभ जोडला पाहिजे. विवेकाच्या योगानें परमात्मा जोडतो. देव आहे एक व त्या एकापासून अनेक होतात. पण अनेक म्हणजेच एक नव्हे, एक ओळखला पाहिजे. देव (अंतरात्मा) व देवाचें कर्तृत्व याचा नीट विचार केला पाहिजे, देव कळल्याशिवाय लोक देवाबद्दल उगीच बोलत असतात. ते मूर्खपणानें शहाणपण मिरविण्यासाठीं बोलतात, पण तृप्तीसाठीं उपाय (कष्ट) केले पाहिजेत हें उघड आहे. कष्ट करणारे भाग्य भोगून जातात व करंटे बोलतच राहतात. करंट्याचें करंटपण कशांत आहे हें शहाणे ओळखतात, शहाण्याचें शहाणपण कोठें आहे हें मात्र करंट्यास कळत नाहीं. करंट्याची दुर्बुद्धि असते व तीच त्याला सद्बुद्धि आहे असें वाटत असतें, दुर्बुद्धि वाढल्यावर शुद्धि कोठून असणार ? ज्या

विचारें नित्यानित्यविवेक । पाहिला पाहिजे ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जनस्वभावनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ ब्रह्म निराकार निश्चळ । आत्मा सविकार चंचळ । तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥ देवाचा ठावचि लागेना । येक देव नेमस्त कळेना । बहुत देवीं अनुमानेना । येक देव ॥ २ ॥ म्हणोनी विचार असावा । विचारें देव शोधावा । बहुत देवांचा गोंवा । पडोंचि नये ॥ ३ ॥ देव क्षेत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला । पृथ्वीमध्यें दंडक चालिला । येणें रीती ॥ ४ ॥ नाना प्रतिमादेवांचें मूळ । तो हा क्षेत्रदेवचि केवळ । नाना क्षेत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥ ५ ॥ क्षेत्रदेव पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा । तंतु लागला मूळाचा । अवताराकडे ॥ ६ ॥ अवतारी देव संपले । देह धरुनी वर्तोन गेले । त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ७ ॥ त्या तिही देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहातां । कर्ता भोक्ता तत्वता । प्रत्यक्ष आहे ॥ ८ ॥ युगानयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक । हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पाहावा ॥ ९ ॥ आत्मा वर्तवितो शरीर । तोचि देव उत्तरोत्तर । जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी ॥ १० ॥ तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती । प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ११ ॥ मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडा पाणी । उगेंचि वणवण हिंडोनी । काय होतें ॥ १२ ॥ ऐसा ज्यासी विचार कळला । तेथें सत्संग

मनुष्याची शुद्धि गेली त्याचें काय खरें मानावें ? विचाराचें तेथें पूज्यच पडलें असतें ! विचारानें इहलोक व परलोक साधतात, विचारानें नित्यानित्यविवेक पाहावा (१–२०). [द० १८, स० ७]

ब्रह्म निर्विकार व निश्चळ, आत्मा (अंतरात्मा) सविकार व चंचळ. आत्म्यासच सर्वजण देव म्हणतात. देवाचा निश्चय होत नाहीं, देव एकच (अंतरात्मा) आहे हें कळत नाहीं, बहुत देवांत मुख्य देव अनुमानत नाहीं ; म्हणून विचारानें मुख्यदेवाचा शोध घ्यावा – बहुत देवांच्या गोंधळांत पडूं नये (१–३). क्षेत्रांत देव पाहून त्यासारखा देव करून त्याची पूजाअर्चा करितात अशी लोकरीति आहे. प्रतिमादेवाचें मूळ म्ह० क्षेत्रदेव (देहरूप क्षेत्रांतला आत्मा) आहे म्हणून भूमंडळावरच्या नाना क्षेत्रांत (अनेक देहांत) तो अंतरात्मा शोधावा, पाषाणमूर्तीचा विचार पाहतां त्या मूर्तीचें मूळ कोणत्या तरी अवताराकडे असतें. अवतारी देव देह धरून वर्तले, कार्य होतांच मूळरूपांत गेले, त्यापेक्षां ब्रह्मा, विष्णु, महेश थोर. ह्या तीनही देवांला चाळविणारा अंतरात्माच खरोखरी कर्ता भोक्ता आहे. युगानुयुगें हा एकलाच त्रैलोक्य चालवीत आहे. असाच वेदशास्त्रांनींही निश्चय करून ठेविला आहे. जाणीवरूप विवेकानें शरीर वर्तविणारा अंतरात्मा हा देव होय. हा अंतर्देव न जाणतां देव पाहावा म्हणून तीर्थक्षेत्रांकडे बापडे लोक धांवत असतात ! यात्रा करून करून भागले म्हणजे मग मनाशीं विचार करितात, ‘ खरेंच, हरएक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं धोंडा आणि पाणी यांशिवाय काय आहे ! उगाच वणवण हिंडून काय लाभ ! ’ असा विचार करून मग ते सत्संग धरितात आणि सत्संगानें बहुत जनांस देव सांपडला

धरिला । सत्संगें देव सांपडला । बहुत जनांसी ॥ १३ ॥ ऐसीं हीं विवेकाचीं कामें । विवेकी जाणतील नेमें । अविवेकी भुलले भ्रमें । त्यांस हें कळेना ॥ १४ ॥ अंतरवेधी अंतर जाणे । बाहेरमुद्रा कांहींच नेणे । म्हणोन विवेकी शाहाणे । अंतर शोधिती ॥ १५ ॥ विवेकेंविण जो भाव । तो भावचि अभाव । मूर्खस्य प्रतिमा देव । ऐसें वचन ॥ १६ ॥ पाहात समजत सेवटा गेला । तोचि विवेकी भला । तत्वें सांडुनी पावला । निरंजनीं ॥ १७ ॥ अरे जें आकारासी येतें । तें अवघेंच नासोन जातें । मग गलबल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥ चंचळ देव निश्चळ ब्रह्म । परब्रह्मीं नाहीं भ्रम । प्रत्ययज्ञानें निर्भ्रम । होइजेतें ॥ १९ ॥ प्रचीतीवीण जें केलें । तें तें अवघें व्यर्थ गेलें । प्राणी कष्टकष्टोंचि मेले । कर्मकचाटें ॥ २० ॥ कर्मावेगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें । विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥ २१ ॥ कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदंतरें । सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे ॥ २२ ॥ सगुण पाहातां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला । संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ॥ २३ ॥ परमेश्वरीं अनुसंधान । लावितां होइजे पावन । मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ॥ २४ ॥ ऐसीं हीं विवेकाचीं विवरणें । पाहावीं सुचित अंतःकरणें । नित्यानित्य-विवेकश्रवणें । जगदुद्धार ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अंतरदेवनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ वंदूनियां आदिपुरुष । बोलों निद्रेचा विळास । निद्रा आलिया सावकास । जाणार नाहीं ॥ १ ॥ निद्रेनें व्यापिली काया । आळस

आहे. हीं विवेकाचीं कामें विवेकी जाणतात, मूढ भ्रमांतच घोटाळतात. अंतर्मुख पुरुष अंतर जाणतात, तें बहिर्मुख मूढास काय कळणार आहे? म्हणून सूज्ञ माणसें अंतर (अंतःकरण) शोधितात. विवेकावांचून असलेला भाव तो अभावच समजावा, 'प्रतिमापूजा मूर्खांसाठीं' असें वचन प्रसिद्धच आहे. प्रतिमेपासून आरंभ करून विवेकानें पाहतां पाहतां मूळ पुरुषापर्यंत जातो तोच विवेकी होय, तो मायिक तत्त्वांचा त्याग करून मायेपलीकडचें जें ब्रह्म तेथें जाऊन पावतो. आकारास येणारें सर्व नाश पावतें म्हणून परब्रह्म नामरूपादिकांच्या गलबल्यापलीकडे आहे. अंतरात्मा देव चंचळ आहे, ब्रह्म निश्चळ आहे, निर्भ्रम आहे म्हणून प्रत्यय घेत घेत भ्रमाच्या पार व्हावें. ब्रह्मस्थितीचा अनुभव पाहिजे, त्यावांचून केलेलीं सर्व कर्मे व्यर्थ होत, कर्मकचाटांत सांपडून प्राणी व्यर्थ कष्ट कर कर करीत राहतात, कर्मावेगळें व्हायचें नाहीं. तर मग देवाच्या उपासनेचें कर्म कशाला करायचें? विचारानें कांहींसें कळलें कीं देव जगाच्या अंतरीं आहे, याप्रमाणें जगदंतरींचा देव (चंचळ अंतरात्मा) याच्या योगानें निश्चळ ब्रह्मपद पावतां येतें. सगुण पाहतां पाहतां निर्गुणपद प्राप्त होतें, सगुणाचाही संग सोडून निर्गुणपद पाहतां येतें. अंतरात्म्याचें अनुसंधान हेंच ज्ञान याचें विज्ञान (निर्गुणपद) होतें, शांत मनानें हें पाहावें. नित्यानित्य विवेकानें जगदुद्धार होतो (४–२५). [द० १८, स० ८]

आदिपुरुषाचें वंदन करून त्यापासून झालेल्या मायानिद्रेचा विळास वर्णन करूं. निद्रा आल्यावर सहसा उठत नाहीं (पुढील निद्रेचें वर्णन सुलभ आहे). हुडकाचे (एका प्रकारच्या वाद्याचे) तुकडे झाले तरी झोंपेंतल्या मनुष्यास शुद्धि

आंग मोडे जांभ्या । तेणेंकरितां बैसावया । धीर नाहीं ॥ २ ॥ कडकडां जांभया येती । चटचटां चटक्या वाजती । डकडकां डुकल्या देति । सावकास ॥ ३ ॥ येकाचे डोळे झांकती । येकाचे डोळे लागती । येक ते वचकोन पाहाती । चहूंकडे ॥ ४ ॥ येक उलथोन पडिले । तेहीं ब्रह्मविणे फोडिले । हुडकाचे टुकडे जाले । शुद्धी नाहीं ॥ ५ ॥ येक टेंकोन बैसले । तेथेंचि घोरों लागले । येक उताणे पसरले । सावकास ॥ ६ ॥ कोणी मुर्कुंडी घालिती । कोणी कानवडें निजती । कोणी चक्रीं फिरती । चहूंकडे ॥ ७ ॥ येक हात हालविती । येक पाय हालविती । येक दांत खाती । कर्करांटें ॥ ८ ॥ येकाचीं वस्त्रें निघोन गेलीं । तीं नागवींच लोळों लागलीं । येकाचीं मुंडासीं गडबडिलीं । चहूंकडे ॥ ९ ॥ येक निजेलीं अव्यावस्तें । येक दिसती जैसी प्रेतें । दांत पसरुनी जैसीं भूतें । वाईट दिसती ॥ १० ॥ येक वोसणताचि उठिले । येक अंधारीं फिरों लागले । येक जाऊन निजेले । उकरड्यावरी ॥ ११ ॥ येक मडकीं उतरिती । येक भोई चांचपती । येक उठोन वाटा लागती । भलतीकडे ॥ १२ ॥ येक प्राणी वोसणती । येक फुंदफुंदों रडती । येक खदखदां हांसती । सावकास ॥ १३ ॥ येक हाका मारूं लागले । येक बोंबलित उठिले । येक वचकोन राहिले । आपुले ठाईं ॥ १४ ॥ येक क्षणक्षणा खुरडती । येक डोई खाजविती । येक कढों लागती । सावकास ॥ १५ ॥ येकाच्या लाळा गळाल्या । येकाच्या पिका सांडल्या । येकीं लघुशंका केल्या । सावकाश ॥ १६ ॥ येक राउत सोडिती । येक कर्पट ढेंकर देती । येक खांकरुनी थुंकिती । भलतीकडे ॥ १७ ॥ येक हागती येक वोकिती । येक खोंकिती येक सिंकिती । येक ते पाणी मागती । निदसुऱ्या स्वरें ॥ १८ ॥ येक दुस्वप्नें निर्बुजले । येक सुस्वप्नें संतोषले । येक ते गाढमुढीं पडिले । सुषुप्तिमध्यें ॥ १९ ॥ इकडे उजेडाया जालें । कोणीं पढणें आरंभिलें । कोणीं प्रातःस्मरामि मांडिलें । हरिकीर्तन ॥ २० ॥ कोणीं आठविल्या ध्यानमूर्ति । कोणी येकांतीं जप करिती । कोणी पाठांतर उजळिती । नाना प्रकारें ॥ २१ ॥ नाना विद्या नाना कळा । आपलाल्या सिकती सकळा । तानमानें गायनकळा । येक गाती ॥ २२ ॥

राहात नाहीं. जांभया, डुकल्या चुटक्या यांची रेलचेल उडते. मुर्कुंडी घालतात म्ह० पायांत डोकें घालून बसतात; कुशीवर (कानवडें) निजतात; कोणी बरळत (वोसणत) उठतात, कण्हूं लागतात = कण्हतात; राउत अपान वायु कोणी सोडतात

मागें निद्रा संपली । पुढें जागृति प्राप्त जाली । वेवसाईं बुद्धि आपुली । प्रेरिते जाले ॥ २३ ॥ ज्ञाता तत्वें सांडून पळाला । तुर्येपैलीकडे गेला । आत्मनिवेदनें जाला । ब्रह्मरूप ॥ २४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निद्रानिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ कोणीयेका कार्याचा साक्षेप । कांहीं तरा घडे विक्षेप । काळ साहें तें आपेंआप । होत जातें ॥ १ ॥ कार्यभाग होत चालिला । तेणें प्राणी शोक जाला । विचारहि सुचों लागला । दिवसेंदिवस ॥ २ ॥ कोणीयेक प्राणी जन्मासी येतो । कांहीं तऱ्हीं काळ साहें होतो । दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळूपणें ॥ ३ ॥ अवघाचि काळ जरी सजे । तरी अवघेचि होती राजे । कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ॥ ४ ॥ येहलोक अथवा परलोक । साधतां कोणीयेक विवेक । अद्भुत होय स्वाभाविक । देणें ईश्वराचें ॥ ५ ॥ ऐकिल्याविण कळलें । शिकविल्याविण शाहाणपण आलें । देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ॥ ६ ॥ सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे । नेमस्त मनामध्यें आकळे । सारासार ॥ ७ ॥ श्रवण म्हणजे ऐकावें । मनन म्हणजे मनीं धरावें । येणें उपायें स्वभावें । त्रैलोक्य चाले ॥ ८ ॥ श्रवणाआड विक्षेप येती । नाना जिनस सांगों किती । सावध असतां प्रत्यय येती । सकळ कांहीं ॥ ९ ॥ श्रवणीं लोक बैसले । बोलतां बोलतां येकाग्र जाले । त्याउपरी जे नूतन आले । ते येकाग्र नव्हेती ॥ १० ॥ मनुष्य बाहेर हिंडोन आलें । नाना

(१–२२). पूर्वींची निद्रा संपली, पुढें जागृती आली व आपापल्या उद्योगांत निमग्न झाले – मायेची निद्रा संपून स्वरूपीं जागा झालेला साधकही साधनमार्गांत निरत झाला (२३). तत्त्वांचा विचार करून व तत्त्वांहून आपलें वेगळेंपण ओळखून ज्ञाता तुर्यावस्थेच्या पलीकडे गेला, परेहून परता झाला व आत्मनिवेदनभक्तीनें ब्रह्मरूप झाला (२४). [द० १८, स० ९]

कोणतेंही कार्य अंगावर घेऊन मनुष्य उद्योग करूं लागला म्हणजे कांहींतरी त्याच्या आड विघ्न (विक्षेप = अमनस्कता) येतेंच, तथापि काळ अनुकूल (साह्य) असला कीं तें कार्य अनायासें होऊन जातें. कार्य यशस्वी होत चाललें कीं मनुष्य शोक (विशोक = शोकरहित सुखी ; अथवा शोक म्ह० उल्हास, उत्साह) म्ह० सुखी, उत्साहभरित होतो व तेणेंकरून त्याची विचारशक्तीही वाढते, कोणीही प्राणी जन्माला आला तरी त्याला कांहीं काळ अनुकूळ जातो, दयाळु देव दुःखामागून सुख देतोच. साराच काळ अनुकूल होईल तर सारेच राजे होतील, म्हणून कांहीं काळ अनुकूल व कांहीं प्रतिकूल असतो. मुख्य विवेक जर प्रपंचांत आणि परमार्थांत जागृत राहील तर ईश्वरी कृपेनें सहजगत्या कांहींतरी अद्भुत होऊन जातें (१–५). ऐकल्यावांचून कळलें किंवा शिकविल्यावांचून शहाणपण आलें असें भूमंडळांत कधींही पाहिलें किंवा ऐकलेंही नाहीं, ऐकतां ऐकतां कळत जातें, कळतां कळतां वृत्ति शुद्ध होत जाते व मग चित्तांत सारासारविचार स्फुरतो. श्रवण म्ह० ऐकणें व मनन म्ह० विचार करणें, श्रवणमननाच्या योगानें त्रैलोक्याचा कारभार चालला आहे (६–८). आतां श्रवणाच्या आड नानाविध विक्षेप येतात त्यांचा विचार सांगतों, सावधपणें पाहातां कळून येतील. श्रवणाला आरंभापासून जे श्रोते येतात,

प्रकारींचें ऐकिलें। उदंड गलबलूं लागलें। उगें असेना ॥ ११ ॥ प्रसंग पाहोन चालती। ऐसे लोक थोडे असती। श्रवणीं नाना विक्षेप होती। ते हे ऐका ॥ १२ ॥ श्रवणीं बैसले ऐकाया। अडों लागलीसे काया। येती कडकडां जांभया। निद्राभरें ॥ १३ ॥ बैसले सुचीत करूनियां मना। परी तें मनचि ऐकेना। मागें होतें ऐकिलें नाना। तेंचि धरुनी बैसलें ॥ १४ ॥ तत्पर केलें शरीर। परी मनामध्यें आणीक विचार। कल्पना कल्पी तो विस्तार। किती म्हणोनी सांगावा ॥ १५ ॥ जें जें कांहीं श्रवणीं पडिलें। तितुकें समजोन विवरलें। तरीच कांहीं सार्थक जालें। निरूपणीं ॥ १६ ॥ मन दिसतें मां धरावें। ज्याचें त्यानें आवरावें। आवरून विवेकें भरावें। अर्थांतरीं ॥ १७ ॥ निरूपणीं येऊन बैसला। परी तो उदंड जेऊन आला। बैसतांच कासाविस जाला। तृषाक्रांत ॥ १८ ॥ आधीं उदक आणविलें। घळघळां उदंड घेतलें। तेणें मळमळूं लागलें। उठोनी गेला ॥ १९ ॥ कर्पट ढेंकर गुचक्या देती। वारा सरतां मोठी फजीती। क्षणक्षणा उठोनी जाती। लघुशंकेसी ॥ २० ॥ दिशेनें कासावीस केला। अवघेंचि सांडून धांविला। निरूपणप्रसंगीं निघोन गेला। अखंड ऐसा ॥ २१ ॥ दृष्टांतीं कांहीं अपूर्व आलें। अंतःकरण तेथेंचि राहिलें। कोठवरी काय वाचिलें। कांहीं कळेना ॥ २२ ॥ निरूपणीं येऊन बैसला। तो विंचुवें फणकाविला। कैचें निरूपण जाला। कासावीस ॥ २३ ॥ पोटामध्यें तिडीक उठिली। पाठीमध्यें करक भरली। चालक चिखल्या पुळी जाली। बैसवेना ॥ २४ ॥ पिसोळा चावून पळाला। तेणें प्राणी दुश्चीत जाला। कोणें नेटें गल्बला

ते निरूपणीं एकाग्र होतात, पण मध्येंच अनेक गोष्टी ऐकून हिंडून आलेले असल्यामुळें त्यांच्या मनांत त्या घोळत असतात. प्रसंगाप्रमाणें वागणारे थोडे. श्रवणाचे विक्षेप ऐका (९–१२). श्रवणीं ऐकायला बसले तर नीट बसायला जागा न मिळाल्यामुळें कित्येकांना अडचणीच्या जागीं बसावें लागतें; निद्रेचा अंमल होऊन जांभया येतात. मन एकाग्र करून बसलें तरी मन ऐकत नाहीं – पूर्वीं ऐकलेलेंच धरून बसतें, व अनंत कल्पना करीत राहतें. कानांवर पडलेल्या गोष्टी समजून त्यांचें मनन झालें तरच निरूपणाचा उपयोग होतो. बरें, मन ही कांहीं दृश्य वस्तु नाहीं ती धरून ठेवतां येईल. म्हणून मन हें ज्याचें त्यानेंच आवरलें पाहिजे. मन आवरून विवेकानें अर्थांतरीं शिरकवावें (१३–१७). यथेच्छ जेवून श्रवणाला बसल्यानें तहानेनें जीव घाबरा होतो; मग हा घळघळां पाणी आणवून पितो, नंतर मळमळ सुटून निघून जातो. कर्पट ढेंकरा किंवा उचक्या येणें, वारा सरून फजीत पावणें, क्षणोक्षणीं उठून लघवीस जाणें, शौचास जोरानें लागल्यावर सर्व सोडून परसाकडेस धांवणें इ० श्रवणापूर्वीं अत्याहार केल्याचे दुष्परिणाम प्रगट होऊन निरूपणाचा रंग भरत असतांही याला निघून जावें लागतें (१८–२१). दृष्टांतांत कांहीं अपूर्व आलें तर तेथेंच श्रोता गुंतून पडला कीं कोठवर निरूपण आलें हेंही तो विसरून जातो. निरूपण चालत असतांना कोणा श्रोत्यास विंचवानें फणका मारला कीं कसचें निरूपण – तो गेला मंत्रौषधी पाहायला. पोटांत तिडिक उठणें, पाठींत लचक भरणें, फोड, चिखल्या, पुळ्या वगैरेचा त्रास होणें, पिसू चावून गेल्यामुळें चंचळ चित्त होणें, आसपास कोठें गलबला ऐकूं आला कीं निरूपण सोडून तिकडेच धांवणें इ० अनेक अवलक्षणें

केला । तेथेंचि धावें ॥ २५ ॥ विषइ लोक श्रवणीं येती । ते बायेकांकडेच पाहाती । चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ॥ २६ ॥ होये नव्हे वाद-वेवाद । तेणें उदंड जाला खेद । सिव्या गाळी अप्रमाद । होतां चुकला ॥ २७ ॥ कोणी निरुपणीं बैसती । सावकाश गोष्टी लाविती । हरिदास ते रेंरें करीती । पोटासाठीं ॥ २८ ॥ बहुत जाणते मिळाले । येकापुढें येक बोले । लोकांचे आशय राहिले । कोण जाणे ॥ २९ ॥ माझें होय तुझें नव्हे । ऐसी अखंड जयास सवे । न्यायनीति सांडून धांवे । अन्यायपंथें ॥ ३० ॥ आपल्या थोरपणासाठीं । अच्यावाच्या तोंड पिटी । न्याये नाहीं ते सेवटीं । परम अन्याई ॥ ३१ ॥ येकेकडे अभिमान उठे । दुसरेकडे उदंड पेटे । ऐसे श्रोते खरे खोटे । कोण जाणे ॥ ३२ ॥ म्हणोन जाणते विचक्षण । ते आधींच धरिती नेणपण । मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार । सकळ कांहीं जगदांतर । तेहिं राखावें ॥ ३४ ॥ सभेमध्यें कळहो जाला । शब्द येतो जाणत्याला । अंतरें राखों नाहीं सिकला । कैसा योगी ॥ ३५ ॥ वैर करितां वैरचि वाढे । आपणास दुःख भोगणें घडे । म्हणोनि शाहाण्याचे कुवाडे । कळों आलें ॥ ३६ ॥ अखंड आपणा सांभाळिती । क्षुल्लकपण येऊं नेदिती । थोर लोकांस क्षमा शांति । अगत्य करणें ॥ ३७ ॥ अवगुणापासीं बैसला गुणी । अवगुण कळतो तत्क्षणीं । विवेकी पुरुषाची करणी । विवेकें होते ॥ ३८ ॥ उपाय परियाय दिर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना यत्न । करील

अनेक श्रोत्यांत असतात. विषयी लोक बायकांकडेच पाहात बसतात. चोरट्या लोकांची नजर कोऱ्या जोड्यांवर असते. कोठें कोठें 'हा अर्थ नव्हे हा अर्थ, असें नव्हे तसें' इ० बोलाचाली श्रोत्यांत होऊन शिव्यागाळी – मारामारीपर्यंत प्रकरण चिडीस जातें. कांहीं श्रोते पाल्हाळानें पांचट गोष्टी सांगत बसतात, व पोटभरू हरिदासही रें रें करीत असतात (२२–२८). सभेंत पुष्कळ शहाणे मिळाले म्हणजे एकामागें एक आपापलीं मतें बोलत राहतात व शंकासमाधान न होतां श्रोत्यांचें मनोगत तसेंच राहून जातें याचा मात्र कोणीच विचार करीत नाहीं. माझेंच खरें, दुसऱ्याचें खोटें असा दुराग्रह धरणारा मनुष्य न्यायनीति सोडून अन्यायमार्गें धांवतो, व मोठेपणाच्या तोऱ्यांत अचावाचा बडबडत सुटतो. एक अहंकारमदानें बडबडतो, दुसरा क्रोधानें उन्मत्त होतो ; असे अनेक प्रकारचे लोक श्रोत्यांत असतात. खऱ्याखोट्यांचा निवाडा कोणी करावा ? (२९–३२) म्हणून शहाणे व जाणते असतात ते आधींच मूर्खपणा घेतात, मीच मूर्ख टोणपा, मला कांहींच कळत नाहीं, असें समजतात. आपणापेक्षां देव (अंतरात्मा) थोर जाणता आहे हा विचार ज्याला कळला त्यानें जगदंतर (लोकांचें चित्त) सुप्रसन्न ठेवलें पाहिजे. सभेंत भांडण झालें तर त्याचा ठपका येतो जाणत्यावर. लोकांचीं मनें राखतां आलीं नाहींत तर तो जाणता कसचा ? वैरानें वैरभाव वाढतो, व आपल्याला दुःख भोगावें लागतें, हें रहस्य शहाण्यांना कळून चुकलेलें असतें. म्हणून ते स्वतःच्या मनोवृत्ति कह्यांत ठेवतात, हलकेपणा आपणावर येऊं देत नाहींत. थोर लोकांनीं तर क्षमाशांति अवश्य धरली पाहिजे. अवगुणी मनुष्याजवळ सद्गुणी मनुष्य बसला तर अवगुण चटकन लक्षांत येतो. विवेकी मनुष्याचें सर्व वर्तन विवेकपूर्वकच होतें. उपायाचे पर्याय (नाना प्रकार) विवेकबळानें व नाना यत्नांनीं करणाऱ्या पुरुषाचा महिमा तोच (किंवा तत्सम) जाणूं शकतो. दुर्जनांनीं वाद करून बेजार केलें किंवा बाष्कळ लोकांनीं तोंडसुख घेतलें असाही

तयाचे महिमान । तोचि जाणे ॥ ३९ ॥ दुर्जनीं वेवदरून घेतला । बाष्कळ लोकीं घसरिला । विवेकापासून चेवला । विवेकी कैसा ॥ ४० ॥ न्याय परियाय उपाय । मूर्खास हें कळे काय । मूर्खाकरितां चिवडा होय । मजालसीचा ॥ ४१ ॥ मग ते शाहाणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती । स्वयें करून करविती । लोकांकरवीं ॥ ४२ ॥ पृथ्वीमध्यें उदंड जन । जनांमध्यें असती सज्जन । जयांकरितां समाधान । प्राणिमात्रासी ॥ ४३ ॥ तो मनोगतांचीं आंगें जाणे । मान प्रसंग समयो जाणे । संतप्तांला निववूं जाणे । नानाप्रकारें ॥ ४४ ॥ ऐसा तो जाणता लोक । समर्थ तयाचा विवेक । त्याचें करणें कांहीं येक । जनास कळेना ॥ ४५ ॥ बहुत जनासी चालवी । नाना मंडळें हालवी । ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते ॥ ४६ ॥ विवेक येकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा । लोक आपला आणी परावा । म्हणोंचि नये ॥ ४७ ॥ येकांतीं विवेक ठाई पडे । येकांतीं यत्न सांपडे । येकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ॥ ४८ ॥ येकांतीं स्मरण करावें । चुकलें निधान पडे ठावें । अंतरात्म्यासरिसें फिरावें । कांहीं तरी ॥ ४९ ॥ जयास येकांत मानला । अवघ्याआधीं कळे त्याला । त्यावेगळें वडिलपणाला । ठावचि नाहीं ॥ ५० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे श्रोताअवलक्षणनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

प्रसंगीं विवेकापासून च्युत होईल तर तो विवेकी कसचा ? न्याय व विविध प्रकारचे उपाय हे मूर्खास कसे समजावेत ? मूर्खांमुळें तर सभेचा चिवडा होतो, तेव्हां शाहणे सुधारून घेतात. स्वतः सहन करायला शिकवितात, स्वतः थोर कृत्यें करून लोकांकडून महत्कार्यें करवितात. पृथ्वींत माणसें पुष्कळ आहेत, पण सज्जनांपासूनच जनांना समाधान मिळतें. सज्जनाला मनोगत राखण्याचे सर्व प्रकार माहीत असतात, तो काळवेळ जाणतो व तापलेल्या लोकांना शांत करायचे नाना प्रकार त्याला अवगत असतात. अशा जाणत्या पुरुषाचा विवेक श्रेष्ठ असतो, त्याचें करणें सर्वांना कळत नाहीं. बहुत जनांस प्रेरणा देऊन अनेक मंडळें (समुदाय) हालवितो, त्यालाच विवेकश्रेष्ठतेमुळें ‘ समर्थ–पदवी ’ महत्पद प्राप्त होतें. एकांतीं विवेक करावा, ध्यानधारणेनें परमात्मा वश करावा, स्वपरभेद न ठेवतां समतेनें वागावें. एकांतांतच विवेक उमगतो, प्रयत्नाचे मार्ग सांपडतात. तर्कानें ब्रह्मांडगोळ आकळतां येतो. एकांतांत स्मरण करावें म्हणजे चुकलेला ठेवा सांपडतो, अंतरात्म्याएवढें विशाल होऊन ब्रह्मांडभर फिरावें. ज्याला एकांत आवडला त्याला सर्वांच्या अगोदर कळतें, याशिवाय श्रेष्ठपणा मिळविण्याचा दुसरा मार्गच नाहीं (३३–५०). [द० १८, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक शिकवणनाम एकोणिसावा ॥ १९ ॥

॥ श्रीराम ॥ ब्राह्मणें बाळबोध अक्षर । घडसून करावें सुंदर । जें देखतांचि चतुर । समाधान पावती ॥ १ ॥ वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळें । कुळकुळीत वोळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा जैशा ॥ २ ॥ अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस काने नीट । आडव्या मात्रा त्याही नीट । आर्कुलीं वेलांट्या ॥ ३ ॥ पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेलें । येका टांकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ॥ ४ ॥ अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोंसरपण । तैसेंचि वळण वांकण । सारिखेंची ॥ ५ ॥ वोळीस वोळी लागेना । आर्कुली मात्रा भेदीना । खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥ ६ ॥ पान शिष्यानें रेखाटावें । त्यावरी नेमकेंचि ल्याहावें । दुरी जवळी न व्हावें । अंतर वोळीचें ॥ ७ ॥ कोठें शोधासी आडेना । चुकी पाहातां सांपडेना । गरज केली हें घडेना । लेखकापासुनी ॥ ८ ॥ ज्याचें वय आहे नूतन । त्यानें ल्याहावें जपोन । जनासी पडे मोहन । ऐसें करावें ॥ ९ ॥ बहु बारीक तरुणपणीं । कामा नये म्हातारपणीं । मध्यस्थ लिहिण्याची करणी । केली पाहिजे ॥ १० ॥ भोंवतें स्थळ सोडून द्यावें । मध्येंचि चमचमित ल्याहावें । कागद झडतांहि झडावें । नलगेचि अक्षर ॥ ११ ॥ ऐसा ग्रंथ

ब्राह्मणानें बाळबोध अक्षर वळवून असें सुंदर करावें कीं तें पाहतांच चतुरांना आनंद वाटावा. काळीभोर शाई (मसी) करून अक्षर वाटोळें, सरळ व मोकळें लिहावें. मोत्यांच्या माळासारख्या एकसारख्या (ढाळ) ओळी लिहाव्या. प्रत्येक अक्षर नीट असावें, मधलें अंतर सारखें व काने, आडव्या मात्रा, वेलांट्या, आकुली म्ह० रेफ वगैरे सर्व नीट असावेत. प्रथम अक्षरापासून ग्रंथ संपेतों पाहत गेलें तर एका टांकानें सारा ग्रंथ लिहिला आहे असें वाटावें. अक्षरें काळींभोर, टांक ठोसर (ठसठसीत), वळणवांकण सर्व सारखें असावें. ओळीला ओळ लागूं नये, रेफ व मात्रा एकमेकांच्या मार्गांत येऊं नयेत, खालच्या वरच्या ओळी एकमेकांस लागूं नयेत. अक्षर अति लांबट असूं नये (१–६). ग्रंथाचीं पानें आधीं शिष्यानें रेखाटावीं व नेमकें रेषांवर लिहावें, ओळींचें अंतर कमजास्त नसावें. क्वचित् शोध घ्यावा लागला तर अडचण न व्हावी. लिहिण्यांत चूक न सांपडावी, लेखकानें कसर (गरज) किंवा कुचराई केली असा आक्षेप न यावा. अल्पवयी मुलांनीं तर अक्षर फार जपून लिहावें कीं जें पाहतांच लोकांस मोह पडावा. तारुण्यांत फार बारीक लिहिलेलें अक्षर म्हातारपणीं वाचतां येणार नाहीं. म्हणून फार बारीक नाहीं व फार मोठें नाहीं असें मध्यम अक्षर असावें (७–१०). सभोंवार जागा सोडून मध्यें ठसठसीत लिहावें, कागद झडला तरी अक्षर झडूं नये. असा ग्रंथ आद्यंत जपून लिहावा, म्हणजे पाहणारांस तो

जपोनी ल्याहावा । प्राणिमात्रांस उपजे हेवा । ऐसा पुरुष तो पाहावा । म्हणती लोक ॥ १२ ॥ काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी । चटक लावुनी सोडावी । कांहीं येक ॥ १३ ॥ घट्य कागद आणावे । जपोन नेमस्त खळावे । लिहिण्याचे सामे असावे । नानापरी ॥ १४ ॥ सुऱ्या कातऱ्या जागाईत । खळी घोंटाळें तागाईत । नाना सुरंग मिश्रित । जाणोनि घ्यावें ॥ १५ ॥ नाना देशींचे बरु आणावे । घट्य बारीक सरळे घ्यावे । नाना रंगांचे आणावे । नाना जिनसी ॥ १६ ॥ नाना जिनसी टांकतोडणी । नानाप्रकारीं रेखाटणी । चित्रविचित्र करणी । सिसेंलोळ्या ॥ १७ ॥ हिंगुळ संग्रहीं असावे । वाळले आळिते पाहोन घ्यावे । सोपें भिजउनी वाळवावे । संग्रह मसीचे ॥ १८ ॥ तगटी इतिश्र्या कराव्या । बंदरी फळ्या घोटाव्या । नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ॥ १९ ॥ नाना गोप नाना बासनें । मेणकापडें सिंदुरवर्णें । पेट्या कुलपें जपणें । पुस्तकाकारणें ॥ २० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे लेखनक्रियानिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ मागां बोलिले लेखनभेद । आतां ऐका अर्थभेद । नाना प्रकारींचे संवाद । समजोन घ्यावे ॥ १ ॥ शब्दभेद अर्थभेद । मुद्राभेद प्रबंधभेद । नाना शब्दांचे शब्दभेद । जाणोनी पाहावे ॥ २ ॥ नाना आशंका प्रत्युत्तरें । नानाप्रचीत साक्षात्कारें । जेणेंकरितां जगदंतरें । चमत्कारती ॥ ३ ॥ नाना पूर्वपक्ष सिद्धांत । प्रत्ययो पाहावा नेमस्त ।

पाहतांच त्याचा हेवा वाटावा (आपण संग्रहावा असें वाटावें) व असा पुरुष डोळ्यांनीं पाहावा अशी इच्छा व्हावी. देह कष्टवावा, उत्कट कीर्ति जोडावी, कांही तरी लोकांस चटक लागेल असे गुण संपादावेत. घट्ट कागद आणून चांगले (तुरटीच्या पाण्यानें) घोंटावेत व लिहिण्याचें सर्व सामान (सामे) सिद्ध ठेवावें. सुऱ्या, कातऱ्या, समासफळ्या (जागाईत), खळ, घोटाळें म्ह० कागद घोटण्याचा घोटा, तागाईत म्ह० कागद चिवट करण्यास लागणारे जिन्नस, वगैरे नानाविध रंगांचे असावेत. अनेक ठिकाणचे बोरु आणून त्यांतून घट्ट, बारीक व सरळ (लेखणीसाठीं) घ्यावेत व ते अनेक रंगांचे विविध असावे. अनेक प्रकारचीं टांकतोडणीं, रेखाटणीं (रूळ वगैरे), शिसेगोळ्या, हिंगुळ, वाळलेले आळते हे संग्रहीं ठेवावेत. शाईच्या गोळ्या किंवा वड्या भिजवून वाळवून ठेवाव्यात, ग्रंथाच्या शेवटीं 'इतिश्री' लिहावें, बंदरांतून (मलबारादि प्रांतींच्या) आणलेल्या फळ्या घोंटाव्यात, अनेक सुंदर चित्रांनीं ग्रंथ चित्रित सुंदर करावा. गोफ, बासनें (वेष्टनें), सिंदूरवर्णाचीं मेणकापडें, पेट्या, कुलपें सर्व व्यवस्थितपणें मिळवून ग्रंथांना अतिशय जपावें (११–२०). [द० १९, स० १]

वर लेखनभेद सांगितले, आतां अर्थभेद सांगतों. सर्व प्रकारचे संवाद आधीं समजून घ्यावेत. वेगवेगळे शब्द, भिन्न भिन्न अर्थ, निरनिराळ्या मुद्रा व नाना प्रकारचे प्रबंध – अनेक शब्दांचे भिन्नार्थ समजून घ्यावे. अनेक शंका व त्यांचीं समाधानें, अनेक अनुभवाच्या आणि साक्षात्काराच्या गोष्टी श्रोत्यांस पटवून द्याव्या कीं ज्या ऐकून त्यांना चमत्कार वाटावा. पूर्वपक्ष आणि सिद्धांत दोन्ही स्वच्छ सांगावेत, अनुभव पाहावा, अनुभवाचें ज्ञान सांगावें, वाष्कळपणाचें शाब्दिक ज्ञान सांगूं नये. प्रपंचांत काय किंवा परमार्थांत काय प्रचीतीवांचून सारा श्रम होय.

अनुमानाचें खस्तवेस्त । बोलोंचि नये ॥ ४ ॥ प्रवृत्ति अथवा निवृत्ती । प्रचीतीविण अवघी भ्रांती । गळंग्यांमधील जगज्जोति । चेतेल कोठें ॥ ५ ॥ हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवींचें समजणें । मुख्य चातुर्याचीं लक्षणें । तीं हीं ऐसीं ॥ ६ ॥ चातुर्येंविण खटपट । ते विद्याचि फलकट । सभेमध्यें आटघाट । समाधान कैचें ॥ ७ ॥ बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौन्यचि धरावें । अल्पचिन्हें समजावें । जगदंतर ॥ ८ ॥ बाष्कळांमध्यें बैसों नये । उद्धटासीं तंडों नये । आपणाकरितां खंडों नये । समाधान जनाचें ॥ ९ ॥ नेणतेंपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये । नानाजनांचें हृदये । मृदुशब्दें उकलावें ॥ १० ॥ प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसीं जाजु घेऊं नका । खरें असतांचि नासका । फड होतो ॥ ११ ॥ शोध घेतां आळसों नये । भ्रष्ट लोकीं बैसों नये । बैसलें तरी टाकूं नये । मिथ्या दोष ॥ १२ ॥ अंतर आर्ताचें शोधावें । प्रसंगीं थोडेंचि वाचावें । चटक लावुनी सोडावें । भल्या मनुष्यांसी ॥ १३ ॥ मजालसींत बैसों नये । समाराधनेसी जाऊं नये । जातां येळीलवाणें होय । जिणें आपुलें ॥ १४ ॥ उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासीं बोलतां फावे । भले पाहोन करावे । शोधून मित्र ॥ १५ ॥ उपासनेसारिखें बोलावें । सर्व जनांसी तोषवावें । सगट बरेंपण राखावें । कोणीयेकांसी ॥ १६ ॥ ठाईं ठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा । प्राणिमात्र बोलवावा । आप्तपणें ॥ १७ ॥ उंच नीच म्हणों नये । सकळांचें निववावें हृदये । अस्तमानीं जाऊं नये । कोठें तऱ्हीं ॥ १८ ॥ जगामध्यें जगमित्र ।

कचरा किंवा गळाठा (गळंगा) उकिरड्यावर पडलेला असतो त्यांत जसा अग्नि पेट घेत नाहीं त्याप्रमाणें अनुमानिक ज्ञानानें ज्ञानाग्नि चेतणार नाहीं (१–५). दुसऱ्याचा हेतु समजून बोलावें, त्याच्या जीवींचें जाणावें, हें चातुर्याचें मुख्य लक्षण होय. चातुर्यावांचून विद्या फोल होय. सभेंत आटापिट किंवा श्रम (आटघाट) झाले तर समाधान कोठचें मिळणार ? पुष्कळ बोलणें ऐकावें, त्यांत बोलूं नये, थोडक्यावरून लोकांचें मनोगत जाणावें. बाष्कळ लोकांत बसूं नये, उद्धटाबरोबर शब्दवाद करूं नये. आपल्या एकट्यासाठीं लोकांचें समाधान मोडूं नये. नेणपण सोडूं नये, जाणपणें फुगूं नये, मृदु शब्दांनीं जनांचें हृदय उकलावें म्ह० हातीं घ्यावें. योग्य प्रसंग जाणावा. बहुतजन विरुद्ध असतां त्यांशीं कलह करूं नये, आपलें खरें असलें तरी आग्रहानें तेंच तें प्रतिपादून सभा मोडूं नये. शोध घेण्यांत आळस करूं नये. भ्रष्ट लोकांत बसूं नये व बसलें तरी कोणावरही मिथ्या दोषारोप करूं नयेत. आर्त म्ह० दुःखपीडित किंवा उत्सुक मनुष्याचें चित्त शोधावें, त्याला शमवायास्तव वाचून दाखवावें पण प्रसंगीं थोडेंच वाचावें (म्हणजे त्याला विचार करायला सवड यावी), सज्जनांना चटक लावून सोडावी. सभेंत मध्यभागीं बसूं नये, मुक्तद्वारीं भोजन करूं नये, कां कीं केल्यास आपलें जिणें तुच्छ होतें (६–१४). उत्तम गुण प्रगटवावेत म्हणजे हवें त्याशीं बोलतां येतें, मैत्री मात्र सज्जन शोधून त्यांशींच करावी. उपासनेच्या शिकवणीप्रमाणें बोलावें किंवा दुसऱ्याची उपासनाप्रीति पाहून तदनुरूप बोलावें, सर्वांस संतोष द्यावा, सर्वांशीं सारखें भलेपणें रहावें. ठिकठिकाणीं शोध घेऊन मगच गांवांत प्रवेश करावा, प्राणिमात्रांला आपलेपणा वाटेल असें त्यांशीं बोलावें. श्रेष्ठकनिष्ठ किंवा श्रीमंतगरीब हा भेदभाव मनांत न आणतां सर्वांचा आत्मा सुखवावा. अस्तमानीं नवीन गांवांत

जिव्हेपासीं आहे सूत्र । कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें ॥ १९ ॥ कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें । तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं ॥ २० ॥ तेथें भले आडळती । व्यापक तेही कळों येती । हळु-हळू मंदगती । रीग करावा ॥ २१ ॥ सकळांमध्यें विशेष श्रवण । श्रवणाहुनी थोर मनन । मननें होय समाधान । बहुत जनांचें ॥ २२ ॥ धूर्तपणें सकळ जाणावें । अंतरीं अंतर बाणावें । समजल्याविण सिणावें । कासयासी ॥ २३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवरणनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ सुचित करून अंतःकरण । ऐका करंटलक्षण । हें त्यागितां सदेवलक्षण । आंगीं बाणे ॥ १ ॥ पापाकरितां दरिद्र प्राप्त । दरिद्रें होय पापसंचित । ऐसेंचि हें होत जात । क्षणक्षणा ॥ २ ॥ याकारणें करंटलक्षणें । ऐकोनी त्यागचि करणें । म्हणिजे कांहीं येक बाणे । सदेवलक्षण ॥ ३ ॥ करंट्यास आळस आवडे । यत्न कदापी नावडे । त्याची वासना वावडे । अधर्मीं सदा ॥ ४ ॥ सदा भ्रमिष्ट निदसुरा । उगेंचि बोले सैरावैरा । कोणीयेकाच्या अंतरा । मानेचिना ॥ ५ ॥ लेहों नेणे वाचूं नेणे । सवदासुत घेऊं नेणे । हिशेब कितेब राखों नेणे । धारणा नाहीं ॥ ६ ॥ हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी । भल्याचे संगतीची आवडी । कदापी नाहीं ॥ ७ ॥ चाट गडी मेळविले । कुकर्मी मित्र केले । खट नट येकवटिले । चोरटे पापी ॥ ८ ॥ ज्यासीं त्यासीं कळकटा । स्वयें सदाचा चोरटा । परघातकी धाटामोटा । वाटा पाडी ॥ ९ ॥ दीर्घसूचना सुचेचिना ।

शिरूं नये. जगांत जगमित्र होण्याचें मुख्य सूत्र जिव्हेपाशीं आहे, याप्रमाणें सर्वांचा स्नेह जोडावा पण सज्जन मात्र शोधून काढावेत. कथा असेल तेथें जावें पण मागें दीनासारखें बसावें व तेथें बसून सारें हद्रत किंवा सारी परिस्थिति समजून घ्यावी. तेथें भले कोण आहेत, व्यापक म्ह० कार्यकर्ते कोण आहेत हें समजून येतें, मग त्यांत हळुहळू प्रवेश करावा. सर्वांत श्रवण थोर व मनन त्याहून थोर म्हणून श्रवणमननांची जनांस गोडी लावून बहुतांचा संतोष राखावा, धूर्तपणानें सर्व जाणून घ्यावें, मनाला मनाची ओळख पटवावी. समजलें नाहीं तर सारे श्रम व्यर्थ होत (१५–२३). [द० १९, स० २]

अंतःकरण स्थिर करून करंट्याचीं लक्षणें ऐका. यांचा त्याग केला कीं भाग्यवंतांचीं लक्षणें अनायासें अंगीं बाणतात. पाप वाढलें कीं दारिद्र्य येतें व दारिद्र्य आलें कीं पाप वाढतें असें निरंतर घडत असतें, म्हणून करंटलक्षणें ऐकावींत व लगेच टाकावींत म्हणजे सभाग्यांचीं कांहीं तरी अंगीं बाणतील (१–३). करंट्याला आळस आवडतो, यत्न आवडत नाहीं; त्याची वासना नेहमीं अधर्माकडे धांवत असते, तो सदा भ्रमिष्ट व झोपाळु असतो, अद्वातद्वा बकतो, व कोणालाच मनापासून आवडत नाहीं. त्याला लिहिणें वाचणें येत नाहीं, बाजारहाट करितां येत नाहीं, हिशेब ठेवतां येत नाहीं, धारणाशक्ति मुळींच नाहीं. हारवणें, सांडणें, पाडणें, फोडणें, विसरणें, चुकणें, नाना खोड्या करणें हा त्याचा स्वभाव. सत्संगतीची आवड नाहीं; चावट, दुराचारी, खट नट, पापी यांचा स्नेह; ज्याच्या त्याच्याशीं भांडण, सर्वांचा चोरटा, परघातावर लक्ष,

न्यायनीति हे रुचेना । परअभिळासीं वासना । निरंतर ॥ १० ॥ आळसें शरीर पाळिलें । परंतु पोटेंविण गेलें । सुडकें मिळेनासें जालें । पांघराया ॥ ११ ॥ आळसें शरीर पाळी । अखंड कुंसी कांडोळी । निद्रेचे पाडी सुकाळीं । आपणासी ॥ १२ ॥ जनासीं मित्री करीना । कठीण शब्द बोले नाना । मूर्खपणें आवरेना । कोणीयेकासी ॥ १३ ॥ पवित्र लोकांमध्यें भिडावे । वोंगळामध्यें निःशंक धावे । सदा मनापासून भावे । जननिंद्य क्रिया ॥ १४ ॥ तेथें कैचा परोपकार । केला बहुतांचा संव्हार । पापी अनर्थी अपस्मार । सर्वअबद्धी ॥ १५ ॥ शब्द सांभाळून बोलेना । आवरितां आवरेना । कोणीयेकासी मानेना । बोलणें त्याचें ॥ १६ ॥ कोणीयेकास विश्वास नाहीं । कोणीयेकासीं सख्य नाहीं । विद्यावैभव कांहींच नाहीं । उगाचि ताठा ॥ १७ ॥ राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें । ऐसीं हीं विवेकाचीं उत्तरें । ऐकणार नाहीं ॥ १८ ॥ स्वयें आपणास कळेना । सिकविलें तें ऐकेना । तयासी उपाव नाना । काय करिती ॥ १९ ॥ कल्पना करी उदंड कांहीं । प्राप्तव्य तों कांहींच नाहीं । अखंड पडिला संदेहीं । अनुमानाचे ॥ २० ॥ पुण्यमार्ग सांडिला मनें । पाप झडावें काशानें । निश्चय नाहीं अनुमानें । नास केला ॥ २१ ॥ कांहींयेक पुर्तें कळेना । सभेमध्यें बोलों राहेना । बाष्कळ लाबाड ऐसें जना । कळों आलें ॥ २२ ॥ कांहीं नेमकपण आपुलें । बहुत जनांसी कळों आलें । तेंचि मनुष्य मान्य जालें । भूमंडळीं ॥ २३ ॥ झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची । जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणें ॥ २४ ॥ भल्याची संगती धरीना ।

वाटमारेपणाचा धंदा, दूरदर्शीपणा नाहीं, न्यायनीतीची आवड नाहीं, दुसऱ्याला लुबाडायची वासना, शरीर आळसाच्या स्वाधीन, पोटाचा धंदा नाहीं, पांघरायला फाटकें वस्त्रही (सुडकें) नाहीं, कुशी खाजवीत लोळत सदा झोंप घेणें – हीं सारीं करंट्याचीं लक्षणें होत. जनांशीं मैत्री करितां येत नाहीं, कठोर शब्दांनीं दुसऱ्यास ताडन करितो, मूर्खत्वामुळें कोणालाच आवरत नाहीं, सज्जनांच्या मेळांत जायला संकोचतो, वाईट लोकांच्या टोळींत बेडर मिसळतो, जनांत निंद्य अशा गोष्टींची मनापासून आवड (४–१४). बहुतांच्या नाशावर पोसणारा हा – याला परोपकार माहीतच नाहीं. पापी, अनर्थ करणारा, भ्रांतिष्ट, शब्द सांभाळून बोलतां येत नाहीं व याचें बोलणें कोणालाच मानवत नाहीं. विश्वास, सख्य, विद्यावैभव, इ० कांहीं नसून उगीच ताठा. लोकांना राजी राखल्यानें भाग्य येतें इ० सद्बोध मनावर घेतच नाहीं. स्वतः कळत नाहीं, कोणाचें ऐकत नाहीं, तो कोणत्या उपायांनीं सुधारणार ? कल्पनांच्या भराऱ्या फार, लभ्यांश कांहींच नाहीं, सदा संशयग्रस्त, पुण्यमार्ग मनांतच नाहीं मग याचें पाप झडावें कसें ? धड कांहींएक कळत नाहीं पण बोलल्याशिवाय राहात नाहीं. हा बाष्कळ व खोटा म्हणून लोकांस माहीत झाला (१५–२२). हा मनुष्य कांहीं नियमानें चालणारा आहे असें बहुतांस कळलें तरच तो लोकमान्य होतो, नाहींतर होत नाहीं. झिजल्यावांचून कीर्ति होत नाहीं, मान्यता फुकाची मिळत नसते. अवलक्षणांनीं जनांत छीःथू मात्र होते. — भल्याची संगत धरीत नाहीं, स्वतःस शहाणा करीत नाहीं व स्वहित

आपणासी शाहाणें करीना । तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणें ॥ २५ ॥ लोकांसी बरें करावें । तें उसिणें सवेंचि घ्यावें । ऐसें जयाच्या जीवें । जाणिजेना ॥ २६ ॥ जेथें नाहीं उत्तम गुण । तें करंटपणाचें लक्षण । बहुतांसी न मने तें अवलक्षण । सहजचि जालें ॥ २७ ॥ कार्याकारण सकळ कांहीं । कार्येंविण तों कांहींच नाहीं । निकामी तो दुःखप्रवाहीं । वाहातचि गेला ॥ २८ ॥ बहुतांसी मान्य थोडा । त्याच्या पापासी नाहीं जोडा । निराश्रई पडे उघडा । जेथें तेथें ॥ २९ ॥ याकारणें अवगुण त्यागावे । उत्तम गुण समजोन घ्यावे । तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करंटलक्षणनिरूपणनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ मागां बोलिलें करंटलक्षण । तें विवेकें सांडावें संपूर्ण । आतां ऐका सदेवलक्षण । परम सौख्यदायक ॥ १ ॥ उपजत गुणशरीरीं । परोपकारी नाना परी । आवड सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ॥ २ ॥ सुंदर अक्षर लेहों जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे । अर्थांतर समजों जाणे । सकळ कांहीं ॥ ३ ॥ कोणाचें मनोगत तोडीना । भल्यांची संगती सोडीना । देवलक्षण अनुमाना । आणून ठेवी ॥ ४ ॥ तो सकळ जनासी व्हावा । जेथें तेथें नित्य नवा । मूर्खपणें अनुमानगोंवा । कांहींच नाहीं ॥ ५ ॥ नाना उत्तम गुण सत्पात्र । तेचि मनुष्य जगमित्र । प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ॥ ६ ॥ राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर । नेमस्तपणाचा विसर । पडणार नाहीं ॥ ७ ॥ नम्रपणें पुसों जाणे । नेमस्त अर्थ सांगों जाणे । बोला ऐसें वर्तों जाणे । उत्तम क्रिया ॥ ८ ॥ जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न शके

कळत नाहीं. तो आत्मघातक होय. लोकांचें कल्याण केलें कीं ते उलट आपल्या कल्याणाला कारण होतात हें ज्याला कळत नाहीं व ज्यापाशीं कांहीं उत्कट गुण नाहीं तो करंटा जाणावा. करंटपणाचे गुण बहुतांस मान्य होत नाहींत म्हणूनच त्यांना अवलक्षणें म्हणतात. हें जग कार्याकारणाचें म्ह० दिल्याघेतल्याचें आहे, तेथें केल्यावांचून कांहींच होत नाहीं म्ह० निकामी आहे तो दुःखप्रवाहांत वाहात जातो. जो बहुतांना मान्य होत नाहीं असा पातकी जेथें तेथें आश्रयरहित उघडा पडतो, म्हणून अवगुण टाकून उत्तम गुण समजून घ्यावे म्हणजे सर्व कांहीं मनासारखें होतें (२३–३०). [द० १९, स० ३]

मागील समासांत वर्णिलेलीं सारीं करंटलक्षणें टाकून देऊन सौख्यदायक अशीं भाग्यवंतांचीं पुढें येणारीं सुलक्षणें अंगीं आणावीं. ज्याच्या अंगीं परोपकाराचा गुण उपजत आहे, जो सर्वांस अंतरापासून आवडतो, ज्याचें अक्षर सुंदर, जो चपळ व शुद्ध वाचतो व अर्थांतर उत्तम प्रकारें सांगतो, जो नेहमीं भल्यांची संगति करितो व कोणाचें मनोगत न तोडतां ज्याला वागतां येतें तो सभाग्य समजावा. तो नित्यनूतन सर्वांस हवाहवासा वाटतो. तो मूर्खत्वाच्या गुंत्यांत पडत नाहीं. तो उत्तम गुणांनीं युक्त असल्यामुळें सहजच जगमित्र होतो. त्याची कीर्ति त्याच्या गुणांवर स्वतंत्रपणें पसरते, तिला कोणाचा टेकू लागत नाहीं. तो सर्वांचें मन सांभाळतो, त्याचें पाठांतर जबर असतें, तो नेमस्तपणें वागण्यांत कधीं चुकत नाहीं. कोणाला विचारायचें तर नम्रपणानें विचारावें, व्यवस्थित अर्थ कोणी विचारल्यास सांगावा. बोलण्याप्रमाणें वागावें, उत्तम

त्यासी । धगधगीत पुण्यरासी । महापुरुष ॥ ९ ॥ तो परोपकार करिता गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काय उणें तयाला । भूमंडळीं ॥ १० ॥ बहुत जन वास पाहे । वेळेस तत्काळ उभा राहे । उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ॥ ११ ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । जाणे संगीत गायनकळा । आत्मविद्येचा जिव्हाळा । उदंड तेथें ॥ १२ ॥ सकळांसीं नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें । अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ १३ ॥ न्यायनीति भजनमर्यादा । काळ सार्थक करी सदा । दरिद्रपणाची आपदा । तेथें कैंची ॥ १४ ॥ उत्तमगुणें शृंगारला । तो बहुतांमध्यें शोभला । प्रगटप्रतापें उगवला । मार्तंड जैसा ॥ १५ ॥ जाणता पुरुष असेल जेथें । कळहो कैंचा उठेल तेथें । उत्तम गुणाविषयीं रितें । तें प्राणी करंटें ॥ १६ ॥ प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थीं साकल्यविवरण । सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ १७ ॥ मागें येक पुढें येक । ऐसा कदापी नाहीं दंडक । सर्वत्रांसीं अलोलिक । तया पुरुषाची ॥ १८ ॥ अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका । जेथें तेथें विवेका । प्रगट करी ॥ १९ ॥ कर्मविधी उपासनाविधी । ज्ञानविधी वैराग्यविधी । विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धि । चळेल कैसी ॥ २० ॥ पाहातां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण । जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं ॥ २१ ॥ आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहानथोर । तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ २२ ॥ दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे । आवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ २३ ॥ उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी । तैसी

आचार पाळावा, त्याला कोणीं दोष ठेवण्यास धजूं नये, धगधगीत पुण्यराशी महापुरुष, लोकप्रिय, परोपकारी — अशा पुरुषाला भूमंडळांत काय कमी पडायचें आहे ? अनेक लोक त्याच्या साह्याची वाट पाहतात व जेथें तेथें वेळेवर उभा राहतो, त्याला कोणाचें उणें पाहवत नाहीं. चौदा विद्या, चौसष्ट कला त्यापाशीं उभ्या आहेत, संगीत-गायनकलाही जाणतो, अध्यात्माचा जिव्हाळा मोठा आहे. सर्वांशीं नम्र, मनोगत राखून चालायचें, कोणाचें उणें पडूं द्यायचें नाहीं, न्यायनीति, भजनपूजन, सर्वकाळ सार्थकीं — अशा भाग्यवंताला दारिद्र्यादि आपदा काय म्हणून सतावतील ? उत्तम गुणालंकृत असा पुरुष बहुजनांत प्रतापसूर्यासारखा प्रकाशणार ! असा जाणता पुरुष ज्या समाजांत असतो त्या समाजांत कलह उठत नाहींत. असे उत्तम गुण ज्यापाशीं नाहींत तो करंटा समजावा. प्रपंचांत राजकारण उत्तम जाणतो व परमार्थांत अध्यात्मविवरण उत्कृष्ट करितो, सर्वांतल्या उत्तम गुणांचा भोक्ता असतो तोच भाग्यवंत होय. मागें एक, पुढें एक, असा दुटप्पीपणा त्यापाशीं नसतो. सर्वांना त्याची धन्यता वाटते (१–१८). तो कोणाचेंही अंतर दुखवीत नाहीं, जेथें तेथें विवेकच प्रगट करितो. कर्म, उपासना, ज्ञान, वैराग्य, ज्ञातेपणाची विशाल स्थिरबुद्धि — सर्व त्यापाशीं उत्तम असतें. त्याला वाईट कोण म्हणेल ! सर्वांघटीं आत्माराम नांदतो तसाच तो सर्वांतर्यामीं प्रिय होऊन राहतो. लहानथोर सर्वजण आपापल्या कार्यांत तत्परतेनें झटतात तसाच हा परकार्यांत झटतो. परदुःखानें दुःखी व परसुखानें सुखी होतो, सारेच सुखी असावेत अशी त्याची शुद्ध वासना असते. अनेक प्रकृतिगुणांचीं अनेक मुलें असलीं तरी वडिलांचें मन सर्वांवर असतें, त्याप्रमाणें महापुरुष सर्वांच्या कल्याणाची

अवघियांची चिंता करी। महापुरुष ॥ २४ ॥ जयास कोणाचें सोसेना। तयाची निःकांचन वासना। धीकारिल्या धीकारेना। तोचि महापुरुष ॥ २५ ॥ मिथ्या शरीर निंदिलें। तरी याचें काय गेलें। ज्ञात्यासी आणि जिंतिलें। देहबुद्धीनें ॥ २६ ॥ हें अवघें अवलक्षण। ज्ञाता देहीं विलक्षण। कांहीं तरी उत्तम गुण। जनीं दाखवावे ॥ २७ ॥ उत्तम गुणास मनुष्य वेधे। वाईट गुणासी प्राणी खेदे। तीक्ष्ण बुद्धि लोक साधे। काय जाणती ॥ २८ ॥ लोकीं अत्यंत क्षमा करिती। आलिया लोकांचे प्रचीती। मग ते लोक पाठी राखती। नाना प्रकारीं ॥ २९ ॥ बहुतांसी वाटे मी थोर। सर्वमान्य पाहिजे विचार। धीर उदार गंभीर। महापुरुष ॥ ३० ॥ जितुके कांहीं उत्तम गुण। तें समर्थाचें लक्षण। अवगुण तें करंटलक्षण। सहजचि जालें ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सदेवलक्षणनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ मातीचे देव धोंड्याचे देव। सोन्याचे देव रुप्याचे देव। काश्याचे देव पितळेचे देव। तांब्याचे देव चित्रलेपें ॥ १ ॥ रुवीच्या लांकडाचे देव पोंवळ्यांचे देव। बाण तांदळे नर्मदे देव। शालिग्राम काश्मिरी देव। सूर्यकांत सोमकांत ॥ २ ॥ ताम्रनाणीं हेमनाणीं। कोणी पूजिती देवार्चनीं। चक्रांकीत चक्रतीर्थींहूनी। घेउनी येती ॥ ३ ॥ उदंड उपासनेचे भेद। किती करावे विशद। आपलाले आवडीचा वेध। लागला जनीं ॥ ४ ॥ परी त्या

चिंता वाहतो. ज्याला कोणाचें उणें पाहवत नाहीं, ज्याची वासना निष्कांचन (निर्लोभ) असते, कोणी कितीही धिक्कार केला तरी जो अंतरीं निश्चळ असतो तोच महापुरुष होय. नाशवंत व मिथ्या-देहाची कोणीं निंदा केली तरी याचें कांहीं जात नाहीं. ज्ञाता असून देहबुद्धीनें जिंकला गेला असें कधींही होत नाहीं. देहबुद्धि हें अवलक्षण (करंट्याची खूण) आहे, ज्ञाता जो आहे तो आपण देहाहून वेगळे (विलक्षण) आहोंत हें पूर्ण जाणतो. मनुष्यानें कांहीं तरी उत्तम गुण जनांत प्रगट करावेत. उत्तम गुणांस मनुष्यमात्र वेधतो, वाईट गुण लोकांस खेदकारक होतात. साध्या लोकांना ज्ञात्याच्या तीक्ष्ण बुद्धीची खोली काय समजणार ? म्हणून ज्ञाता (चिडचिड न करितां क्षमा करितो) लोकांचे अवगुण शांतपणें पोटांत घालतो व ही याची क्षमाशीलता अनेक प्रसंगीं लोकांच्या प्रत्ययास आली म्हणजे लोक उत्तम प्रकारें त्याची पाठ राखतात – त्याचें अनुयायित्व पत्करतात. बहुतेक लोक स्वतःसच थोर समजतात ; पण जो सर्वमान्य आहे म्ह० ज्याला सर्व लोक थोर समजतात तोच खरा थोर होय. महापुरुष निरंतर धीर, उदार व गंभीर असतो. जितके कांहीं उत्तम गुण आहेत ते सारे समर्थांचे (भाग्यवंतांचे) आहेत, याच्या उलट जे दोष म्ह० अवलक्षणें आहेत ते सारे करंट्याचे होत (१९–३१). [द० १९, स० ४]

मातीचे देव, पाषाणाचे देव, सोन्यारुप्याचे देव, कांश्यापितळेचे देव, तांब्याचे देव, चित्रलेप म्ह० तसबिरींत किंवा भिंतीच्या चित्रांत काढलेले देव, रुईच्या लांकडाचे किंवा पोवळ्यांचे देव, बाण, तांदळे, नर्मदे (नर्मदेच्या पात्रांतून आणलेले पाषाणदेव), काश्मिरी दगडाचे देव, सोमकांत व सूर्यकांत मणि, तांब्याचीं किंवा सोन्याचीं नाणीं, चक्रतीर्थांतून आणलेले चक्रांकित देव इ० अनेक देवांची लोक देवार्चनांत पूजा करितात. उपासनेचे प्रकार अनेक आहेत, ते कोठवर विशद करून दाखवावेत ? जो तो आपले आवडीच्या छंदाप्रमाणें पूजा करीत असतो पण त्या सर्वांचें कारण मूळमाया होय, तिचें स्मरण

सकळांचेंहि कारण । मूळीं पाहावें स्मरण । तया स्मरणाचे अंश जाण । नाना दैवतें ॥ ५ ॥ मूळीं द्रष्टा देव तो येक । त्याचे जाहले अनेक । समजोन पाहातां विवेक । उमजों लागे ॥ ६ ॥ देहावेगळी भक्ति फावेना । देहावेगळा देव पावेना । याकारणें मूळ भजना । देहचि आहे ॥ ७ ॥ देह मुळींच केला वाव । तरी भजनासी कैंचा ठाव । म्हणोनी भजनाचा उपाव । देहात्मयोगें ॥ ८ ॥ देहेंविण देव कैसा भजावा । देहेंविण देव कैसा पुजावा । देहाविण महोत्सव कैसा करावा । कोण्या प्रकारें ॥ ९ ॥ अन्न गंध पत्र पुष्प । फल तांबोल धूप दीप । नाना भजनाचा साक्षेप । कोठें करावा ॥ १० ॥ देवाचें तीर्थ कैसें घ्यावें । देवासी गंध कोठें लावावें । मंत्रपुष्प तरी वाहावें । कोणे ठाईं ॥ ११ ॥ म्हणोनी देहाविण आडतें । अवघें सांकडेंचि पडतें । देहा-करितां घडतें । भजन कांहीं ॥ १२ ॥ देव देवता भूतें देवतें । मूळींचें सामर्थ्य आहे तेथें । अधिकारें नानादेवतें । भजत जावीं ॥ १३ ॥ नाना-देवीं भजन केलें । तें मूळपुरुषासी पावलें । याकारणें सन्मानिलें । पाहिजे सकळ कांहीं ॥ १४ ॥ मायावली फांपावली । नाना देहफळीं लगडली । मूळींची जाणीव कळों आली । फळामध्यें ॥ १५ ॥ म्हणोनी येळील न करावें । पाहाणें तें येथेंचि पाहावें । ताळा पडतां राहावें । समाधानें ॥ १६ ॥ प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती । नाना अनुमानीं पडती । जेथें तेथें ॥ १७ ॥ लोकांची पाहातां रीती । लोक देवार्चनें करिती । अथवा क्षेत्रदेव पाहाती । ठाईं ठाईं ॥ १८ ॥ अथवा नाना अवतार । ऐकोनी धरिती निर्धार । परी

करावें. स्मरण, आदिस्फूर्ति, मूळमाया—हा मुख्य देव होय. ह्या मूळपुरुषाचे अंश नाना देवदेवता होत (१–५). मूळीं द्रष्टा देव एक आहे, त्याचेच अनेक झाले आहेत हें विवेकानें समजून घ्यावें म्हणजे उमजूं लागतें. देहावेगळी भक्ति करितां येत नाहीं, देहावीण देवाची प्राप्ति होत नाहीं म्हणून भजनाला मूळकारण देह आहे. देहच मुळीं मिथ्या केला म्हणजे भजन सरलें, म्हणून देहावीण भजनोपाय नाहीं. भजनपूजन, महोत्सव, गंधपत्र, पुष्पफळ, तांबूल, धूपदीप, पूजासाहित्य, इ० सर्व देहाधारेंच होतें. देवाचें तीर्थ कसें घ्यावें, गंध कोठें लावावें, मंत्रपुष्प कोणें ठायीं वहावें—म्हणून देहावांचून सर्व कांहीं आडतें, देह आहे म्हणून भजन घडतें, देवदेवता, भूतें, दैवतें यांच्या ठिकाणीं तरी मूळपुरुषाचेंच सामर्थ्य आहे म्हणून त्याचें अधिकारानुसार भजन करावें. अनेक देवांचें भजन केलें तरी तें मूळपुरुषालाच पावतें म्हणून तें अवश्य करून सर्व देवांचा संतोष ठेवला पाहिजे. मूळमायेपासून सृष्टि वाढतां वाढतां नाना देहांपर्यंत वाढली आहे म्ह० देह हें मूळमायावल्लीचें फळ आहे. म्हणून मूळमायेंतली जाणीव सर्व देहांत प्रगटली आहे. म्हणून नानादेवांच्या पूजनाचा कंटाळा (येळील) करूं नये, मूळपुरुष येथेंच पाहावा व ताळा घेऊन समाधानानें राहावें म्ह० अनेक देवदेवतांत मूळपुरुषाचा तंतु आहे हें जाणून त्याच्या स्मरणानें समाधान पावावें (६–१६). प्राणी संसार सोडून देवाला धुंडीत फिरतात व जेथें तेथें अनुमानांत म्ह० संशयांत पडतात. लोकरूढी पाहिली तर लोक देवार्चनें करितात किंवा अनेक क्षेत्रांत जाऊन क्षेत्रदेव पाहतात, किंवा अवतारचरित्रें ऐकून एखाद्या अवतारावर विश्वास ठेवून राहतात, किंवा हे होऊन गेलेले

तें अवघें सविस्तर । होऊन गेलें ॥ १९ ॥ येक ब्रह्माविष्णुमहेश । ऐकोन म्हणती हे विशेष । गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ॥ २० ॥ देवासी नाहीं थानमान । कोठें करावें भजन । हा विचार पाहातां अनुमान । होत जातो ॥ २१ ॥ नसतां देवाचें दर्शन । कैसेन होइजे पावन । धन्य धन्य ते साधुजन । सकळही जाणती ॥ २२ ॥ भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना । मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ २३ ॥ कर्तृत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पाहावें । तरीच कांहींयेक पडे ठावें । गोप्यगुह्य ॥ २४ ॥ तें दिसेना ना भासेना । कल्पांतींहि नासेना । सुकृतावेगळें विश्वासेना । तेथें मन ॥ २५ ॥ उदंड कल्पिते कल्पना । उदंड इच्छिते वासना । अभ्यंतरीं तरंग नाना । उदयातें पावती ॥ २६ ॥ म्हणोनी कल्पनारहित । तेचि वस्तु शाश्वत । अंत नाहीं म्हणोन अनंत । बोलिजे तया ॥ २७ ॥ हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोनी तेथेंचि राहावें । निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ॥ २८ ॥ नाना लीळा नाना लाघवें । तीं काय जाणिजे बापुड्या जीवें । संतसंगें स्वानुभवें । स्थिति बाणे ॥ २९ ॥ ऐसी सूक्ष्म स्थिति गती । कळतां चुके अधोगती । सद्गुरुचेन सद्गती । तत्काळ होते ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहमान्यनिरूपणनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं । कां जे विवरविवरों चुकी । पडोंच नेदी ॥ १ ॥ जो जो संदेह वाटे जना । तो तो कदापी करीना । आदि अंत अनुमाना । आणून सोडी ॥ २ ॥ स्वता

अवतार ज्यांचे त्या ब्रह्माविष्णुमहेशाला भजतात – हें सर्व ठीक आहे, पण हे देव गुणांतले असल्यामुळें गुणातीत जगदीशाला पाहिलें पाहिजे. देवाला ठावठिकाण नाहीं मग त्याचें भजन कोठें करावें असें म्हणाल तर संशयाच्या गोत्यांत पडाल. देवाचें दर्शन झालें नाहीं तर पावन कसे व्हाल म्हणून उपासनेचा पूर्ण विचार करणारे व मुख्य देवाला जाणणारे संत धन्य होत! पृथ्वीवर अनेक देव आहेत. त्या देवांची भीड तुटत नाहीं व मुख्य देव कांहीं कळत नाहीं. कर्तृत्व परतें सारून मग निर्गुण निश्चळ देवाला पाहावें तरच या अध्यात्मांतलें कांहीं रहस्य उलगडेल. तो मुख्य देव (निर्गुण ब्रह्म) दिसत नाहीं, भासत नाहीं, कल्पांतींही नासत नाहीं (अविनाशी आहे) व अत्यंत पुण्य संग्रहीं असल्यावांचून तेथें मन विसंबत नाहीं. मनुष्य देहबुद्धीवर आहेत तोंपर्यंत अनंत कल्पना व अनंत वासना यांचे तरंग अंतरीं उठत असतात म्हणून देहातीत होऊनच निर्विकल्प शाश्वत अनंत परब्रह्म वस्तु मिळते हें ज्ञानदृष्टीनें पाहावें व पाहून तेथेंच तन्मय होऊन राहावें व त्या निजात्म-वस्तूच्या निदिध्यासानें संगत्याग करून तद्रूप व्हावें. त्या तद्रूपतेचें लीलालाघव काय वानावें ? तो आनंद बापड्या जीवांस (देहबुद्धिवंतांस) काय ठाऊक ? सत्संगानें व स्वानुभवानेंच ती स्थिति बाणते. त्या सूक्ष्म स्थितिगतींचा अपरोक्षानुभव आला कीं अधोगति चुकते. सद्गुरुप्रसादानें ही सद्गति लाभते (१७–३०). [द० १९, स० ५]

जे परमार्थी आणि विवेकी असतात त्यांचें करणें लोकांत मान्य होतें, कांकीं ते पूर्ण विचार करून आपल्या कामांत चूक पडूंच देत नाहींत. लोकांच्या मनांत संशय उठतील असें तो कांहींच करीत नाहीं, प्रत्येक कार्याचा आरंभ व

निस्पृह असेना । त्याचें बोलणेंचि मानेना । कठीण आहे जनार्दना । राजी राखणें ॥ ३ ॥ कोणी दाटून उपदेश देती । कोणी मध्यावर्ती घालिती । ते सहजचि हलु पडती । लालचीनें ॥ ४ ॥ जयास सांगावा विवेक । तोचि जाणावा प्रतिकुंचक । पुढें पुढें नासक । कारभार होतो ॥ ५ ॥ भावास भाऊ उपदेश देती । पुढें पुढें होते फजीती । वोळखीच्या लोकांत महंती । मांडूंचि नये ॥ ६ ॥ पहिलें दिसे परी नासे । विवेकी मान्य करिती कैसे । अविवेकी ते जैसे तैसे । मिळती तेथें ॥ ७ ॥ भ्रतार शिष्य स्त्री गुरु । हाही फटकाळ विचारु । नाना भ्रष्टाकारी प्रकारु । तैसाचि आहे ॥ ८ ॥ प्रगट विवेक बोलेना । झांकातापा करी जना । मुख्य निश्चय अनुमाना । आणूंच नेदी ॥ ९ ॥ हुकीसरिसा भरीं भरे । विवेक सांगतां न धरे । दुरीदृष्टीचे पुरे । साधु नव्हेती ॥ १० ॥ कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ॥ ११ ॥ परांतर रक्षायाचीं कामें । बहुत कठीण विवेकवर्मे । स्वइच्छेनें स्वधर्में । लोकराहाटी ॥ १२ ॥ आपण तुरुक गुरु केला । शिष्य चांभार मेळविला । नीच यातीनें नासला । समुदाव ॥ १३ ॥ ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ १४ ॥ उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ १५ ॥ अक्षर बरें वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें । गाणें नाचणें अवघेंचि बरें ।

पर्यवसान याचा आधींच विचार करितो. स्वतः जो निःस्पृह (निरपेक्ष) नाहीं त्याचें बोलणें कोणी मानीत नाहीं, जनीजनार्दनाला (लोकांना) राजी राखणें कठीण आहे. कोणी बलात्कारानें उपदेश देतात, कोणी मध्यस्थ उभे करितात; पण त्यांचा लोभिष्टपणा मागें पुढें कळून येऊन त्यांचें वजन नाहींसें होतें. ज्यांना ते उपदेश करितात तेच प्रतिकूल होतात, पुढें तर त्यांचा सारा कारभार नासून जातो. भाऊ भावाला उपदेश देतात, पुढें फजीतवाडा होतो; म्हणून ओळखीच्या लोकांत महंती मांडूं नये. आरंभीं थाटमाट वाढतो पण पुढें तो टिकत नाहीं—तो विवेकी शिष्यांना मान्य होत नाहीं, अविचारी लोक कसेबसे टिकून राहतात. नवऱ्याला शिष्य करून बायकोनें त्याचें गुरुत्व घ्यायचें हाही प्रकार फाजीलपणाचाच आहे. अनेक भ्रष्टपणाचे प्रकार आहेत त्यांतलाच हा एक. लोकांना उघड विचाराचा मार्ग दाखवीत नाहीं, झांकून उपदेश देतो, मुख्य निश्चय (आत्मनिश्चय) करून देत नाहीं, लहरीसारखा एखादा प्रकार करितो, कोणाचा विचार मनावर घेत नाहीं—तो कांहीं दूरदर्शी साधु नव्हे (१–१०). कोणाला कांहीं न मागतां निरपेक्षपणानें लोक भक्तिपंथाला लावावे, त्यांचा विवेक चेतवून त्यांना भजनाला लावावें. परांतर रक्षावयाचीं विवेकवर्मे कळणें कठीण आहे. स्वइच्छेनें व स्वधर्मानें लोकराहाटी चालू करावी. गुरु म्लेंच्छ व शिष्य चांभार—अशा नीच संगतीनें लोकसमुदाय भ्रष्ट होतो. ब्राह्मणांच्या मंडळ्या मिळवाव्या, भक्तमंडळ्या मानाव्या व संतमंडळ्या सर्वत्र शोधाव्या. उत्कृष्ट आणि भव्य असेल तेंच घ्यावें, मिळमिळित सर्व त्यागावें व निस्पृहपणाच्या बाण्यानें त्रैलोक्यांत विख्यात व्हावें (११–१५). अक्षर सुंदर, वाचन स्पष्ट, अर्थ सांगणें प्रांजळ, गाणेंनाचणें (कीर्तनप्रसंगीं) व पाठांतर चांगलें, दीक्षा

पाठांतर ॥ १६ ॥ दीक्षा बरी मित्री बरी । तीक्ष्ण बुद्धी राजकारणीं बरी । आपणास राखे नानापरी । अलिप्तपणें ॥ १७ ॥ अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेधु । प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा ॥ १८ ॥ दुर्जनासी राखों जाणे । सज्जनासी निववूं जाणे । सकळांचे मनींचें जाणे । ज्याचें त्यापरी ॥ १९ ॥ संगतीनें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे । अखंड अभ्यासीं लगटे । समुदाव ॥ २० ॥ जेथें तेथें नित्य नवा । जनासी वाटे हा असावा । परंतु लालचीचा गोंवा । पडोंच नेदी ॥ २१ ॥ उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन । उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ॥ २२ ॥ उत्कट निस्पृहता धरिली । त्याची कीर्ति दिगंतीं फांकली । उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ २३ ॥ कांहीं एक उत्कटेंविण । कीर्ति कदापी नव्हे जाण । उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ॥ २४ ॥ नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा । प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ॥ २५ ॥ याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें । भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २६ ॥ आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तत्काळ । होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ २७ ॥ विवेकामध्यें सांपडेना । ऐसें तों कांहींच असेना । येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ २८ ॥ अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहातां काय उणें तेथें । येकांतेंविण प्राणियांतें । बुद्धि कैंची ॥ २९ ॥ येकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा । येथून तेथवरी गोंवा । कांहींच नाहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बुद्धिवादनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

व मैत्री उत्तम, राजकारणांत प्रविष्ट होणारी बुद्धि तीक्ष्ण, असे गुण अंगीं असून व लोककार्यांत त्यांचा उपयोग करून आपलें अलिप्तपण पुरें राखतो. हरिकथेचा अखंड हव्यास असून लोकांना नामस्मरणाचा वेध लावतो व सूर्यप्रकाशासारखा स्वच्छ व उघड ज्ञानबोध करितो. दुर्जनांना मिळवून घेतो, सज्जनांना शांतिसुख देतो, ज्याचें त्यापरी सर्वांचें मनोगत जाणतो. त्याच्या संगतीनें मनुष्यांचा स्वभाव पालटून त्यांच्यांतल्या उत्तम गुणांचा उठाव होतो व हजारों लोक अभ्यास-योगाला लागतात. हा जाईल तेथें नित्य नवा वाटून सर्वांस हवाहवासा होतो, पण स्वतः कोणत्याच लालचींत सांपडत नाहीं. भक्ति, ज्ञान, चातुर्य, भजन, योग, अनुष्ठान, निस्पृहता हे सर्वच गुण उत्कट असल्यामुळें त्याची कीर्ति भूमंडळावर फांकते व त्याच्या उत्कट भक्तीनें प्राणिमात्र सुखी होतात. कोणता तरी गुण उत्कट असल्यावांचून कीर्ति होत नाहीं. नुसतें वणवण हिंडून काय होणार आहे ? (१६–२४). देहाचा भरंवसा नाहीं, आयुष्य केव्हां संपेल याचा नेम नाहीं, कोण्या वेळीं कोण प्रसंग येईल काय सांगावें ? म्हणून सावधान असावें, होईल तितकें सत्कर्म करावें, भगवत्कीर्तीनें भूमंडळ भरावें. जें अनकूळ (होण्यासारखें) तें तत्काळ करावें, होण्यास दुर्घट असेल त्याचा पुरा विचार करावा. विवेकानें कार्य होत नाहीं असें कांहींच नाहीं, म्हणून एकांतांत विवेकानें पुरा विचार करावा. जेथें निरंतर तजविजा (उपाययोजना) व चाळणा (विचार) चालली आहे तेथें उणें काय आहे ? (अशक्य काय आहे ?) एकांतावांचून मनुष्याला बुद्धि सुचावी कशी ? म्हणून एकांतीं विचार करावा ; आत्माराम ओळखावा म्हणजे आरंभापासून शेवटपर्यंत कोठेंच गुंता उरणार नाहीं (२५–३०). [द० १९, स० ६]

॥ श्रीराम ॥ कथेचें घमंड भरून द्यावें । निरूपणीं विवरावें । उणें पडों नेदावें । कोणीयेकविषीं ॥ १ ॥ भेजणार खालीं पडिला । तो भेजणारें जाणितला । नेणता लोक उगाच राहिला । टकमकां पाहात ॥ २ ॥ उत्तर विलंबीं पडिलें । श्रोतयांस कळों आलें । म्हणिजे महत्त्व उडालें । वक्तयाचें ॥ ३ ॥ थोडें बोलोन समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें । मनुष्य वेधींच लावणें । कोणी येक ॥ ४ ॥ सोसवेना चिणचिण केली । तेथें तामसवृत्ती दिसोन आली । अवघी आवडी उडाली । श्रोतयांची ॥ ५ ॥ कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगिले । क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ ६ ॥ शिष्य विकल्पें रान घेतो । गुरु मागें मागें धांवतो । विचार पाहों जातां तो । विकल्पचि अवघा ॥ ७ ॥ आशाबद्ध क्रियाहीन । नाहीं चातुर्याचें लक्षण । ते महंतीची भणभण । बंद नाहीं ॥ ८ ॥ ऐसे गोसावी हलु पडती । ठाईं ठाईं कष्टी होती । तेथें संगतीचे लोक पावती । सुख कैचें ॥ ९ ॥ जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकांस हव्यास उपजे । लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ॥ १० ॥ परलोकीं वास करावा । समुदाव उगाच पाहावा । मागण्याचा तगादा न लावावा । कांहीं येक ॥ ११ ॥ जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक । रात्रंदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ॥ १२ ॥ जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला । अवघेच नष्ट येकला भला । काशावरूनी ॥ १३ ॥ वोस मुलकीं काय पाहावें । लोकांवेगळें कोठें राहावें । तऱ्हे

हरिकीर्तनप्रसंगीं सगुणप्रेमाची लयलूट (घमंड) करावी व करवावी आणि निरूपणप्रसंगीं अध्यात्म सांगावें, कोणत्याच गोष्टींत कमतरता राहों देवों नये. भजन करणारा किंवा ज्ञाता कोठें घसरला – चुकला तर तज्ज्ञालाच तें कळतें, सामान्य श्रोते टकमका पाहत राहतात. उत्तर देण्यास विलंब लागला कीं श्रोत्यांना याची तयारी नाहीं हें कळून याचें महत्त्व उरत नाहीं. थोडें बोलून शंकासमाधान करावें, राग आला तरी तो दाबून मन राखावें, सर्व प्रकारच्या लोकांना चटक लावावी. हरिदास चिणचिण करूं लागला म्हणजे त्याचा रागीटपणा दिसून येतो व श्रोत्यांची आवड नाहींशी होते. कोणाचें मन सुप्रसन्न झालें व कोणाचें दुखवलें हें वक्त्यानें क्षणक्षणा पाहिलें पाहिजे. शिष्याच्या मनांत विकल्प उभा राहिला कीं वनांत निघून जातो व गुरु त्याच्या मनधरणीसाठीं त्याच्या मागें धांवत जातो; येथें दोघेही विकल्पीच ठरतात. आशाळभूत, आचारभ्रष्ट व चातुर्यहीन अशा महंतीची (गुरुपणाची) फजीती उडते, तिला कांहीं बंद (मर्यादा) राहत नाहीं. असे गोसावी म्ह० हरिदास किंवा गुरु हलु पडतात म्ह० त्यांचें महत्त्व नाहींसें होतें, मग ते कष्टी होतात, तेव्हां त्यांच्या संगतीच्या लोकांना सुख कोठून होणार? (१–९). सर्वत्र कीर्ति पसरावी, सर्वांना हव्यास (आवड) वाटावा, लोक राजी राखून सर्व कांहीं करावें. दूरदेशीं जाऊन राहावें व तेथून आपले सांप्रदायिक कसे वागतात तें पाहावें. मागण्याचा सपाटा लावूं नये. जिकडे जग तिकडे जगन्नायक हें तत्त्व कळलें पाहिजे. विचारी लोक हेंच अहर्निश संभाळतात. जो जो मनुष्य दृष्टीस पडला तो तो नष्ट असा वाटला तर मग 'सारेच नष्ट आणि तूंच एकटा भला कशावरून' असेंच याला कोणीही विचारील. ओसाड प्रदेशांत जाऊन काय पाहणार? लोकांना सोडून कोठें राहणार? तऱ्हेवाईकपणा खोटा, म्हणून

खोटी सांडतें घ्यावें । कांहीं येक ॥ १४ ॥ तस्मात लोकिकीं वर्ततां न ये । तयास महंती कामा नये । परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावें ॥ १५ ॥ आपणासी बरें पोहतां न ये । लोक बुडवायाचें कोण कार्य । गोडी आवडी वायां जाय । विकल्पचि अवघा ॥ १६ ॥ अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें । प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ॥ १७ ॥ मंद हळु हळु चालतो । चपळ कैसा आटोपतो । अरबी फिरवणार तो । कैसा असावा ॥ १८ ॥ हीं धकाधकीचीं कामें । तीक्ष्ण बुद्धीचीं वर्में । भोळ्या भावार्थें संभ्रमें । कैसें घडे ॥ १९ ॥ सेत केलें परी वाहेना । जवार केलें परी फिरेना । जन मेळविलें परी धरेना । अंतर्यामीं ॥ २० ॥ जरी चढती वाढती आवडी उठे । तरी परमार्थ प्रगटे । घसघस करितां विटे । सगट लोकु ॥ २१ ॥ आपलें लोकांस मानेना । लोकांचें आपणांस मानेना । अवघा विकल्पचि मना । समाधान कैचें ॥ २२ ॥ नासक दीक्षा सिंतरु लोक । तेथें कैंचा असेल विवेक । जेथें बळावला अविवेक । तेथें राहणें खोटें ॥ २३ ॥ बहुत दिवस श्रम केला । सेवटीं अवघाचि व्यर्थ गेला । आपणास ठाकेना गल्बला । कोणें करावा ॥ २४ ॥ संगीत चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघाचि संताप । क्षणक्षणा विक्षेप कोप । किती म्हणोन सांगावा ॥ २५ ॥ मूर्ख मूर्खपणें भरंगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कळहो करिती । होते दोहींकडे फजिती । लोकांमध्यें ॥ २६ ॥ कारभार आटोपेना करवेना । आणि उगेंहि राहेना । याकारणें सकळ जना । काय म्हणावें ॥ २७ ॥ नासक उपाधीस

कांहींतरी पड घेत असावी. म्हणून ज्याला लौकिकांत वागतां येत नाहीं त्यानें महंती मांडूं नये, त्यानें परलोकसाधनाचा उपाय जें श्रवण तेवढें करून असावें (१०–१५). आपणाला जर पोहतां येत नाहीं तर लोक कांसेला लावून त्यांना तरी बुडवूं नये. प्रेमभावाची त्यानें हानि होऊन विकल्प वाढतो. अभ्यासानें पुरी तयारी झाली असेल तरच प्रगट व्हावें, नाहींतर झांकून असावें, प्रगट होऊन अपकीर्ति करून घ्यावी हें ठीक नाहीं. मंद असतो तो रेंगाळत चालतो, त्याला चपळाच्या बरोबर कसें धांववणार ? अरबी घोडा फिरविणारा चपळच असायला पाहिजे. टक्केटोणपे खाण्याचीं कामें तीक्ष्ण बुद्धीशिवाय व्हायचीं नाहींत, भोळ्या भावार्थानें व धांदलपट्टीनें हीं रेटतां येण्यासारखीं नाहींत. शेत पेरून मशागत करायची नाहीं, जवाहिऱ्याचा धंदा काढून (घरकोंबडेपणामुळें) चौमुलखीं फिरायचें नाहीं, माणसें जमवून राजी राखायचीं नाहींत, मग हें व्हावें कसें ? लोकांत अधिकाधिक प्रेम वाढत जाईल तरच परमार्थ फैलावेल, घसघस झाली तर लोकांचीं मनें विटतील. आपलें लोकांना व लोकांचें आपणाला जर मानवत नाहीं, दोहींकडे विकल्पच वाढत जातो, तर मग समाधान कुठलें ? (१६–२२) विध्वंसक दीक्षा आणि लबाड लोक दोन्ही एकत्र झाले तेथें विचार कोठून दिसावा ? आणि जेथें अविचाराचें प्राबल्य झालें तेथें राहणें अनुचित होय. पुष्कळ दिवस कष्ट करून शेवटीं फुकट गेले. आपल्याला उपाधि जर पेलत नाहीं तर करावीच कशाला ? सुरळित (संगीत) चालला तर तो व्याप नाहीं तर सारा संताप. क्षणक्षणाला विक्षेप आणि कोप किती म्हणून सांगावा ? मूर्ख मूर्खपणानें घसरतात व शहाणे शहाणपणाच्या गर्वानें भांडतात ; दोहींकडे फजीतीच ! कार्याचा आटोप नाहीं, कर्तृत्व नाहीं आणि स्वस्थही बसवत नाहीं, या लोकांना काय म्हणावें ? नाशक उपाधि टाकून द्यावी, वय

सोडावें । वय सार्थकीं घालावें । परिभ्रमणें कंठावें । कोठें तरी ॥ २८ ॥ परिभ्रमण करीना । दुसऱ्याचें कांहींच सोसीना । तरी मग उदंड यातना । विकल्पाची ॥ २९ ॥ आतां हें आपणाचिपासीं । बरें विचारावें आपणासी । अनकूळ पडेल तैसी । वर्तणूक करावी ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे यत्ननिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ सृष्टीमध्यें बहु लोक । परिभ्रमणें कळे कौतुक । नाना प्रकारींचे विवेक । आडळों लागती ॥ १ ॥ किती प्रपंची जन । अखंड वृत्ती उदासीन । सुखदुःखें समाधान । दंडळेना ॥ २ ॥ स्वभावेंचि नेमक बोलती । सहजचि नेमक चालती । अपूर्व बोलण्याची स्थिती । सकळांसि माने ॥ ३ ॥ सहजचि ताळज्ञान येतें । स्वभावेंचि रागज्ञान उमटतें । सहजचि कळत जातें । न्यायनीतिलक्षण ॥ ४ ॥ येखादा आडळे गाजी । सकळ लोक अखंड राजी । सदा सर्वदा आवडी ताजी । प्राणिमात्रांची ॥ ५ ॥ चुकोन उदंड आडळतें । भारी मनुष्य दृष्टीसी पडतें । महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ६ ॥ ऐसा आडळतां लोक । चमत्कारें गुणग्राहिक । क्रिया बोलणें नेमक । प्रत्ययाचें ॥ ७ ॥ सकळ अवगुणांमध्यें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण । मोठें पाप करंटपण । चुकेना कीं ॥ ८ ॥ ढाळेंचि काम होतें सदा । जें जपल्यानें नव्हे सर्वदा । तेथें पीळपेंचाची आपदा । आडळेचिना ॥ ९ ॥ येकासी अभ्यासितां न ये । येकासी स्वभावेंचि ये । ऐसा भगवंताचा महिमा

सार्थकीं लावावें, कोठें तरी परिभ्रमण करीत असावें. फिरणेंही होत नाहीं व दुसऱ्याचें कांहींच सोसणें होत नाहीं मग विकल्पदुःखांत पडावें. हें सारें आपणापाशींच आहे, आपल्या मनाशींच विचार करावा, अनुकूल वाटेल त्याप्रमाणें वागावें (२३–३०). [द० १९, स० ७]

सृष्टींत अनेक लोक आहेत, त्यांच्या विविधतेचें कौतुक फिरल्यानें चांगलें कळतें ; अनेक प्रकारचे विवेकी आढळतात. कित्येक लोक प्रपंचांत असून उदासीनवृत्तीने राहतात, व सुखदुखःप्रसंगांनीं त्यांचें समाधान भंग पावत नाहीं, त्यांच्या बोलण्याचालण्यांत नेमस्तपणा असतो व त्यांचे बोलणें सर्वांना मानवतें ; तालज्ञान व रागज्ञान त्यांच्याठायीं सहजच असतें ; त्यांचें न्यायनीतीचें लक्षण सहजच कळून येतें. एखादा असा पराक्रमी (गाजी) पुरुष आढळतो कीं त्याला सर्व लोक सर्वकाळ अनुकूल असतात, प्राणिमात्रांना तो नित्य नवा प्रिय वाटतो. चुकून पुष्कळ गोष्टी दृष्टीस पडतात, एखादा उंचकोटीचा किंवा वजनदार (भारी) मनुष्य दृष्टीस पडतो व महंताचीं लक्षणें त्याच्या ठायीं अनायासें सिद्ध असलेलीं दिसून येतात. असे लोक आढळतात कीं त्यांच्या ठिकाणीं विलक्षण गुणग्राहकता दिसून येते, त्यांचें बोलणें चालणें सहज अनुभवसिद्ध असतें. आपले दोष गुणच आहेत असें वाटणें हा सर्व दोषांत महादोष आहे. हा दोष ज्याचे अंगीं आहे त्याचें पूर्वपाप व तज्जन्य दारिद्र्य कधींच टळावयाचें नाहीं. एखाद्याचा प्रभावच (ढाळ) असा असतो कीं दुसऱ्याला जपून जें काम सिद्ध करतां येत नाहीं तें तो सहज करून टाकतो व पीळपेंच वगैरे आडमार्गांत शिरण्याचें त्याला कारणच पडत नाहीं. एखाद्याला अभ्यास करून सायासानें येत नाहीं तें दुसऱ्याला अनायासें येतें. असा भगवंताचा महिमा अतर्क्य

काय । कैसा कळेना ॥ १० ॥ मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं वेढा लागती । नाना चुकीची फजीती । चहूंकडे ॥ ११ ॥ याकारणें चुकों नये । म्हणिजे उदंड उपाय । अपायाचा उपाय । चुकतां होय ॥ १२ ॥ काय चुकलें तें कळेना । मनुष्याचें मनचि वळेना । खवळला अभिमान गळेना । दोहींकडे ॥ १३ ॥ अवघे फडचि नासती । लोकांचीं मनें भंगती । कोठें चुकते युक्ति । कांहीं कळेना ॥ १४ ॥ व्यापेंवीण आटोप केला । तो अवघा घसरतचि गेला । अकलेचा बंद नाहीं घातला । दुरीदृष्टीनें ॥ १५ ॥ येखादें मनुष्य तें सिळें । त्याचें करणेंचि बावळें । नाना विकल्पाचें जाळें । करून टाकी ॥ १६ ॥ तें आपणासी उकलेना । दुसऱ्यास कांहींच कळेना । नाचे विकल्पें कल्पना । ठाईं ठाईं ॥ १७ ॥ त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊन आटोपाव्या । ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुद्धि ॥ १८ ॥ ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावीना । सावचित करूनियां मना । समाधानें असावें ॥ १९ ॥ धांवधांवों उपाधी वेष्टी । आपण कष्टी लोकही कष्टी । हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची ॥ २० ॥ लोक बहुत कष्टी जाला । आपणही अत्यंत त्रासला । व्यर्थचि केला गल्बला । कासयासी ॥ २१ ॥ असो उपाधीचें काम ऐसें । कांहीं बरें कांहीं काणोसें । सकळ समजोन ऐसें । वर्ततां बरें ॥ २२ ॥ लोकांपासीं भावार्थ कैंचा । आपण जगवावा तयांचा । सेवट उपंढर कोणाचा । पडोंचि नये ॥ २३ ॥ अंतरात्म्याकडे सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच नलगे । नाना प्रकारींचे दगे । चंचळामध्यें ॥ २४ ॥ शुद्ध

आहे (१–१०). मोठमोठीं राजकारणें चुकतात, राजकारणांत डाव अंगावर येऊन (वेढा लागणें) चुकीमुळें लोकांत छीः थू होते, म्हणून चुकूंच नये. चुकीमुळें उपायाचा अपाय होतो, अचूक राजकारण करितां आल्यास पुष्कळ नवीन नवीन उपाय सुचतात. कोठें चूक होते तें कळत नाहीं, मनुष्याचें मन शुद्धीवर येत नाहीं, उभयपक्षीं दुराग्रह सुटत नाहीं. सभा मोडून जातात, लोकांचीं मनें बिथरतात व चूक कोठें होते याची युक्ति कांहीं ध्यानांत येत नाहीं. अंगीं कर्तृत्वशक्ति (व्याप) नसून खटाटोप केला कीं तो फसतच जातो, कांहीं दूरवर विचार करून त्याला अकलेचा बंद (नियमन) घातलेला नसतो. एखादा मनुष्यच उत्साहशून्य (सिळें) असतो, तो सारीं कामें बावळटपणानेंच करितो व संशयांचीं जाळीं उभीं करितो. तीं त्याचीं त्यालाच उकलतां येत नाहींत, दुसऱ्यास त्यांतलें कांहींच कळत नाहीं. त्याच्या मनांतल्या गुप्त कल्पना कोणाला कळायच्या आहेत, कोणी त्यांना बंद घालावा ? ज्याची त्यानेंच बुद्धि दृढ करून त्या आवरल्या पाहिजेत. ज्याला उपाधि आवरतां येत नाहीं त्यानें उपाधि वाढवूं नये, मन स्थिर करून समाधान राखून असावें. धांवाधांव करून उपाधि वाढवून घ्यायच्या आणि आपल्याला व दुसऱ्याला शीण व्हायचा या मनःक्षोभाच्या गोष्टी उपयोगाच्या नाहींत. लोकांना कष्ट व स्वतःलाही कष्ट, मग या उपाधींची उठाठेव हवी कशाला ? (११–२१). उपाधीचें कामच असें आहे कीं कांहीं काम सरळ व्हावें व कांहीं वांकडें (काणोसें) व्हावें. सर्व समजून वागावें हें चांगलें. लोकांपाशीं भावार्थ कसचा ? आपणच तो उत्पन्न करून जगवला पाहिजे. शेवटीं घोंटाळा (उपंढर) उडाला न पाहिजे. सर्व कांहीं चंचलता अंतरात्म्याकडे लागते, सारे दगे फटके

विश्रांतीचें स्थळ । तें येक निर्मळ निश्चळ । तेथें विकारचि सकळ । निर्विकार होती ॥ २५ ॥ उद्वेग अवघे तुटोन जाती । मनासी वाटे विश्रांती । ऐसी दुर्लभ परब्रह्मस्थिती । विवेकें सांभाळावी ॥ २६ ॥ आपणांस उपाधी मुळींच नाहीं । रुणानबंधें मिळाले सर्वही । आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ॥ २७ ॥ जो उपाधीस कंटाळला । तो निवांत होऊन बैसला । आटोपेना तो गल्बला । कासयासी ॥ २८ ॥ कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ । जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे ॥ २९ ॥ उपाधी कांहीं राहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं । नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे उपाधीलक्षणनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ ज्ञानी आणी उदास । समुदायाचा हव्यास । तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥ १ ॥ जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती । प्राणिमात्रांची स्थिती गती । कळों येतें ॥ २ ॥ जरी हा चाळणाचि करीना । तरी कांहींच उमजेना । हिसेबझाडाचि काढीना । दिवाळखोर ॥ ३ ॥ येक मिरासी साधिती । येक सीध्या गमाविती । व्यापकपणाची स्थिती । ऐसी आहे ॥ ४ ॥ जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें । कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजचि येणें ॥ ५ ॥ अखंड राहतां सलगी

त्याजकडे – निर्गुण ब्रह्माकडे कांहींच नाहीं. ब्रह्म हें सर्वांच्या विश्रांतीचें स्थान आहे, तेथें विकारच निर्विकार होतात, लय पावतात, मनाचे संताप तेथें राहत नाहींत, तेथें मनाला विश्रांति मिळते ही परब्रह्मस्थिति विवेकानें पूर्ण संभाळली पाहिजे. आपण मूळींच निरुपाधिक आहोंत, ऋणानुबंधनानें सखेसोयरे सारे जमा होतात. म्हणून कोणी आले काय व कोणी गेले काय याची खंत वाटत नाहीं अशी खंबीरता पाहिजे. उपाधीचा ज्याला कंटाळा येतो त्यानें निवांत होऊन बसावें; जी उपाधी (गल्बला) आवरतां येत नाहीं ती पाहिजे कशाला ? कांहीं काळ गलबल्यांत व कांहीं काळ एकांतांत असा आयुष्यक्रम ठेवावा, म्हणजे आपल्याला विश्रांतिकाळ सांपडतो. उपाधी कांहीं कोणावांचून अडून राहत नाहीं. आत्मसमाधानाएवढें थोर कांहींच नाहीं, तें नरदेहावांचून मिळत नाहीं व नरदेह कांहीं घटकेघटकेला प्राप्त होत नाहीं (२२–३०). [द० १९, स० ८]

ज्ञानी असून उदास असेल आणि समुदायही वाढवायची हौस असेल त्यानें स्वस्थ चित्तानें एकांताचें सेवन करावें. एकांतांत नाना उपाय व युक्त्या सुचतात, अनेक प्रश्नांचें मनन चालू राहतें व प्राणिमात्रांच्या स्थिति व गति (चालू परिस्थिति व होणारी गति) कळून येतात. ही चाळणा म्ह० विचारणा करणार नाहीं तर त्याला कांहींच कळायचें नाहीं व हिशेब करून बाकी शून्य न करणाऱ्या दिवाळखोराप्रमाणें त्याची स्थिति होईल (दिवाळखोर बाकी शून्य न करितां कर्ज व व्याज वाढूं देऊन गोत्यांत येतो तसा हा अनेक प्रश्नांचे उलगडे न करितां बसेल तर अनेक संशयकुतर्कांचा कल्लोळ याचे चित्तांत माजून याचें समाधान सिद्ध राहणार नाहीं). कोणी नवीन मिराशी (जमिनीचे हक्क) मिळवितात व कोणी असलेले (सिद्ध) हक्क गमावून बसतात. उद्योग करणाऱ्यांत दोन्ही प्रकार दिसतात. दुसऱ्याचे मनांतले विचार आधींच कळले असले म्हणजे कृत्रिम करून त्याला आपल्याला चकवितां येणार नाहीं, कृत्रिम (खोटे प्रकार) सहजच

होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते । याकारणें विश्रांती ते । घेतांच नये ॥ ६ ॥ आळसें आळस केला । तरी मग कारभारचि बुडाला । अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥ ७ ॥ उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें । अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥ ८ ॥ चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा । गोंवा मूर्खपणाचा काढावा । हळु हळू ॥ ९ ॥ या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी । राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ १० ॥ नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे । आपणावरी विकल्पाचे गोंवे । पडोंच नेदी ॥ ११ ॥ कांटीनें कांटी झाडावी । झाडावी ते कळों नेदावी । कळकटेपणाची पदवी । असों न द्यावी ॥ १२ ॥ न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें । गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे ॥ १३ ॥ ऐकोनी आवडी लागावी । देखोन बळकटचि व्हावी । सलगीनें आपली पदवी । सेवकामध्यें ॥ १४ ॥ कोणी येक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें । याकारणें ढिलेंपण तें । असोंचि नये ॥ १५ ॥ जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला । जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १६ ॥ अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडलें । याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १७ ॥ मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें

खुंटतील – लोकांच्या संगतींत निरंतर राहिल्यानें सलगी वाढते व अतिपरिचयामुळें अवज्ञा होते, म्हणून एका स्थळीं विश्रांति घेत स्वस्थ राहूं नये – परिभ्रमण करावें (१–६). आळसानें आळस वाढत जाऊन कामें होत नाहींत व समुदाय वाढविण्याचा मनांतला हेतु तसाच राहून जातो. (समुदाय म्ह० सांप्रदायिक लोक, शिष्य किंवा अनुयायी). उपासनेचीं नित्यकर्में लोकांच्या मागें लावून दिलीं म्हणजे कृत्रिमें (कपटाचे उद्योग, ढोंगधत्तुरे) करायला त्यांना फुरसतच राहणार नाहीं. चोराच्या हातांत भांडारगृहाच्या किल्ल्या देऊन त्याला भांडारी करावें, तो घसरला तर त्याला संभाळावें व त्याच्या मनांतील मूर्खपणाचे विचार हळुहळू काढून टाकावे. या गोष्टी कांहीं नवीन आहेत असें नाहीं. कोणालाही दुःख न देतां सर्वांना राजकारणांत युक्तीनें गोंवून घ्यावें, गुंतवावें – नष्टांवर देखरेख करण्यास नष्टांचीच योजना करावी, वाचाळांची तोंडें बंद करण्यासाठीं त्यांना वाचाळच आणून भिडवावे व विकल्पांचे गुंते आपल्यावर येऊं न देतां आपण अलिप्त असावें. कांट्यानें कांटा काढावा, काढावा पण कळूं देऊं नये. कळकटेपणाची (भांडखोरपणाची) पदवी म्ह० भांडणास जागाच ठेवूं नये. न कळूं देतां काम करावें तें तात्काळ सिद्धीस जातें, तें सर्वांस आगाऊच कळलें तर त्यांत नवीनपणाची मौज राहत नाहीं (७–१३). परस्पर ऐकूनच आवड उत्पन्न व्हावी, प्रत्यक्ष आपल्या दर्शनानें ती आवड दृढतर व्हावी व संगत वाढतां वाढतां यांच्या सेवकांत आपला समावेश करून घेण्याची उत्सुकता वाटावी (व याप्रमाणें समुदाय वाढवीत जावा). कोणतेंही काम केलें कीं होतें, न करितां मागें पडतें ; म्हणून ढिलेपणा (चालढकल, दिरंगाई) करूं नये. जो आपल्या कार्यासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहतो त्याचें कार्य बिनसतें, जो स्वतःच कष्ट करून कार्य तडीस नेतो तोच शहाणा समजावा. सर्वांना सारेंच कळलें तर तें कार्य न होतां पडून राहतें, म्हणून असें करूं नये (ज्याच्याकडून जें काम करून घ्यायचें तितकीच त्याला माहिती द्यावी). मुख्य सूत्र आपल्या हातीं ठेवून, करणें तें दुसऱ्यांकडून करवून घ्यावें, अनेक धूर्त

लोकांकरवीं करवावें । कितेक खलक उगवावे । राजकारणामध्यें ॥ १८ ॥ बोलके पहिलवान कळकटे । तयांसींच घ्यावे झटे । दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ १९ ॥ ग्रामण्य वर्मी सांपडावें । रगडून पीठचि करावें । करूनि मागुती सांवरावें । बुडवूं नये ॥ २० ॥ खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें । तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥ २१ ॥ समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा । मठ करूनी ताठा । धरूं नये ॥ २२ ॥ दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे । सज्जनापरीस आळवावे । महत्व देउनी ॥ २३ ॥ जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट । याकारणें ते वाट । बुझून टाकावी ॥ २४ ॥ गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा । ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थी ॥ २५ ॥ तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे । बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥ २६ ॥ हीं धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें । ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ २७ ॥ कोठेंच पडेना दृष्टीं । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी । वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥ २८ ॥ हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा । लौंदापुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥ २९ ॥ धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट । खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ ३० ॥ जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी बरी थाटे । इतुकें होतें परी धणी कोठें । दृष्टीस न पडे ॥ ३१ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे राजकारणनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

(खलक) लोक राजकारणांत गोंवून घ्यावे (उगवावे). भांडखोरांत जे बोलके पुढारी असतील त्यांशींच दोन हात करावे (अनुयायांच्या तोंडीं लागूं नये). दुर्जनांच्या योगानें राजकारण अडून पडेल असें करूं नये. ग्रामकंटक किंवा कुटाळांतले अग्रणी असतील त्यांना वर्मी पकडून त्यांचें रगडून पीठ करावें, पण (याप्रमाणें त्यांना निस्तेज केल्यावर) पुन्हां गोड वाणीनें मिळवून घ्यावें, पार रसातळाला नेऊन नष्टांश करूं नये. खळदुर्जनांच्या भीतीनें राजकारण संभाळलें नाहीं तर बरेंवाईट सर्व बाहेर पडून सर्व कार्यनाश होईल. समुदाय मोठा करायची हौस असेल तर आक्रमशक्ति (तणावा) दांडगी असायला पाहिजे, मठ करून ताठ्यांत राहूं नये. दुर्जन प्राणी आळवावे पण प्रगट करूं नयेत, त्यांना सज्जनांसारखाच मोठेपणा देऊन प्रसन्न ठेवावें. लोकांत दुर्जन प्रगट केले कीं सर्वकाळ खटपट उभी राहिली म्हणून समजावें, म्हणून ती वाटच मोडून टाकावी (१४–२४). शत्रूच्या फौजा पाहतांच रणवीरांचे बाहू स्फुरण पावावेत असा लोककैवारी व परमार्थी राजा असावा, त्याला पाहतांच दुष्टांना धाक सुटावा, त्याच्या प्रतापाच्या तडाख्यांचा त्यांना अनुभव यावा ; बंडपाखांडें पार मोडून जावींत. हीं धूर्तपणाचीं कामें आहेत. राजकारण निर्धारानें करावें, ढिलेपणाच्या डौलावर जाऊं नये. तो सहसा लोकांच्या दृष्टीस पडत नाहीं पण त्याच्या गोष्टी घरोघर सांगतात, वाग्विलासानें तो जनमन वेधून घेतो, हुंब्याला (रडक्याला) हुंबा लावून द्यावा, टोणप्यापुढें टोणपा आणावा. तसेंच लौंदास लौंद (लबाड), धटाला धट (दांडगा), उद्धटाला उद्धट, खटनटाला खटनट – तात्पर्य, जशास तसा भेटला कीं सभेचा रंग भरतो. इतकें परस्पर होत असतें, पण धणी मात्र कोठें दिसत नाहीं (२५–३१). [द० १९, स० ९]

॥ श्रीराम ॥ जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा । जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ॥ १ ॥ सृष्टीमध्यें उत्तम गुण । तितुकें चाले निरूपण । निरूपणावीण क्षण । रिकामा नाहीं ॥ २ ॥ चर्चा आशंका प्रत्युत्तरें । कोण खोटें कोण खरें । नाना वक्तृत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ॥ ३ ॥ भक्तिमार्ग विशद कळे । उपासनामार्ग आकळे । ज्ञानविचार निवळे । अंतर्यामीं ॥ ४ ॥ वैराग्याची बहु आवडी । उदास वृत्तीची गोडी । उदंड उपाधी तरी सोडी । लागोंच नेदी ॥ ५ ॥ प्रबंधाचीं पाठांतरें । उत्तरासी संगीत उत्तरें । नेमक बोलतां अंतरें । निववी सकळांचीं ॥ ६ ॥ आवडी लागली बहु जना । तेथें कोणाचें कांहीं चालेना । दळवट पडिला अनुमाना । येईल कैसा ॥ ७ ॥ उपासना करूनियां पुढें । पुरवलें पाहिजे चहूंकडे । भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया ॥ ८ ॥ जाणती परी आडळेना । काय करितो तें कळेना । नाना देशींचे लोक नाना । येऊन जाती ॥ ९ ॥ तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं । कडोविकडीचीं विवरावीं । अंतःकरणें ॥ १० ॥ किती लोक तें कळेना । किती समुदाव आकळेना । सकळ लोक श्रवणमनना- । मध्यें घाली ॥ ११ ॥ फड समजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें । परांतरासी राखणें । सर्वकाळ ॥ १२ ॥ ऐसा ज्याचा दंडक । अखंड पाहाणें विवेक । सावधापुढें अविवेक । येईल कैंचा ॥ १३ ॥ जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहाणे करूनि सोडावे । बहुत जन ॥ १४ ॥ परोपरीं सिकवणें ।

जेथें अखंड नाना प्रकारच्या चर्चा, विचार, धारणा, राजकारण यांचा ऊहापोह चालू आहे, सृष्टींत जे जे उत्कृष्ट गुण आहेत त्यांचें निरूपण चालत आहे; निरूपणाशिवाय एक क्षणही व्यर्थ जात नाहीं; नाना चर्चा, शंकासमाधानें, खऱ्या-खोट्यांचे निर्णय शास्त्राधारासह उत्तम वक्ते करीत आहेत; भक्ति, उपासना, ज्ञान, वैराग्य, उदासीनता, उपाधींत असून अलिप्तपणा इत्यादिकांचें सर्वांना सुलभरीत्या कळेल असें विशद अनुभवसिद्ध विवरण होत आहे; सुंदर काव्यांचीं पाठांतरें, समर्पक उत्तरेंप्रत्युत्तरें, सर्वांचीं अंतरें निवतात अशीं समाधानकारक व्यवस्थित भाषणें ऐकूं येत आहेत, अशा महापुरुषाची जनांला एकदां आवड उत्पन्न झाली कीं त्याच्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं व त्याच्यामागें समुदाय (दळवट) चालला तरी त्याच्या अंतःस्वरूपाचें यथार्थ ज्ञान कोणालाही होत नाहीं (१–७). उपासना पुढें करून म्ह० उपासना वाढविण्यासाठीं तो सर्वत्र संचार करितो व म्हणून भूमंडळीं तो जाईल तिकडे लोक त्याला ओळखतात; ओळखतात पण त्याच्या अंतराचा त्यांना ठाव लागत नाहीं, तो काय करितो हें कळत नाहीं, नाना प्रांतींचे हजारों लोक त्याच्या भेटीस येऊन जातात. तितक्यांना तो वेध लावतो, विवेकविचारानें त्यांचीं अंतःकरणें भरितो, त्यांचीं अर्धवट घरसोडीचीं मनें विवरणाकडे वळवितो. त्याचा समुदाय केवढा मोठा आहे हें कळत नाहीं, मात्र सर्वांना तो श्रवणमननाच्या मार्गाला लावतो. (फड, लोकसमुदाय, सभा) नाना लोकांना गद्यपद्य सांगून त्यांचीं मनें राखून ज्याच्या त्याच्यापरी समजूत पाडतो. अखंड विवेकानें चालणें हाच त्याचा दंडक (वागण्याची रीत). त्या सर्वसावध पुरुषापुढें अविवेक उभा कसा राहील? (८–१३). जितकें कांहीं आपणास कळतें तितकें हळुहळू शिकवून लोकांना शाहणे करावे. परोपरीनें शिकवावें, अडचणीच्या जागा समजून सांगाव्या,

आडणुका सांगत जाणें । निवळ करुनी सोडणें । निस्पृहासी ॥ १५ ॥ होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें । भगवद्भजन राहावें । हा घर्म नव्हे ॥ १६ ॥ आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें । आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ १७ ॥ जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला । जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ १८ ॥ देहाचा अभ्यास बुडाला । म्हणिजे महंत बुडाला । लागवेगें नूतन लोकांला । साहें करावें ॥ १९ ॥ उपाधींत सांपडों नये । उपाधीस कंटाळों नये । निसुगपण कामा नये । कोणीयेकविषीं ॥ २० ॥ काम नासणार नासतें । आपण वेडें उगेंच पाहातें । आळसीं हृदयशून्य तें । काय करूं जाणे ॥ २१ ॥ धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला । नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनी सिकवाव्या ॥ २२ ॥ व्याप होईल तों राहावें । व्याप राहातां उठोन जावें । आनंदरूप फिरावें । कोठें तऱ्ही ॥ २३ ॥ उपाधीपासुनी सुटला । तो निस्पृहपणें बळावला । जिकडे अनकूळ तिकडे चालिला । सावकास ॥ २४ ॥ कीर्ति पाहातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ति नाहीं । केल्याविण कांहींच नाहीं । कोठें तरी ॥ २५ ॥ येरवीं काय राहातें । होणार तितुकें होऊन जातें । प्राणी मात्र अशक्त तें । पुढें आहे ॥ २६ ॥ आधींच तकवा सोडिला । मध्येंच धिंवसा सांडिला । तरी संसार हा सेवटला । कैसा पावे ॥ २७ ॥ संसार मुळींच नासका । विवेकें करावा

निस्पृहांना निःसंदेह करून सोडावें. जें काम आपणाकडून होईल तें आपण करावें न होईल तें दुसऱ्याकडून करवावें, भगवद्भजन म्ह० भक्तिमार्ग अडून राहावें, हा धर्म नव्हे. अखंड भगवद्भजन चालवावें हाच प्राणिमात्रांचा धर्म आहे. भगवद्भजन आपण करावें व दुसऱ्यांकडून करवावें, आपण निरूपण सांगावें व इतरांना सांगायला लावावें, आपण व सर्वांनीं मिळून भक्तिमार्ग चालवावा. जुन्या लोकांचा कंटाळा आला तर नवीन प्रांत काबीज करावा म्ह० तरुण पिढी हातीं धरावी ; कोठून तरी आळस झाडून शक्य तितक्यांना शिकवून शहाणे करावे. भगवद्भजनीं देह राबविण्याचा अभ्यास बुडाला कीं महंती संपली म्हणून समजावें, झटपट नवीन लोक शाहणे करून सोडावे. उपाधि वाढवावी पण तींत सांपडूं नये म्ह० अलिप्तपणा राखावा, उपाधीला कंटाळूं नये, निसुगपण म्ह० आळस कोणत्याच कामांत उपयोगी नाहीं (१४–२०). काम नासणारें नासत जातें आणि वेडा उगीच पाहात राहतो ; आळशी व निरुत्साही (हृदयशून्य) मनुष्याला नासणारें काम कसें सांवरून घ्यावें हें काय समजणार ? धकाधकीच्या प्रसंगांतून अशक्त कसचा निभावून जातो, म्हणून शक्त किंवा तयार होण्यासारखा मनुष्य पाहून त्याला नाना युक्ति शिकवाव्या, व्याप आटोप आपल्या हातून होईल तोंवर करावा, होइनासा झाल्यास निघून जावें व कोठेंतरी स्वानंदानें फिरावें. उपाधीपासून सुटला कीं त्याचा निस्पृहपणा वाढतो व जिकडे अनुकूळ तिकडे जातो. कीर्ति पाहिजे तर देहसुख सोडलें पाहिजे व देहसुख पाहिजे तर कीर्ति नाहीं, कोठेंही केल्यावांचून कांहींच होत नाहीं. कोणतेंच काम कोणावांचूनही अडून राहत नाहीं, होणार तें होऊन जातच असतें, पण हा मात्र आपल्याकडे दुर्बळपण, नाकर्तेपण ओढून घेतो. आधींच हिंमत, उत्साह (तकवा) सोडला, मध्येंच धैर्य (धिंवसा) सोडलें तर चालू संसाराचा गाडा शेवट मुक्कामावर कसा जावा? संसार हा मुळींच फाटका आहे, तो विवेकानें नेटका करावा, नेटका केला

नेटका। नेटका करितां फिका। होत जातो ॥ २८ ॥ ऐसा याचा जिनसाना। पाहातां कळों येतें मना। परंतु धीर सांडावाना। कोणीयेकें ॥ २९ ॥ धीर सांडितां काय होतें। अवघें सोसावें लागतें। नाना बुद्धि नाना मतें। शहाणा जाणे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकलक्षण-निरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

कीं तो फिका पडत जातो (हा संसारांतून सुटत जातो). संसाराचा स्वभाव, प्रकार (जिनसाना) असा आहे. विवेकानें सर्व कळून येतें, पण कोणींही धीर सोडूं नये. धीर सोडला तरी फायदा काय ? सोसायचें तें कांहीं टळत नाहीं. अनेक मतें व अनेक प्रकारच्या बुद्धि यांचें वर्म शाहणा जाणतो (२१–३०). [द० १९, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ पूर्णदशक विसावा ॥

॥ श्रीराम ॥ प्राणी व्यापक मन व्यापक । पृथ्वी आप तेज व्यापक । वायो आकाश त्रिगुण व्यापक । अंतरात्मा मूळमाया ॥ १ ॥ निर्गुण ब्रह्म तें व्यापक । ऐसें अवघेंच व्यापक । तरी हे सगट कीं कांहीं येक । भेद आहे ॥ २ ॥ आत्मा आणि निरंजन । येणेंहि वाटतो अनुमान । आत्मा सगुण कीं निर्गुण । आणि निरंजन ॥ ३ ॥ श्रोता संदेहीं पडिला । तेणें संदेह वाढला । अनुमान धरून बैसला । कोण तो कैसा ॥ ४ ॥ ऐका पहिली आशंका । अवघा गल्बला करूं नका । प्रगट करून विवेका । प्रत्ययो पाहावा ॥ ५ ॥ शरीरपाडें सामर्थ्यपाडें । प्राणीं व्याप करी निवाडें । परी पाहातां मनायेवढें । चपळ नाहीं ॥ ६ ॥ चपळपण येकदेसी । पूर्ण व्यापकता नव्हे त्यासी । पाहातां पृथ्वीच्या व्यापासी । सीमा आहे ॥ ७ ॥ तैसेंचि आप आणि तेज । अपूर्ण दिसती सहज । वायो चपळ समज । येकदेसी ॥ ८ ॥ गगन आणि निरंजन । तें पूर्ण व्यापक सघन । कोणी एक अनुमान । तेथें असेचिना ॥ ९ ॥ त्रिगुण गुणक्षोभिणी माया । माईक जाईल विलया । अपूर्ण येकदेसी तया । पूर्ण व्यापकता न घडे ॥ १० ॥ आत्मा आणि निरंजन । हें दोहींकडे नामाभिधान । अर्थान्वय समजोन । बोलणें करावें ॥ ११ ॥

प्रश्न— प्राणी व्यापक, मन व्यापक, तसेंच पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचभूतेंही व्यापक, त्रिगुण व्यापक, अंतरात्मा व मूळमाया व्यापक, आणि निर्गुण ब्रह्म तेंही व्यापक—तरी हे सारे सारखेच कीं त्यांच्यांत कांहीं भेद आहे असा संशय मला येतो. तसेंच आत्म्याला निरंजन म्हणतात याबद्दल संशय आहे. आत्मा सगुण आहे कीं निर्गुण आहे कीं निरंजन आहे याचाही निवाडा झाला पाहिजे (१–४). उत्तर— प्रथम पहिल्या शंकेचें समाधान शांतपणें ऐका. विवेकाला जागृत करून प्रत्ययानें पाहून घ्या. आपल्या शरीराच्या व सामर्थ्याच्या मानानें प्राणी मोठाले व्याप उपडच करीत असतो पण विचार पाहतां मनाएवढा व्यापक कोणीच नाहीं. मन चपळ आहे व एकदेशी आहे म्हणून पूर्णव्यापकता त्याला नाहीं. तसेंच पृथ्वी, आप, तेज व वायु हीं चार भूतें अपूर्ण व एकदेशी आहेत, पूर्णव्यापक नव्हेत. आतां गगन आणि निरंजन (निर्गुण ब्रह्म) हे दोघेही पूर्णव्यापक आहेत याविषयीं कांहीं शंका नाहीं. त्रिगुण, गुणमाया, मूळमाया यांना विलय आहे, तींही अपूर्ण व एकदेशी आहेत अर्थात पूर्णव्यापक नव्हेत. आत्मा (जीवात्मा) आणि निरंजन (निर्गुण) हीं नांवें दोहींकडे म्हणजे अंतरात्मा (जीव) व मूळमाया (शिव) यांना लावण्यांत येतात. पण कोणत्या ठिकाणीं कोणत्या अर्थानें या नामांचा

आत्मा मन अत्यंत चपळ । तरी हें व्यापक नव्हेचि केवळ । सुचित अंतःकरण निवळ । करून पाहावें ॥ १२ ॥ अंतराळीं पाहातां पाताळीं नाहीं । पाताळीं पाहातां अंतराळीं नाहीं । पूर्णपणें वसत नाहीं । चहूंकडे ॥ १३ ॥ पुढें पाहातां मागें नाहीं । मागें पाहातां पुढें नाहीं । वाम सव्य व्याप नाहीं । दशदिशा ॥ १४ ॥ चहूंकडे निशाणें मांडावीं । येकसरीं कैसीं सिवावीं । याकारणें समजोन उगवी । प्रत्ययें आपणासी ॥ १५ ॥ सूर्य आला प्रतिबिंबला । हाही दृष्टांत न घडे वस्तुला । वस्तुरूप निर्गुणाला । म्हणिजेत आहे ॥ १६ ॥ घटाकाश मठाकाश । हाही दृष्टांत विशेष । तुळूं जातां निर्गुणास । साम्यता येते ॥ १७ ॥ ब्रह्मींचा अंश आकाश । आणी आत्म्याचा अंश मानस । दोहींचा अनुभव प्रत्ययास । येथें घ्यावा ॥ १८ ॥ मगन आणी हें मन । कैसीं होती समान । मननसीळ महाजन । सकळही जाणती ॥ १९ ॥ मन हें पुढें वावडे । मागें आवघेंचि रितें पडे । पूर्ण गगनास साम्यता घडे । कोण्या प्रकारें ॥ २० ॥ परब्रह्मही अचळ । आणी पर्वतासही म्हणती अचळ । दोनीहि येक केवळ । हें कैसें म्हणावें ॥ २१ ॥ ज्ञान अज्ञान विपरीत ज्ञान । तिनी कैसीं होती समान । याचा प्रत्ययो मनन । करून पाहावा ॥ २२ ॥ ज्ञान म्हणिजे जाणणें । अज्ञान म्हणिजे नेणणें ।

उपयोग केला जातो हें संदर्भावरून ओळखलें पाहिजे (५–११). जीवात्मा म्ह० मन म्ह० अतिचपळ अर्थात पूर्णव्यापक नव्हे, अंतःकरणीं सूक्ष्मपणें हें पाहावें. त्याला आकाशांत पाहावें तेव्हां तें पाताळांत नसतें व पाताळांत पाहावें तेव्हां आकाशांत नसतें, मागें पाहावें तर पुढें नाहीं व पुढें पाहावें तर मागें नाहीं, डावीकडे पाहावें तर उजवीकडे नाहीं व उजवीकडे पाहावें तर डावीकडे नाहीं, तें दशदिशा एकसमयावच्छेदेंकरून नसतें म्हणून तें पूर्णव्यापक नाहीं. चहूंकडे निशाणें मांडलीं असतां सर्व निशाणांना एकदम शिवतां येत नाहीं. म्हणून प्रत्ययानें पाहावें म्हणजे आत्मा किंवा मन सर्वत्र सर्वकाळीं नसल्यानें पूर्ण व्यापक नाहीं हेंच ठरतें (१२–१५). सूर्य उगवला व जलाशयांत प्रतिबिंबला पण प्रतिबिंब कांहीं सूर्य नव्हे, तसें निर्गुण ब्रह्म मनबुद्ध्यादि उपाधींमुळें जीवात्मा किंवा शिवात्मा या विशिष्ट नांवाला पात्र झालें तरी जीव (आत्मा) किंवा शिव (मूळमाया) कांहीं निर्गुण ब्रह्म होत नाहीं; तथापि सूर्याला उदयास्त आहेत व निर्गुण ब्रह्म सदोदित पूर्ण आहे म्हणून सूर्यदृष्टांतानेंही निर्गुण ब्रह्माची पूर्णता व्यक्त करून दाखवितां येत नाहीं (१६). सूर्यदृष्टांतापेक्षां आकाशदृष्टांत कांहींसा बरा दिसतो, आकाशाची व निर्गुणाची कांहींशी साम्यता होते. घटाकाशाप्रमाणें देहपरिमित जीवात्मा व मठाकाशाप्रमाणें ब्रह्मांडपरिमित शिवात्मा आहेत असें कल्पिलें तरी घटमठ आले व गेले तरी आकाश व्यापकच आहे, त्याप्रमाणें जीवशिवांच्या कल्पना टाकून निर्गुणब्रह्माचा विचार होऊं शकतो. ब्रह्मींचा अंश आकाश व आकाशाचा (शिवात्म्याचा) अंश मन (जीवात्मा). मनापेक्षां आकाश किती पटीनें व्यापक आहे हें पाहावें व असेंच पुढें जाऊन पाहावें म्हणजे आकाशापेक्षां निर्गुणही अनंत पटीनें व्यापक आहे हें कळतें. मन आकाशाची बरोबरी करूं शकत नाहीं. मग तें निर्गुणाची कशी करील ? (मनाला वडील आकाश, आकाशाला वडील ब्रह्म, ब्रह्माला मात्र वडील कोणी नाहीं.) मन पुढें गेलें कीं मागें रितें पडतें (मागचें त्याला धरवत नाहीं), असें आकाशाचें नाहीं. आकाश मागें पुढें असतें व म्हणून मनाहून व्यापक आहे. ब्रह्माला अचळ म्हणतात व पर्वतालाही अचळ म्हणतात, पण असें म्हटलें म्हणून पर्वत कांहीं ब्रह्माची बरोबरी करूं शकत नाहीं (तसें निरंजन हें पद जीवशिवांना लावलें तरी जीवशिव निर्गुण ब्रह्माची बरोबरी करूं शकत नाहींत). ज्ञान, अज्ञान आणि विपरीत ज्ञान या तिहींतही 'ज्ञान' शब्द आल्यानें कांहीं तिहींची साम्यता होत

विपरीत ज्ञान म्हणिजे देखणें । येकाचें येक ॥ २३ ॥ जाणणें नेणणें वेगळें केलें । ढोबळें पंचभूतिक उरलें । विपरीत ज्ञान समजलें । पाहिजे जीवीं ॥ २४ ॥ द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्माचि होय शिवात्मा । पुढें शिवात्मा तोचि जिवात्मा । जन्म घेतो ॥ २५ ॥ आत्मत्वीं जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्ममरण न भंगे । संभवामि युगे युगे । ऐसें हें वचन ॥ २६ ॥ जीव येकदेसी नर । विचारें जाला विश्वंभर । विश्वंभरास संसार । चुकेना कीं ॥ २७ ॥ ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरूपें हें समान । निवृत्तिरूपें विज्ञान । जालें पाहिजे ॥ २८ ॥ ज्ञानें येवढें ब्रह्मांड केलें । ज्ञानें येवढें वाढविलें । नाना विकारांचें वळलें । तें हें ज्ञान ॥ २९ ॥ आठवें देह ब्रह्मांडीचें । तें हें ज्ञान साचें । विज्ञानरूप विदेहाचें । पद पाहिजे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पूर्णापूर्णनिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ मूळमाया नस्तां चंचळ । निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । जैसें गगन अंतराळ । चहूंकडे ॥ १ ॥ दृष्य आलें आणि गेलें । परी तें परब्रह्म संचलें । जैसें गगन कोंदाटलें । चहूंकडे ॥ २ ॥ जिकडे पाहावें तिकडे अपार । कोणेकडे नाहीं पार । येकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं ॥ ३ ॥ ब्रह्मांडावरुतें बैसावें । अवकाश भकास अवलोकावें । तेथें चंचळ व्यापकाच्या नांवें । शून्याकार ॥ ४ ॥ दृश्य विवेकें काढिलें । मग परब्रह्म कोंदाटलें ।

नाहीं. ज्ञान म्ह० जाणणें, अज्ञान म्ह० नेणणें व विपरीत ज्ञान म्ह० एक असून एक पाहाणें (ब्रह्म सत्य हें जाणणें हें ज्ञान, हें न जाणणें हें अज्ञान व ब्रह्म सत्य असून तें न जाणतां जग सत्य आहे असें समजणें हें विपरीत ज्ञान). ज्ञान व अज्ञान यांचा विचार सोडून स्थूळ (ढोबळें) पंचभौतिक पसारा दिसतो हा सत्य मानणें हें विपरीत ज्ञान. द्रष्टा, साक्षी व अंतरात्मा असा जीवात्मा हाच (ज्ञानानें) शिवात्मा होतो व शिवात्मा तोच जन्म घेऊन जीवात्मा होतो. आत्मा जन्ममरणवान् आहे, जन्ममरणापासून सुटत नाहीं म्हणूनच ' संभवामि युगे युगे ' असें शिवात्म्याच्या भूमिकेचें बोलणें भगवान् बोलले आहेत. जीव हा बोलून चालून उघड उघड एकदेशी (पिंडोपाधि) आहे तो विचारानें विश्वंभर (शिव) होतो पण, विश्वंभराल्लाही संसार सुटत नाहीं. अज्ञान ही वृत्ति आहे तशीच ज्ञान हीही वृत्तीच आहे, वृत्तिरूपानें दोन्ही सारख्याच आहेत — म्हणून निवृत्तिरूपानें ज्ञानाचें विज्ञान झालें पाहिजे (जीवाची पिंडोपाधि व शिवाची ब्रह्मांडोपाधि या दोन्ही उपाधि जीवाला व शिवालाही संसारांत फिरवितात, दोन्ही उपाधि सुटल्या कीं निरंजन निर्गुणपद सिद्ध आहे). ज्ञान हें वस्तुतः अज्ञानच आहे, हें सविकार आहे. पिंडाचे चार देह तसेच ब्रह्मांडाचे चार देह, दोन्ही समान असल्यामुळें ज्ञान म्ह० मूळमाया — त्यापासून हें ब्रह्मांड झालें आहे. त्यानेंच हें वाढविलें आहे, तात्पर्य, ज्ञान हें नाना विकारमय आहे. ब्रह्मांडींचा आठवा देह मूळमाया तेंच ज्ञान. त्या ज्ञानाचें विज्ञान झालें पाहिजे म्हणजे निरंजनपदप्राप्ति होते (१७–३०). [द० २०, स० १]

चंचळ मूळमाया नसती तर आकाशाप्रमाणें निर्गुण ब्रह्मच सर्वत्र संचलें असतें. दृश्य आलें आणि गेलें तरीही गगनासारखें परब्रह्म चहूंकडे संचलें आहे. पाहावें तिकडे अपार, एकजिनसी ब्रह्मच संचलें आहे. ब्रह्मांडाच्या पलीकडे जाऊन पाहावें व तें नाहीं अशी कल्पना करून पाहावें म्हणजे चंचळ व्यापक मूळमाया आढळणार नाहीं. दृश्य विवेकानें दूर सारून

कोणासीच अनुमानलें । नाहीं कदा ॥ ५ ॥ अधोर्ध पाहतां चहूंकडे । निर्गुण ब्रह्म जिकडे तिकडे । मन धांवेल कोणेकडे । अंत पाहावया ॥ ६ ॥ दृश्य चळे ब्रह्म चळेना । दृश्य कळे ब्रह्म कळेना । दृश्य आकळे ब्रह्म आकळेना । कल्पनेसी ॥ ७ ॥ कल्पना म्हणिजे कांहींच नाहीं । ब्रह्म दाटलें ठाईंचा ठाईं । वाक्यार्थ विवरत जाईं । म्हणिजे बरें ॥ ८ ॥ परब्रह्मायेवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं । कळल्यावीण कांहींच नाहीं । समाधान ॥ ९ ॥ पिपीलिकामार्गें हळु हळु घडे । विहंगमें फळासी गांठी पडे । साधक मननी पवाडे । म्हणिजे बरें ॥ १० ॥ परब्रह्मासारिखें दुसरें । कांहींच नाहीं खरें । निंदा आणी स्तुतिउत्तरें । परब्रह्मीं नाहीं ॥ ११ ॥ ऐसें परब्रह्म येकजिनसी । कांहींच तुळेना तयासी । महानुभाव पुण्यरासी । तेथें पवाडती ॥ १२ ॥ चंचळें होते दुःखप्राप्ती । निश्चळायेवढी नाहीं विश्रांती । निश्चळ प्रत्ययें पाहती । महानुभाव ॥ १३ ॥ मुळापासून सेवटवरी । विचारणा केलीच करी । प्रत्ययाचा निश्चयो अंतरीं । तयासीच फावे ॥ १४ ॥ कल्पनेचि सृष्टी जाली । त्रिविध प्रकारें भासली । तीक्ष्ण बुद्धीनें आणिली । पाहिजे मना ॥ १५ ॥ मुळमायेपासून त्रिगुण । अवघें येकदेसी लक्षण । पांचाभूतांचा ढोबळा गुण । दिसत आहे ॥ १६ ॥ पृथ्वीपासून चारी खाणी । चत्वार वेगळाली करणी । सकळ सृष्टीची चाली येथुनी । पुढें नाहीं ॥ १७ ॥ सृष्टीचें त्रिविध लक्षण । विशद करूं निरूपण । श्रोतीं सुचित अंतःकरण । केलें पाहिजे ॥ १८ ॥ मूळमाया जाणिवेची । मुळीं

पाहावें म्हणजे परब्रह्मच कोंदाटलेलें आहे, त्याचा पुरा पत्ता कोणासच लागला नाहीं. अध आणि उर्ध्व म्ह० मूळमायेपासून खालीं व मूळमायेच्या पलीकडे सर्वत्र निर्गुण ब्रह्मच कोंदाटलें आहे, त्याचा अंत चंचळ मन काय लावील? दृश्य चळलें, कळलें, कल्पितां येतें (आकळतें) व ब्रह्म चळत नाहीं, कळत नाहीं, कल्पनाच तेथें पोंचत नाहीं. कल्पना म्हणजे शून्य व ब्रह्म तर एकमेव असून आहे, महावाक्याचें विवरण करावें म्हणजे बरें (१–८). परब्रह्माएवढें थोर कांहींच नाहीं, श्रवणापरतें दुसरें श्रेष्ठ साधन नाहीं व कळल्यावांचून समाधान नाहीं. पिपीलिकामार्गानें म्ह० मुंगीच्या पावलानें, कर्म–ज्ञान–उपासनादिक्रमानें हळु हळु ब्रह्मपद गांठतां येतें, पण विहंगममार्गानें म्ह० पक्ष्यासारखी एकदम उडी मारल्यानें तें त्वरित हस्तगत होतें. साधकानें मननमग्न असावें हें बरें. परब्रह्मासारखें दुसरें कांहींच नाहीं, तेथें स्तुति व निंदा दोन्ही पोंचत नाहींत, असें तें एकजिनसी व अतुल आहे, पुण्यात्मे महापुरुष तेथेंच पावतात. चंचळाच्या संगतीनें, निश्चळाच्या – निःसंगाच्या – संगतीनें सुख होतें, महानुभाव प्रत्यक्ष ते भोगतातच. मूळमायेपासून शेवट देहापर्यंत विचार करून सर्व चंचळाचा त्याग करून ते अंतरीं स्वानुभवसुखाचा निश्चय करून निश्चळीं राहतात (९–१४). सारी सृष्टि कल्पनेची आहे (व ब्रह्म निर्विकल्प आहे) व ही तीन प्रकारांनीं भासते. याचा सूक्ष्म विचार करून पाहावा. (श्री) मूळमायेपासून गुणमायेपर्यंत म्ह० त्रिगुणापर्यंत, (२) त्रिगुणापासून तों पृथ्वीपर्यंत, (म) पृथ्वीपासून तों चारखाणी – चारखाणीपर्यंत. पहिल्यांत एकदेशी लक्षण, दुसऱ्यांत स्थूल पंचभूतें व तिसऱ्या प्रकारांत नाना जीवजंतु निर्माण होऊन सृष्टिरचना पूर्ण झाली आहे (१५–१८). जाणीवरूप

सूक्ष्म कल्पनेची । जैसी स्थिती परे वाचेची । तद्रूपचि ते ॥ १९ ॥ अष्टधा प्रकृतीचें मूळ । ते हे मूळमायाच केवळ । सूक्ष्मरूप बीज सकळ । मूळींच आहे ॥ २० ॥ जड पदार्थ चेतवितें तें । म्हणोनी चैतन्य बोलिजेतें । सूक्ष्मरूपें संकेतें । समजोन घ्यावीं ॥ २१ ॥ प्रकृतिपुरुषाचा विचार । अर्धनारीनटेश्वर । अष्टधाप्रकृतीचा विचार । सकळ कांहीं ॥ २२ ॥ गुप्त त्रिगुणाचें गूढत्व । म्हणोनी संकेत महत्तत्व । गुप्तरूपें शुद्धसत्व । तेथेंचि वसे ॥ २३ ॥ जेथून गुण प्रगटती । तीस गुणक्षोभिणी म्हणती । त्रिगुणांचीं रूपें समजती । धन्य ते साधु ॥ २४ ॥ गुप्तरूपें गुणसौम्य । म्हणोनी बोलिजे गुणसाम्य । सूक्ष्म संकेत अगम्य । बहुतांस कैंचा ॥ २५ ॥ मूळमायेपासून त्रिगुण । चंचळ येकदेसी लक्षण । प्रत्ययें पाहातां खूण । अंतरीं येते ॥ २६ ॥ पुढें पंचभूतांचीं बंडें । वाढलीं विशाळें उदंडें । सप्तद्वीपें नवखंडें । वसुंधरा हे ॥ २७ ॥ त्रिगुणापासून पृथ्वीवरी । दुसऱ्या जिनसाऱ्याची परी । दोनी जिनस याउपरी । तिसरा ऐका ॥ २८ ॥ पृथ्वी नाना जिनसाचें बीज । अंडज जारज स्वेदज उद्भिज । चारी खाणी चारी वाणी सहज । निर्माण जाल्या ॥ २९ ॥ खाणी वाणी होती जाती । परंतु तैसीच आहे जगती । ऐसे होती आणि जाती । उदंड प्राणी ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सृष्टित्रिविधलक्षणनिरूपणनाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ मूळींहून सेवटवरी । विस्तार बोलिला नानापरी । पुन्हा विवरत विरत माघारी । वृत्ति न्यावी ॥ १ ॥ चारी वाणी चारी खाणी । चौऱ्यांसी लक्ष

मूळमाया म्ह० जो 'एकोहं बहुः स्याम्' हा ब्रह्माच्या ठिकाणीं आदिसंकल्प किंवा प्रथमस्फूर्ति झाली ती—नाभिस्थानीं परावाचेचें जसें प्रथमस्फुरण होतें तशी ब्रह्मीं मूळमाया प्रथम स्फुरली—दोन्ही एकरूपच. मूळमाया हें अष्टधा प्रकृतीचें मूळ होय, त्रिगुण व पंचभूतें प्रथम सूक्ष्मरूपानें तेथेंच झालीं. मूळमाया जडांस चेतविते म्हणून तिला चैतन्य म्हणतात. तिचें सूक्ष्मरूप समजण्यासाठीं अनेक नांवांचे संकेत केले आहेत ते सर्व समजून घ्यावे. तीच अर्धनारीनटेश्वर होय. त्रिगुण गुप्तपणानें तींत म्ह० मूळमायेंत असतात म्हणून तिला महत्तत्त्व म्हणतात. शुद्धसत्त्व हें तिचेंच नामरूप. तेथून क्षोभ पावून गुणमाया निघते. त्रिगुणांचीं यथार्थ स्वरूपें जाणतात ते साधु धन्य होत. गुप्तरूपानें त्रिगुण आपल्या सौम्य (सूक्ष्म) रूपांत तेथें असतात म्हणून तिला गुणसाम्य म्हणतात. नांवांचे हे विविध सूक्ष्म संकेत बहुतांस समजणें कठीण. मूळमायेपासून त्रिगुण सूक्ष्मरूपानें होतात, तेथें ते चंचळ एकदेशी असतात, हें प्रत्ययानें पाहून घ्यावें (१९–२६). त्रिगुणापासून पृथ्वीपर्यंत सृष्टीचा दुसरा प्रकार होतो. येथें पंचभूतांचीं बंडें वाढून पंचभूतें स्थूल दर्शत आलीं व अनंत ब्रह्मांडें, सप्तद्वीपें व नवखंड पृथ्वी निर्माण झाली (२७). पृथ्वीपासून अनंत प्राणी—अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज—व परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी—याप्रमाणें चार खाणी व चार वाणी निर्माण झाल्या. खाणीवाणी होतात जातात पण जगती (पृथ्वी) आहे तशीच आहे. हिच्यावर अनंत प्राणी होतात व जातात (२८–३०). [द० २०, स० २]

मूळमायेपासून शेवटपर्यंत सृष्टिविस्तार तीन प्रकारांनीं कसा झाला हें सांगितलें; त्याचा विचार करीत क्षीण होत होत वृत्ति मूळमायेपर्यंत माघारीं न्यावी. चार खाणी, चार वाणी, चौऱ्यांशीं लक्ष जीवयोनि, नाना प्रकारचे प्राणी,

जीवयोनी । नाना प्रकारींचे प्राणी । जन्मास येती ॥ २ ॥ अवघे होती पृथ्वीपासुनी । पृथ्वीमध्यें जाती नासोनी । अनेक येती जाती परी अवनी । तैसीच आहे ॥ ३ ॥ ऐसें हें सेंख्याकडिल खांड । दुसरें भूतांचें बंड । तिसरें नामाभिधानें उदंड । सूक्ष्मरूपें ॥ ४ ॥ स्थूळ अवघें सांडून द्यावें । सूक्ष्मरूपें वोळखावें । गुणापासून पहिलेंच पाहावें । सूक्ष्मदृष्टीं ॥ ५ ॥ गुणाचीं रूपें जाणीव नेणीव । पहिलाच पाहावा अभिप्राव । सूक्ष्मदृष्टीं लाघव । येथून पुढें ॥ ६ ॥ शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्वगुण । जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ॥ ७ ॥ त्रिगुणाचीं रूपें ऐसीं । कळों लागलीं अपैसीं । गुणापुढील कर्दमासी । गुणक्षोभिणी बोलिजे ॥ ८ ॥ रज तम आणि सत्व । तिहींचें जेथें गूढत्व । तें जाणिजे महत्तत्व । कर्दमरूप ॥ ९ ॥ प्रकृतिपुरुष शिवशक्ती । अर्धनारीनटेश्वर म्हणती । परी याची स्वरूपस्थिती । कर्दमरूप ॥ १० ॥ सूक्ष्मरूपें गुणसौम्य । त्यास बोलिजे गुणसाम्य । तैसेंचि चैतन्य अगम्य । सूक्ष्मरूपी ॥ ११ ॥ बहुजिनसी मूळमाया । महाकारण ब्रह्मांडींची काया । ऐसिया सूक्ष्म अन्वया । पाहिलेंचि पाहावें ॥ १२ ॥ चारी खाणीं पंचभूतें । चौदा सूक्ष्म संकेतें । काय पाहाणें तें येथें । शोधून पाहावें ॥ १३ ॥ आहाच पाहातां कळेना । गरज केल्यां समजेना । नाना प्रकारीं जनाच्या मना । संदेह पडती ॥ १४ ॥ चौदा पांच येकोणीस । येकोणीस चारी तेवीस । यामध्यें मूळ चतुर्दश । पाहिलेंचि पाहावें ॥ १५ ॥ जो विवरोन समजला । तेथें संदेह नाहीं उरला । समजल्यावीण जो गल्बला । तो निरर्थक ॥ १६ ॥ सकळ सृष्टीचें बीज । मूळ-

---

जन्मास येतात. सारे पृथ्वीपासून जन्म पावतात व पृथ्वीतत्वांतच लीन होतात, अनेक येतात जातात पण पृथ्वी आहे तशीच आहे. असा हा शेंख्याकडचा तिसरा भाग आहे. दुसरा भाग पंचभूतांचा व पहिला मूळमायेपासून त्रिगुणापर्यंतचा सूक्ष्म भाग—याला नांवें बहुत आहेत. स्थूळ सोडून सूक्ष्म ओळखावें, गुणांपासून मागें सूक्ष्म मूळमायेपर्यंत पाहात जावें. जाणीव व नेणीव हीं गुणांचीं रूपें होत, त्यांचा विचार पाहावा. सूक्ष्मदृष्टीनें पाहणें तर यापुढेंच आहे. शुद्ध नेणीव तो तमोगुण, शुद्ध जाणीव तो सत्वगुण व जाणीवनेणीवमिश्रित तो रजोगुण. त्रिगुणांचीं रूपें हीं आपोआप कळूं लागतात. गुणांच्या पुढें जो कर्दम म्ह० चिखल, मिश्रण आहे त्याला गुणमाया म्हणतात. त्रिगुणांचें अत्यंत गूढपण त्याला महत्तत्व, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, मूळमाया, अर्धनारीनटेश्वर म्हणतात, पण हें महत्तत्व ऊर्फ मूळमाया कर्दमरूप आहे. तेंच गुणसाम्य, चैतन्य होय. मूळमाया ही बहुजिनसी आहे. ब्रह्मांडाचे जे चार देह त्यांतला चौथा देह जो महाकारण तोच मूळमाया होय. चार खाणी, पंचभूतें, व मूळमायेचीं चौदा नांवें (म्हणजे सृष्टीचे तीनही प्रकार) सर्व सूक्ष्मरूपानें त्या कर्दमरूप मूळमायेंतच शोधून पाहावें, वरवर पाहतां हें कळत नाहीं व अज्ञानास्तव अनेक जीव येथें संशयांत पडतात. मूळमायेचीं चौदा नांवें, पांच महाभूतें मिळून एकोणीस व चार खाणी मिळून तेवीस यांत मूळमायेच्या १४ नांवांचा विचार करावा. जो विवरून पाहील तो निःसंदेह होईल, न समजतां केलेली बडबड

मायेंत असे सहज । अवघें समजतां सज । परमार्थ होतो ॥ १७ ॥
समजलें माणुस चावळेना । निश्चई अनुमान धरीना । सावळगोंदा करीना । परमार्थ कदा ॥ १८ ॥ शब्दातीत बोलतां आलें । त्यास वाच्यांश बोलिलें । शुद्ध लक्ष्यांश लक्षिलें । पाहिजे विवेकें ॥ १९ ॥ पूर्वपक्ष म्हणिजे माया । सिद्धांतें जाय विलया । माया नस्तां मग तया । काय म्हणावें ॥ २० ॥ अन्वय आणी व्यतिरेक । हा पूर्वपक्षाचा विवेक । सिद्धांत म्हणिजे शुद्ध येक । दुसरें नाहीं ॥ २१ ॥ अधोमुखें भेद वाढतो । ऊर्ध्वमुखें भेद तुटतो । निःसंगपणें निर्गुणी तो । महायोगी ॥ २२ ॥ माया मिथ्या ऐसी कळली । तरी मग भीड कां लागली । मायेचे भिडेनें घसरली । स्वरूपस्थिती ॥ २३ ॥ लटके मायेनें दपटावें । सत्य परब्रह्म सांडावें । मुख्य निश्चयें हिंडावें । कासयासी ॥ २४ ॥ पृथ्वीमध्यें बहुत जन । त्यांमध्यें असती सज्जन । परी साधूस जाणतो कोण । साधुवेगळा ॥ २५ ॥ म्हणोनी संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा । फिरफिरों ठाईं पाडावा । साधुजन ॥ २६ ॥ उदंड हुडकावे संत । सांपडे प्रचीतीचा महंत । प्रचीतीविण स्वहित । होणार नाहीं ॥ २७ ॥ प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीविण अवघें व्यर्थ । प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥ २८ ॥ रात्रंदिवस पाहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ । परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ॥ २९ ॥ म्हणोनी पाहिलेंच पाहावें । आणि शोधिलेंचि शोधावें । अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मनामाभिधाननाम समास तृतीय ॥ ३ ॥

व्यर्थ होय. सकळ सृष्टीचें बीज मूळमायेंत आहे, ते सर्व यथार्थ समजणें म्हणजेच परमार्थ होय (१–१७). ज्याला नीट समजलें तो भ्रमांत पडत नाहीं, ज्याचा निश्चय झाला आहे तो संशय धरीत नाहीं, परमार्थांत कधीं सांवळागोंधळ करीत नाहीं. निःशब्द ब्रह्म शब्दांत सांगतां आलें कीं त्याला वाच्यांश म्हणतात; शुद्ध लक्ष्यांश जो आहे तो वाच्यांशाचा त्याग करून विवेकानेंच लक्षिला पाहिजे. पूर्वपक्ष म्हणजे माया, तिचें खंडण किंवा निरसन सिद्धांत (ब्रह्म) करितो, माया निरसली म्हणजे जें उरतें त्याला काय नांव द्यावें. अन्वय आणि व्यतिरेक हा पूर्वपक्षांतलाच विचार आहे. सिद्धांत म्हणजे ‘ एक ब्रह्म आहे, त्यावांचून दुसरें कांहीं नाहीं ’ हा होय. अधोमुखानें म्ह० मायेकडे पाहिल्यानें द्वैत वाढतें, उर्ध्वमुखानें म्ह० ब्रह्माकडे पाहिल्यानें भेद संपतो, सर्वसंग सोडून निर्गुणीं आराम पावला तो महायोगी जाणावा. माया मिथ्या आहे हें कळल्यावर मायेची भीड (पर्वा) कसची ? मायेची भीड धरली कीं स्वरूपस्थिति सुटली. मिथ्या मायेनें भेडसावें व सत्य परब्रह्म सांडावें आणि सत्य परब्रह्माचा निश्चय झाल्यावर पृथ्वीतलावर मायिक पदार्थांच्या मागें हिंडावें हें केवढें नवल होय ! (१८–२४) पृथ्वीवर अनेक जन आहेत त्यांतच सज्जन आहेत, पण सज्जनांस म्ह० साधूंस साधूंवांचून कोण ओळखतो ? म्हणून संसार सोडून मग साधु शोधावे, फिरूनफिरून साधु धुंडावे. पुष्कळ साधुजन पाहिले त्यांतच एखादा स्वानुभवी महंत आढळतो, आणि प्रचीतीवांचून आत्महित कधींही होत नाहीं. प्रपंचांत पाहा, परमार्थांत पाहा, प्रचीतीवांचून व्यर्थ आहे, प्रत्ययज्ञानी म्ह० स्वानुभवी पुरुष तो सर्वांत श्रेष्ठ होय. अहर्निश असार टाकून अर्थ पाहावा. अर्थ पाहील तो समर्थ होय, परलोकींचें खरें स्वहित त्यांतच आहे. म्हणून पुनः पुन्हां अवलोकन करावें, पुनः पुन्हां विचार करावा, यथार्थ बोध झाला कीं निःसंदेहता वाणते (२५–३०). [द० २०, स० ३]

॥ श्रीराम ॥ सकळ जनांसी प्रार्थना । उगेंच उदास करावेना । निरूपण आणावें मना । प्रत्ययाचें ॥ १ ॥ प्रत्यय राहिला येकेकडे । आपण धांवतो भलतेकडे । तरी सारासाराचे निवाडे । कैसे होती ॥ २ ॥ उगीच पाहातां सृष्टी । गल्बला दिसतो दृष्टीं । परी ते राजसत्तेची गोष्टी । वेगळीच असे ॥ ३ ॥ पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें । नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ॥ ४ ॥ त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळु जाला । प्रत्यक्ष जगदीश जगाला । रक्षितसे ॥ ५ ॥ सत्ता पृथ्वीमध्यें वांटली । जेथें तेथें विभागली । कळेनें सृष्टि चालिली । भगवंताचे ॥ ६ ॥ मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता । शरीरीं विभागली तत्वता । सकळ कळा चातुर्यता । तेथें वसे ॥ ७ ॥ सकळ पुरांचा ईश । जगामध्यें तो पुरुष । नाना शरीरीं सावकास । करूं लागे ॥ ८ ॥ पाहातां सृष्टीची रचना । ते येकाचेन चालेना । येकचि चालवी नाना । देह धरुनी ॥ ९ ॥ नाहीं उंच नीच विचारिलें । नाहीं बरें वाईट पाहिलें । कार्ये चालों ऐसें जालें । भगवंतासी ॥ १० ॥ किंवा नेणणें आडवें केलें । किंवा अभ्यासीं घातलें । हें कैसकैसें केलें । त्याचा तोचि जाणे ॥ ११ ॥ जगदंतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हेंचि ध्यान । ध्यान आणी तें ज्ञान । येकरूप ॥ १२ ॥ प्राणी संसारास आला । कांहीं येक शाहणा जाला । मग तो विवरों लागला ।

सर्व जनांस प्रार्थना आहे कीं व्यर्थ उदास होऊं नका. प्रत्ययाचें निरूपण चित्तांत धरा. प्रत्यय एकीकडे व आपण धांवतों दुसरीकडे असें झालें तर मग असार माया टाकून सार (ब्रह्म) घेणें कसें घडेल? लोकव्यवहाराकडे सहज पाहिलें तर दृष्टीला नुसता गलबलाच दिसतो, पण ज्या मुख्य सत्तेच्या म्ह० परमेश्वरी सत्तेच्या (राजसत्तेच्या) योगानें हा सर्व व्यवहार चालला आहे त्या सत्तेची गोष्ट कांहीं और आहे! पृथ्वीवर जेवढीं शरीरें आहेत तेवढीं परमेश्वराचीं घरें आहेत, नाना सुखें या द्वारांनींच प्राप्त होतात. भगवंताचा महिमा कोणाला कळणार आहे? प्राणिमात्रांना माता वांटून देऊन त्यांचे द्वारेंच तो कृपाळु जगदीश जगाचें रक्षण करीत असतो. परमेश्वराची सत्ताच पृथ्वीमध्यें सर्वांत विभागली असून भगवंताच्या कळेनें सृष्टीचे कारभार चालले आहेत (आईप्रमाणेंच बाप, बंधु, भगिनी, स्त्रीपुत्र, सुहृन्मित्र, राजा व शेजारीपाजारी इ० सर्वांच्या ठिकाणीं परमेश्वरी सत्ता असून परमेश्वरच त्या त्या द्वारानें आपलें रक्षण करीत असतो.) मूळ सत्ता जाणत्या पुरुषाची म्ह० परमेश्वराची, तीच नाना शरीरांत विभागली असून त्याच्या सत्तेंतच सर्वकळाचातुर्य भरलें आहे. सकळ पुरांचा म्ह० देहपुरांचा ईश म्ह० स्वामी तो जगदीश आहे. नाना देहांत राहून तो सृष्टीचे व्यवहार चालवीत आहे (१-७). सृष्टिरचनेकडे पाहिलें म्हणजे ती एकाच्यानें चालत नसून नाना शरीरांच्या द्वारें एकच चालवीत आहे असें आढळून येतें. त्यानें हा देह उंच, हा नीच, हा बरा व हा वाईट असें मनांत न आणतां कोणीकडून तरी सृष्टीचें कार्य चालो अशा हेतूनें नानाविध देह निर्माण केले आहेत व सर्व योनींत त्याचें वास्तव्य आहेच. ही सृष्टि त्यानें कशी चालविली आहे—का अज्ञानांतून (शून्यांतून) त्यानें जग निर्माण केलें आहे, का सृष्टि उत्पन्न करण्याचा त्याला अनादिकालापासून अभ्यासच आहे—हें त्याचें त्यालाच ठाऊक! वास्तव जगदंतरीं व्यापकपणानें राहणाऱ्या ईश्वराचें अखंड अनुसंधान ठेवणें हेंच त्याचें ध्यान व हेंच ज्ञान होय, ध्यान व ज्ञान एकरूपच आहेत (८-१२). प्राणी जन्माला आला, कांहींसा शाहणा झाला म्हणजे मग सर्व गोष्टींचा आपल्या जाणिवेप्रमाणें विचार करूं लागतो. रामाचें निशाण गुप्त नसून सान्या

भूमंडळीं ॥ १३ ॥ प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन । विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ॥ १४ ॥ उपासना धुंडीनसी वासना धरिली । तरी ते लांबतचि गेली । महिमा न कळे बोली । यथार्थ आहे ॥ १५ ॥ द्रष्टा म्हणिजे पाहता । साक्षी जाणिजे जाणता । अनंतरूपी अनंता । वोळखावें ॥ १६ ॥ संगती असावी भल्यांची । घाटा कथा निरूपणाची । कांहीं येक मनाची । विश्रांती आहे ॥ १७ ॥ त्याहीमध्यें प्रत्ययज्ञान । जाळून टाकिला अनुमान । प्रचीतीविण समाधान । पाविजेल कैंचें ॥ १८ ॥ मूळसंकल्प तो हरिसंकल्प । मूळमायेमधील साक्षेप । जगदंतरीं तेंचि रूप । देखिजेतें ॥ १९ ॥ उपासना ज्ञानस्वरूप । ज्ञानीं चौथा देह आरोप । याकारणें सर्व संकल्प । सोडून द्यावा ॥ २० ॥ पुढें परब्रह्म विशाळ । गगनासारिखें पोकळ । घन पातळ कोमळ । काय म्हणावें ॥ २१ ॥ उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन । योगियांचें समाधान । येणें रितीं ॥ २२ ॥ विचार नेहटूनसा पाहे । तरी उपासना आपणचि आहे । येक जाये येक राहे । देह धरूनी ॥ २३ ॥ अखंड ऐसी घालमेली । पूर्वापर होत गेली । आतांहि तैसीच चालिली । उत्पत्तिस्थिती ॥ २४ ॥ बनावरी बनचरांची सत्ता । जळावरी जळचरांची सत्ता । भूमंडळीं भूपाळां समस्तां । येणेंचि न्यायें ॥ २५ ॥ सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २६ ॥ कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथकाकारें । तेथें

जगावर फडकून राहिलें आहे. तो आत्माराम ज्ञानस्वरूप आहे. विश्वंभर आहे, सर्वत्र संचला आहे, मात्र त्याची प्राप्ति महद्भाग्यानेंच होते. उपासना धुंडीन म्ह० शोधून काढीन अशी वासना धरिली म्हणजे लांब मूळमायेपर्यंत पाहावें लागतें, खचित् त्या आत्मारामाचा महिमा अगाध आहे असें म्हणतात तें योग्य आहे. द्रष्टा म्ह० पाहणारा व साक्षी म्ह० जाणणारा, अशा त्या अनंतरूपी अनंताला ओळखावें, सत्संगति व श्रवणनिरूपणाचा प्रकार यांच्या योगानें मनाला विश्रांतिसुख मिळतें, म्हणून सत्संग व सच्छ्रवण अवश्य ठेवावें; त्यांतही संशय नाहींसें करणारें प्रत्ययज्ञान असलें म्हणजे उत्कृष्ट प्रत्ययावांचून समाधान नाहीं. मूळसंकल्प तो हरिसंकल्प. तोच मूळमाया, ईश्वर; जगदंतरीं तेंच पाहावें (सर्वांभूतीं भगवद्भाव ठेवावा, भूतमात्रीं हरि पाहावा). मूळमाया म्ह० ईश्वर, ब्रह्मांडाचा चौथा महाकारण देह तो, तेथून सकळ सृष्टि झाली. तेथचा विचार ती उपासना, उपासना अर्थातच ज्ञानस्वरूप झाली. म्हणून सर्व संकल्प सोडून द्यावा — मूळमायेचाही विवेकानें त्याग करावा व सार जो हरि, निर्गुणब्रह्म, तेथें मिठी घालावी. मूळमायेच्या म्ह० उपासनेच्या म्ह० ज्ञानाच्या पलीकडे गगनसदृश — घन, पातळ (सूक्ष्म) व कोमळ — असें परब्रह्म आहे. उपासना म्हणजेच ज्ञान, ज्ञानानें निरंजन (निर्गुण ब्रह्म) प्राप्त होतें, योगी तेथेंच विश्राम पावतात. नेहटून म्ह० चिकाटीनें खोल विचार करून पाहावा म्ह० उपासना आपणच आहोंत. जीव शिवस्वरूप आहे हें कळतें व एक जातो व एक देह धरून राहतो म्ह० जीव जीवपणानें मावळतो व शिवच केवळ राहतो (१३–२३). अशीच द्वैताची घालमेल नित्य चालली आहे. पूर्वापर होत आली आहे. वनांवर पशूंची, जळावर मत्स्यांची व पृथ्वीवर मानवांची सत्ता चालत आहे. चळवळींपासून सामर्थ्य प्राप्त होतें, जो जो चळवळ करील त्याला तें प्राप्त होईल पण त्याला भगवंताच्या सत्तेचें अधिष्ठान पाहिजे. जगन्नाथच कर्ता आहे हें खरें आहे पण त्याची सत्ता जीवमात्रांच्या ठिकाणीं

अहंतेचें काविरें । बाधिजेना ॥ २७ ॥ हरिर्दाता हरिर्भोक्ता । ऐसें चालतें तत्वता । ते गोष्टीचा आतां । विचार पाहावा ॥ २८ ॥ सकळ कर्ता परमेश्वरु । आपला माइक विचारु । जैसें कळेल तैसें करूं । जगदंतरें ॥ २९ ॥ देवायेवढें चपळ नाहीं । ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं । पाइरीनें पाइरी चढोन पाहीं । मूळपरियंत ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मानिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ येथून पाहातां तेथवरी । चत्वार जिनस अवधारी । येक चौदा पांच चारी । ऐसें आहे ॥ १ ॥ परब्रह्म सकळांहून वेगळें । परब्रह्म सकळांहून आगळें । नाना कल्पनेनिराळें । परब्रह्म तें ॥ २ ॥ परब्रह्माचा विचार । नाना कल्पनेहून पर । निर्मळ निश्चळ निर्विकार । अखंड आहे ॥ ३ ॥ परब्रह्मास कांहींच तुळेना । हा येक मुख्य जिनसाना । दुसरा जिनस नाना कल्पना । मूळमाया ॥ ४ ॥ नाना सूक्ष्मरूप । सूक्ष्म आणी कर्दमरूप । मूळींच्या संकल्पाचा आरोप । मूळमाया ॥ ५ ॥ हरिसंकल्प मूळींचा । आत्माराम सकळांचा । संकेत नामाभिधानाचा । येणें प्रकारें ॥ ६ ॥ निश्चळीं चंचळ चेतलें । म्हणोनी चैतन्य बोलिलें । गुणसमानत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ७ ॥ अर्धनारीनटेश्वर । तोचि षड्गुणैश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार । शिवशक्ती ॥ ८ ॥ शुद्धसत्वगुणाची मांडणी । अर्धमात्रा गुणक्षोभिणी । पुढें तिन्ही गुणांची करणी । प्रगट जाली ॥ ९ ॥ मन माया अंतरात्मा । चौदा

विभागली असून परमेश्वर त्यांच्याकडून कार्यें करवितो म्हणून ‘ हरिर्दाता हरिर्भोक्ता ’ असें म्हटल्यानें अहंकाराची भूतबाधा होत नाहीं. सर्वकर्ता परमेश्वर आहे, मी कोण करणार, जगदंतरीं नांदणारा परमात्मा करवील तसेंच करूं असा विचार करावा. देवासारखे (अंतरात्म्यासारखे) चपळ कार्यकर्ते कोण आहेत ? ब्रह्मासारखें निश्चळ दुसरें कोण आहे ? पायरीनें पायरी चढत मूळापर्यंत जावें (२४–३०). [द० २०, स० ४]

निश्चळ ब्रह्मापासून पिंडापर्यंत विचार करून पाहिलें तर ‘ एक चौदा पांच चारी ’ असे चार जिनस आहेत. एक म्ह० निश्चळ ब्रह्म; चौदा म्ह० मूळमायेचीं चौदा रूपें किंवा नांवें (चैतन्य, गुणसाम्य, अर्धनारीनटेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, षड्गुणेश्वर, महत्तत्व, गुणक्षोभिणी, सत्व-रज-तम हे त्रिगुण, मन, माया, जीव म्ह० अंतरात्मा. द० २०, स० ९, ओंवी २१ ते २९ पाहा); पांच म्ह० पंचमहाभूतें व चार म्ह० चार खाणींचे जीव – असे हे चार जिनस आहेत (१). परब्रह्म सर्वांहून वेगळें, सर्वांत श्रेष्ठ व सर्व कल्पनातीत म्ह० निर्विकल्प एकीएक असें आहे, तें निर्मळ, निश्चळ, निर्विकार व अखंड आहे. त्याची साम्यता कोणासच नाहीं. हा मुख्य जिनस. दुसरा जिनस म्ह० अनंत कल्पनारूप मूळमाया (२–४). अनेक सूक्ष्मरूपात्मक असून कर्दमरूप अशी मूळमाया आहे. ब्रह्मीं ‘ एकोऽहं बहुः स्याम् ’ हा जो आदिसंकल्प उठला ती मूळमाया. मूळमाया म्ह० हरिसंकल्प. सकळांचा आत्माराम तो. त्यालाच चौदा संकेतनामें ओळख पटण्यासाठीं दिलीं आहेत. निश्चळीं चंचळ चेतलें म्हणून त्याला चैतन्य म्हणतात. त्याला गुणांच्या समानत्वामुळें गुणसाम्य म्हणतात. अर्धनारीनटेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, षड्गुणेश्वर हीं त्याचींच नांवें आहेत. शुद्ध सत्वगुणरूप अर्धमात्रा गुणमाया तोच. तेथून त्रिगुण प्रगटले हेंही त्याचेंच रूप. मन, माया, अंतरात्मा हींही नांवें त्या मूळमायेचींच. ज्ञानात्मा या चौदा ठिकाणीं

जिनसांची सीमा । विद्यमान ज्ञानात्मा । इतुके ठाई ॥ १० ॥ ऐसा दुसरा जिनस । अभिधानें चतुर्दश । आतां तिसरा जिनस । पंचमहाभूतें ॥ ११ ॥ येथें पाहातां जाणीव थोडी । आदिअंत हे रोकडी । खाणी निरोपिल्या तांतडी । तो चौथा जिनस ॥ १२ ॥ चारी खाणी अनंत प्राणी । जाणीवेची जाली दाटणी । चारी जिनस येथुनी । संपूर्ण जाले ॥ १३ ॥ बीज थोडें पेरिजेतें । पुढें त्याचें उदंड होतें । तैसें जालें आत्मयातें । खाणी वाणी प्रगटतां ॥ १४ ॥ ऐसीं सत्ता प्रबळली । थोडे सत्तेची उदंड जाली । मनुष्यवेषें सृष्टी भोगिली । नाना प्रकारें ॥ १५ ॥ प्राणी मारून श्वापद पळे । वरकड त्यास काय कळे । नाना भोग तो निवळे । मनुष्यदेहीं ॥ १६ ॥ नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस । नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥ १७ ॥ अमोल्य रत्नें नाना वस्त्रें । नाना यानें नाना शस्त्रें । नाना विद्या कळा शास्त्रें । नरदेह जाणे ॥ १८ ॥ पृथ्वी सत्तेनें व्यापिली । स्थळोस्थळीं आटोपिली । नाना विद्या कळा केली । नाना धारणा ॥ १९ ॥ दृश्य अवघेंचि पाहावें । स्थानमान सांभाळावें । सारासार विचारावें । नरदेह जालियां ॥ २० ॥ येहलोक आणी परलोक । नाना प्रकारींचा विवेक । विवेक आणी अविवेक । मनुष्य जाणे ॥ २१ ॥ नाना पिंडीं ब्रह्मांडरचना । नाना मूळींची कल्पना । नाना प्रकारीं धारणा । मनुष्य जाणे ॥ २२ ॥ अष्टभोग नवरस । नानाप्रकारींचा विळास । वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ॥ २३ ॥ मनुष्यें सकळांस आळिलें । त्या मनुष्यास देवें पाळिलें । ऐसें हें अवघें कळलें । नरदेहयोगें ॥ २४ ॥ नरदेह

असतो. हा दुसरा जिन्नस झाला. आतां तिसरा जिन्नस पंचभूतें. येथें जाणीव थोडी व पंचभूतांना आदिअंत (उत्पत्तिनाश) आहेत. चौथा जिन्नस म्ह० चार खाणींचे अनंत प्राणी. हे जाणीवरूप आहेत. येणेंप्रमाणें चार जिनसांची कहाणी आहे (५–१३). थोडें बीज पेरिलें तरी त्याचें फार मोठें पीक भरभरून येतें. त्याप्रमाणें आत्मारामापासून चार खाणी, चार वाणी चौऱ्यांशीं लक्ष जीवयोनींचा अद्भुत विस्तार झाला आहे. याप्रमाणें ईश्वरी सत्ता उगमांत थोडी सूक्ष्म असून तिचा विस्तार विश्वभर झाला आहे व मनुष्यवेषानें तिनें सृष्टीचा उपभोगही नानाप्रकारें घेतला आहे. हरिणाला मारून वाघ पळतो, त्याला याशिवाय दुसरें काय कळतें ? अनेक भोग नरदेहांतच घडतात – अनेक शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचा म्ह० पंच विषयांचा भोग नरदेहींच घडतो. अमूल्य वस्त्रालंकार, अनेक वाहनें व शस्त्रें, अनेक विद्या व कळा नरदेहच जाणतो. सारी पृथ्वी ईश्वरी सत्तेनें व्यापिली आहे, प्रत्येक स्थळीं तीच भरून राहिली आहे, जिकडे तिकडे नाना विद्या, धारणा व कळा त्या सत्तेच्या आधारावरच उभ्या राहिल्या आहेत. नरदेह मिळाल्यावर सारें दृश्य धुंडून पाहावें, स्थान व मान सांभाळावे व सारासारविचार करावा. इहलोक व परलोक, विवेक व अविवेक मनुष्यच जाणतो. अनेक पिंडब्रह्मांडांची रचना, मूळमायेपासून झालेल्या अनंत कल्पना, धारणा, अष्टभोग (अन्न, उदक, तांबूल, पुष्प, चंदन, वसन, शय्या व अलंकार हे अष्टभोग), नवरस (शृंगार, वीर, करुण, रौद्र, बीभत्स, भयानक, अद्भुत, हास्य व शांत हे नवरस), नानाविध विलास, वाच्यांश, लक्ष्यांश, सारांश सर्व कांहीं मनुष्यदेहांतच समजतें (१४–२३). मनुष्यानें सर्वांस आपल्या ताब्यांत ठेवलें आहे. आकलन केलें आहे (आळिलें), पण मनुष्यास पाळणारा परमेश्वर आहे आणि हेंही नरदेहामुळेंच समजतें. नरदेह अत्यंत दुर्लभ

परम दुर्लभ । येणें घडे अलभ्य लाभ । दुर्लभ तें सुलभ । होत आहे ॥ २५ ॥ वरकड देह हे काबाड । नरदेह मोठें घबाड । परंतु पाहिजे जाड । विवेकरचना ॥ २६ ॥ येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला । देव नाहीं वोळखिला । विवेकबळें ॥ २७ ॥ नर तोचि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण । मनशीळ अंतःकरण । सर्वकाळ ॥ २८ ॥ जेणें स्वयेंचि पोहावें । त्यास कासेसी नलगे लागावें । स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं ॥ २९ ॥ सकळ शोधून राहिला । संदेह कैंचा तयाला । पुढें विचार कैसा जाला । त्याचा तोचि जाणे ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चत्वारजिनसनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ पाहों जातां भूमंडळ । ठाई ठाईं आहे जळ । कितेक ते निर्मळ माळ । जळेंवीण पृथ्वी ॥ १ ॥ तैसें दृश्य विस्तारलें । कांहींयेक जाणीवेनें शोभलें । जाणीवरहित उरलें । कितीयेक दृश्य ॥ २ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी । शास्त्रीं अवघें नेमुनी । बोलिलें असे ॥ ३ ॥

श्लोकः—जलजा नवलक्षाश्च दशलक्षाश्च पक्षिणः । कृमयो रुद्रलक्षाश्च विंशल्लक्षा गवादयः ॥
स्थावरास्त्रिंशल्लक्षाश्च चतुर्लक्षाश्च मानवाः । पापपुण्यं समं कृत्वा नरयोनिषु जायते ॥ १ ॥

मनुष्य च्यारी लक्ष । पशु वीस लक्ष । कृमी आक्रा लक्ष । बोलिले शास्त्रीं ॥ ४ ॥ दहा लक्ष ते खेचर । नव लक्ष जळचर । तीस लक्ष स्थावर । बोलिले शास्त्रीं ॥ ५ ॥ ऐसी चौऱ्यांसी लक्ष योनी । जितुका तितुका जाणता प्राणी । अनंत देहाची मांडणी । मर्यादा कैंची ॥ ६ ॥ अनंत प्राणी होत जाती ।

आहे, याच्या योगानें अलभ्य लाभ होतात, दुर्लभ तेंच सुलभ होतें. इतर देह काबाडकष्ट करणारे आहेत, मनुष्यदेह हें मोठें घबाड (अपूर्व ठेवा, महल्लाभ) आहे, पण अत्यंत मोठा सूक्ष्म-विचार पाहिजे. येथें आळस केला व विवेकबळानें देव ओळखिला नाहीं तर सर्वस्वीं नाश आहे. सर्व काळ प्रत्ययाचें श्रवण करील तर नर तोच नारायण होतो. ज्याला स्वतःच पोहतां येतें त्याला दुसऱ्याचे कासेस लागण्याचें कारण नाहीं, त्यानें स्वतंत्र बुद्धीनें स्वयें शोध घ्यावा. सर्व शोध घेऊन बसला (स्वरूपीं जागेवर ठरला) मग त्याला संदेह कोठून उरणार ? पुढील विचार ज्याचे त्यालाच माहीत (२४–३०). [द० २०, स० ५]

ह्या भूमंडळाचा विचार मनांत आणतां ठिकठिकाणीं जल (नदीवापीकूपतडागादिकांतून) भरलेलें आढळतें पण कित्येक माळरानें अशीं कोरडीं ठणठणीत आहेत कीं तेथें पाण्याचा थेंब दिसत नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या बाह्यसृष्टीचा विचार करितां कित्येक स्थळीं जाणीव आहे व कित्येक स्थळें जाणीवविरहित आहेत असें दिसतें. चार खाणी, चार वाणी, चौऱ्यांशीं लक्ष जीवयोनी मिळून अनंत प्राणी कमजास्त जाणीवेनें वर्तत आहेत. चार लक्ष मानव, वीस लक्ष पशु, अकरा लक्ष कृमिकीटक, दहा लक्ष खेचर, नऊ लक्ष जळचर, तीस लक्ष स्थावर अशी संख्या शास्त्रांतून दिली आहे. या चौऱ्यांशी लक्ष योनींतले प्राणी जाणीवेनें वर्तत आहेत. त्यांचे देहही विविध प्रकारचे आहेत, अनंत प्राणी जन्मतात व मरतात पण

त्यांचें अधिष्ठान जगतीं । जातीवेगळी स्थिती । त्यास कैंची ॥ ७ ॥ पुढें पाहातां पंचभूतें । पावलीं स्पष्टदशेतें । कोणी विद्यमान कोणी ते । उगीच असती ॥ ८ ॥ अंतरात्म्याची वोळखण । तेचि जेथें चपळपण । जाणीवेचें अधिष्ठान । सावध ऐका ॥ ९ ॥ सुखदुःख जाणता जीव । तैसाचि जाणावा सदाशिव । अंतःकरणपंचक अपूर्व । अंश आत्मयाचा ॥ १० ॥ स्थूळीं आकाशाचे गुण । अंश आत्मयाचे जाण । सत्व रज तमोगुण । गुण आत्मयाचे ॥ ११ ॥ नाना चाळणा नाना धृती । नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ती । अलिप्तपण सहजस्थिती । गुण आत्मयाचे ॥ १२ ॥ द्रष्टा साक्षी ज्ञानघन । सत्ता चैतन्य पुरातन । श्रवण मनन विवरण । गुण आत्मयाचे ॥ १३ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ध्यान । ज्ञेय ज्ञाता ज्ञान । गुण आत्मयाचे ॥ १४ ॥ वेदशास्त्रपुराणअर्थ । गुप्त चालिला परमार्थ । सर्वज्ञपणें समर्थ । गुण आत्मयाचे ॥ १५ ॥ बद्ध मुमुक्षु साधक सिद्ध । विचार पाहाणें शुद्ध । बोध आणि प्रबोध । गुण आत्मयाचे ॥ १६ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति तुर्या । प्रकृतिपुरुष मूळमाया । पिंड ब्रह्मांड अष्टकाया । गुण आत्मयाचे ॥ १७ ॥ परमात्मा आणि परमेश्वरी । जगदात्मा आणी जगदीश्वरी । महेश आणी माहेश्वरी । गुण आत्मयाचे ॥ १८ ॥ सूक्ष्म जितुकें नामरूप । तितुकें आत्मयाचें स्वरूप । संकेत नामाभिधानें अमूप । सीमा नाहीं ॥ १९ ॥ आदिशक्ती शिवशक्ती । मुख्य मूळमाया सर्वशक्ती । नाना जिनस उत्पत्ती स्थिती । तितुके गुण आत्मयाचे ॥ २० ॥ पूर्वपक्ष आणी सिद्धांत । गाणें वाजवणें संगीत । नाना विद्या अद्भुत । गुण आत्मयाचे ॥ २१ ॥ ज्ञान अज्ञान विपरीतज्ञान । असद्वृत्ति सद्वृत्ती जाण । ज्ञप्तिमात्र अलिप्तपण । गुण आत्मयाचे ॥ २२ ॥ पिंड ब्रह्मांड तत्वझाडा । नाना तत्वांचा निवाडा । विचार पाहाणें उघडा । गुण आत्मयाचे ॥ २३ ॥

त्यांना वर्तायला आधार म्हणजे केवळ पृथ्वीच आहे, पृथ्वीवांचून त्यांना आधार नाहीं. पुढें पाहतां पंचभूतें व्यक्तदशेला आलीं आहेत, कोणी प्रगट व गुप्त आहेत (पृथ्वी, आप व तेज व्यक्त व वायु आणि आकाश अव्यक्त आहेत.) चपळपण जेथें आहे तेथें अंतरात्मा आहे ही त्याची खूण. आतां जाणीवेचें लक्षण ऐका (१–९). आत्माराम ज्या अनेक रूपांनीं नटला आहे ते सर्व त्याचे गुण आहेत, कसें तें पुढें सविस्तर सांगितलें आहे. सुखदुःख जाणणें हा जीवाचा व शिवाचाही गुण आहे. अंतःकरणपंचक, स्थूळ देहाच्या ठिकाणचे आकाशाचे अंश, त्रिगुण, नाना चाळणा व धृति, नवविधा भक्ति व चतुर्विधा मुक्ति, अलिप्तपण, सहजावस्था, हे आत्म्याचे गुण होत. द्रष्टा, साक्षी, ज्ञानघन, सद्रूप, चिद्रूप, हे आत्म्याचे गुण होत. वेदशास्त्रपुराणचर्चा, गुप्त चाललेला परमार्थ, सर्वज्ञपणाचें सर्व सामर्थ्य आत्मारामाचें आहे, बद्धमुमुक्षु इ० चार प्रकार, जागृत्यादि

नाना ध्यानें अनुसंधानें। नाना स्थिती नाना ज्ञानें। अन्वय आत्मनिवेदनें। गुण आत्मयाचे ॥ २४ ॥ तेतीस कोटी सुरवर। आठ्यांसी सहस्र ऋषेश्वर। भूत खेचर अपार। गुण आत्मयाचे ॥ २५ ॥ भूतावळी औटकोटी। चामुंडा छपन्न कोटी। कात्यायनी नव कोटी। गुण आत्मयाचे ॥ २६ ॥ चंद्र सूर्य तारामंडळें। नाना नक्षत्रें ग्रहमंडळें। शेष कूर्म मेघमंडळें। गुण आत्मयाचे ॥ २७ ॥ देव दानव मानव। नाना प्रकारींचे जीव। पाहातां सकळ भावाभाव। गुण आत्मयाचे ॥ २८ ॥ आत्मयाचे नाना गुण। ब्रह्म निर्विकार निर्गुण। जाणणें एकदेशी पूर्ण। गुण आत्मयाचे ॥ २९ ॥ आत्मारामउपासना। तेणें पावले निरंजना। निःसंदेह अनुमाना। ठावचि नाहीं ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मागुणनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ अनिर्वाच्य समाधान जालें। तें पाहिजे बोलिलें। बोलिल्यासाठीं समाधान गेलें। हें तों घडेना ॥ १ ॥ कांहीं सांडावें लागत नाहीं। कांहीं मांडावें लागत नाहीं। येक विचार शोधून पाहीं। म्हणिजे कळे ॥ २ ॥ मुख्य कासीविश्वेश्वर। श्वेतबंद रामेश्वर। मलकार्जुन भीमाशंकर। गुण आत्मयाचे ॥ ३ ॥ जैसीं मुख्य बारा लिंगें। यावेगळीं अनंत लिंगें। प्रचीत जाणिजेत जगें। गुण आत्मयाचे ॥ ४ ॥ भूमंडळीं अनंत शक्ती। नाना साक्षात्कार चमत्कार होती। नाना देवांच्या सामर्थ्यमूर्ती। गुण आत्मयाचे ॥ ५ ॥ नाना सिद्धांचीं सामर्थ्यें। नाना मंत्रांचीं सामर्थ्यें। नाना मोहरेवल्लींत सामर्थ्यें। गुण आत्मयाचे ॥ ६ ॥ नाना तीर्थांचीं सामर्थ्यें। नाना क्षेत्रांचीं सामर्थ्यें। नाना भूमंडळीं सामर्थ्यें। गुण आत्मयाचे ॥ ७ ॥ जितुके कांहीं उत्तम गुण। तितुकें आत्मयाचें लक्षण। बरें वाईट तितुकें जाण। आत्म्याचकरितां ॥ ८ ॥

चार अवस्था, पिंडाचे व ब्रह्मांडाचे मिळून अष्ट देह, सूक्ष्मनामरूपात्मक सर्व कांहीं आत्म्याचे गुण आहेत. मूळमाया, चोवीस प्रकारचे चार जिन्नस, अज्ञानज्ञान, देवसुरगंधर्वादि योनि, भूतभौतिक सर्व कांहीं आत्मारामाचे गुण आहेत, एकदेशी व पूर्ण आत्माच आहे; हें जाणणें ही आत्मारामाची उपासना आहे; तेणेंकरून निर्गुणपद मिळतें (१–३०). [द० २०, स० ६]

अनिर्वाच्य समाधान झालें तें शब्दांनीं सांगितलें पाहिजे. निःशब्दाचें समाधान शब्दांनीं सांगितलें म्हणून समाधान कांहीं ढळत नाहीं. मग सांगण्यानें काय बिघडणार ? काशीविश्वेश्वर, सेतुबंध रामेश्वर,-मुख्य बारा लिंगें, नाना तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणचीं सामर्थ्यें, साक्षात्कार, चमत्कार, देवदेवतांच्या मूर्ति, हे सर्व आत्मारामाचे गुण आहेत. उत्तम गुण सारे आत्मारामाचे. बरें वाईट जें कांहीं होतें जातें तें सर्व आत्म्यामुळेंच होय (१–८). (साधुसंतांच्या ठिकाणचा) शुद्ध आत्मा

शुद्ध आत्मा उत्तमगुणी । सबळ आत्मा अवलक्षणी । बरी वाईट अवघी करणी । आत्मयाची ॥ ९ ॥ नाना साभिमान धरणें । नाना प्रतिसृष्टि करणें । नाना श्र्यापउश्र्यापलक्षणें । गुण आत्मयाचे ॥ १० ॥ पिंडाचा बरा शोध घ्यावा । तत्वांचा पिंड बरा शोधावा । तत्वें शोधितां पिंड आघवा । कळों येतो ॥ ११ ॥ जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा । निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथें तेथें ॥ १२ ॥ निश्चळ चंचळ आणी जड । पिंडीं करावा निवाड । प्रत्ययावेगळें जाड । बोलणें नाहीं ॥ १३ ॥ पिंडामधून आत्मा जातो । तेन्हां निवाडा कळों येतो । देह जड हा पडतो । देखत-देखतां ॥ १४ ॥ जड तितुकें पडिलें । चंचळ तितुकें निघोन गेलें । जडचंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ॥ १५ ॥ निश्चळ आहे सकळां ठाईं । हें तों पाहाणें नलगे कांहीं । गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥ १६ ॥ जैसें पिंड तैसें ब्रह्मांड । विचार दिसतो उघड । जड चंचळ जातां जाड । परब्रह्मचि आहे ॥ १७ ॥ महाभूतांचा खंबीर केला । आत्मा घालून पुतळा जाला । चालिला सृष्टीचा गलबला । येणें रिती ॥ १८ ॥ आत्मा माया विकार करी । आळ घालिती ब्रह्मावरी । प्रत्ययें सकळ कांहीं विवरी । तोचि भला ॥ १९ ॥ ब्रह्म व्यापक अखंड । वरकड व्यापकता खंड । शोधून पाहातां जड । कांहींच नाहीं ॥ २० ॥ गगनासी खंडता नये । गगनाचे नासेल काय । जरी जाला महाप्रळय । सृष्टिसंव्हार ॥ २१ ॥ जें संव्हारामध्यें सांपडलें । तें सहजचि नासिवंत जालें । जाणते लोकीं उगविलें । पाहिजे

उत्तम गुणी व (पामराच्या ठिकाणचा) शबल (मिश्र) आत्मा अवलक्षणी जाणावा, बरी वाईट सर्व करणी आत्म्याची होय (९). नानाप्रकारचे अभिमान धरणें, प्रतिसृष्टि उभी करणें, शापउश्याप देणें, हे आत्म्याचे गुण होत (१०). पिंडाचा शोध (पंचीकरण समजून) घ्यावा, पिंडांतलीं तत्त्वें शोधावींत, तत्त्वें शोधतां पिंड कळतो. जड देह आहे पंचभूतांचा व चपळपण आहे आत्म्याचा गुण, पण कोठेंही झालें तरी निश्चळ ब्रह्माचा व्यापकपणा अबाधित आहे. निश्चळब्रह्म, चंचळ आत्मा व जड देह यांचा निवाडा पिंडांत म्ह० नरदेहांत असतांनाच करावा. अनुभवाच्या भाषणाइतकें वजनदारीचें भाषण दुसरें नाहीं. पिंड सोडून आत्मा जातो यावरून पिंडाहून आत्मा वेगळा आहे हें उघड आहे. देह प्रेतरूप पडतो. जड राहातें व चंचळ निघून जातें यांत जडचंचळांचा निवाडा झाला. आतां निश्चळ सर्वत्र आहेच हें कांहीं शोधायला नको आहे, त्याला आत्म्यासारखे गुणविकार नाहींत, जो विचार पिंडाचा तोच ब्रह्मांडाचा. त्यांतही जडचंचळांचा निवाडा असाच झाला म्हणजे घनदाट एक परब्रह्म आहे (११–१७). महाभूतांची मूस किंवा पिंजरा (खंबीर) अशा देहांत आत्मा घालून पुतळा उभा राहिला व अशा रीतीनें सृष्टीचा कारभार चालला आहे. मायेचे सर्व विकार आत्म्यामुळें प्रगट दिसतात, पण आत्म्याच्या विकारांचा आळ घालतात ब्रह्मावर. प्रत्ययानें सर्व विवरतो तोच भला. ब्रह्माची व्यापकता अखंड आहे व इतरांची (द. २०, स. १, ओवी १२ पाहा) व्यापकता खंडित आहे. विचार करून पाहतां यांत समजायला अवघड कांहींच नाहीं. महाप्रळय होऊन सृष्टिसंहार झाला तरी गगनाचा खंड पडत नाहीं, गगनाचें काय नासायचें आहे ? जें संहारांत सांपडलें तें सहजच नाशवंतांत आलें, जाणत्यांनीं हें कोडें उमगलें पाहिजे. कळलें नाहीं

कोडें ॥ २२ ॥ न कळतां वाटे कोडें । कळतां अवघें दिसें उघडें । म्हणोनी येकांतीं निवाडें । विचार पाहावा ॥ २३ ॥ मिळतां प्रत्ययाचे संत । येकांतापरी येकांत । केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा ॥ २४ ॥ पाहिल्यावेगळें कळत नाहीं । कळतां कळतां संदेह नाहीं । विवेक पाहातां कोठेंचि नाहीं । मायाजाळ ॥ २५ ॥ गगनीं अभाळ आलें । मागुती सवेंचि उडालें । आत्म्याकरितां दृश्य जालें । उडेल तैसें ॥ २६ ॥ मूळापासून सेवटवरी । विवेकी विवेकें विवरी । तोचि निश्चय थावरी । चळेना ऐसा ॥ २७ ॥ वरकड निश्चय अनुमानाचे । अनुमानें बोलतां काय वेंचे । जाणते पुरुष प्रचीतीचे । ते तों मानीतना ॥ २८ ॥ उगेंच बोलणें अनुमानाचें । अनुमानाचें कोण्या कामाचें । येथें सगट विचाराचें । काम नाहीं ॥ २९ ॥ सगट विचार तो अविचार । कितेक म्हणती येकंकार । येकंकार भ्रष्टाकार । करूं नये ॥ ३० ॥ कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं येक शुद्ध घ्यावें । जाणजाणों निवडावें । सारासार ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ विधीप्रपंचतरु वाढला । वाढतां वाढतां विस्तीर्ण जाला । फळें येतां विश्रांती पावला । बहुत प्राणी ॥ १ ॥ नाना फळें रसाळें लागलीं । नाना जिनसीं गोडीस आलीं । गोडी पाहावया निर्माण केलीं । नाना शरीरें ॥ २ ॥ निर्माण जाले उत्तम विषय । शरीरेंवीण भोगितां नये । म्हणोनी निर्मिला उपाय । नाना शरीरें ॥ ३ ॥ ज्ञानइंद्रियें निर्माण केलीं ।

म्हणजे अवघड (कोडें) वाटतें व कळलें म्हणजे उघडें दिसतें, म्हणून एकांतीं विचार पाहावा म्हणजे सर्व कांहीं उकलतें. अनुभवी संत मिळाले म्हणजे त्यांचा जो संवाद होतो तोच खरोखरी एकांत प्रसंग होय, तेथें सावधपणें चर्चा करून निवाडा करावा. विचार पाहिल्यावांचून कळत नाहीं, कळत जातें तसतसा संदेह उडत जातो, विवेकानें पाहिल्यावर मायाजाळ दृष्टीसमोर ठरत नाहीं. आकाशांत येतें व लगेच जातें, तसें आत्मसत्तेमुळें नामरूपाला आलेलें दृश्य (निश्चळाच्या निश्चयापुढें) टिकत नाहीं. मूळापासून शेवटपर्यंत विवेकपूर्वक विवरून पाहील तर अचळ निश्चय होऊन राहील. निश्चळ ब्रह्माच्या निश्चयावांचून इतर निश्चय अनुमानिक होत, ते बोलणारे बोलत राहतात पण अनुभवी संतांस ते मान्य होत नाहींत. अनुमानाचे बोलण्याचा उपयोग काय ? भरमसाट विचार येथें कामाचा नाहीं. तो विचार नव्हे, अविचार होय. एकंकाराचा विचार म्हणजे भ्रष्टाकार होय. तो कधींही करूं नये. कृत्रिम—खोटें—टाकून एक शुद्ध निश्चळ ब्रह्म सारासार-विचारानें घ्यावें (१८–३१). [द० २०, स० ७]

ब्रह्मदेवाचा हा संसारवृक्ष वाढला व वाढतां वाढतां फारच पसरला, नंतर त्यास फळें आलीं तीं चाखून बहुत प्राणी विश्रांति पावले. अनेक फळें (विषयेंद्रियसंयोगापासून होणारीं सुखें) रसाळ लागलीं व त्यांत अनेक प्रकारची रुचि उत्पन्न झाली व तिचा आस्वाद घेण्यास अनेक शरीरें ब्रह्मदेवानें निर्माण केलीं. विषय उत्तम असले तरी शरीरावांचून त्याचा भोग घडत नाहीं, म्हणून त्यासाठीं अनेक शरीरें उत्पन्न करण्याची त्यानें युक्ति काढली. त्यानें पंच ज्ञानेंद्रियें उत्पन्न करून त्यांत

भिन्न भिन्न गुणांचीं निर्मिलीं । येका शरीरासी लागलीं । परी वेगळालीं ॥ ४ ॥ श्रोत्रइंद्रिईं शब्द पडिला । त्याचा भेद पाहिजे कळला । ऐसा उपाय निर्माण केला । इंद्रियांमध्यें ॥ ५ ॥ त्वचेइंद्रियें शीतोष्ण भासे । चक्षुइंद्रियें सकळ दिसे । इंद्रियांमध्यें गुण ऐसे । वेगळाले ॥ ६ ॥ जिव्हेमध्यें रस चाखणें । घ्राणामध्यें परिमळ घेणें । इंद्रियांमध्यें वेगळाल्या गुणें । भेद केले ॥ ७ ॥ वायोपंचकीं अंतःकरणपंचक । मिसळोनि फिरे निशंक । ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें सकळिक । सावकास पाहे ॥ ८ ॥ कर्मइंद्रियें लागवेगीं । जीव भोगी विषयांलागीं । ऐसा उपाय जगीं । ईश्वरें केला ॥ ९ ॥ विषय निर्माण जाले बरवे । शरीरेंवीण कैसे भोगावे । नाना शरीरांचें गोवें । याकारणें ॥ १० ॥ अस्थिमांसांचें शरीर । त्यामध्यें गुणप्रकार । शरीरासारखें यंत्र । आणीक नाहीं ॥ ११ ॥ ऐसीं शरीरें निर्माण केलीं । विषयभोगें वाढविलीं । लहानथोर निर्माण जालीं । येणेंप्रकारें ॥ १२ ॥ अस्थिमांसांचीं शरीरें । निर्माण केलीं जगदीश्वरें । विवेकें गुणविचारें । करूनियां ॥ १३ ॥ अस्थिमांसांचा पुतळा । जेणें ज्ञानें सकळ कळा । शरीरभेद वेगळा । ठाईं ठाईं ॥ १४ ॥ तो भेद कार्याकारण । त्याचा उदंड आहे गुण । सकळ तीक्ष्ण बुद्धीविण । काय कळे ॥ १५ ॥ सकळ करणें ईश्वराला । म्हणोनी भेद निर्माण केला । उर्ध्वमुख होतां भेदाला । ठाव कैंचा ॥ १६ ॥ सृष्टिकरणीं आगत्य भेद । संहारें सहजची अभेद । भेद अभेद हा संवाद । मायागुणें ॥ १७ ॥ मायेमध्यें अंतरात्मा । नकळे तयाचा महिमा । जाला

निरनिराळे गुण घातले. तीं एका शरिरांत आहेत पण भिन्नभिन्न आहेत. श्रोत्रेंद्रियाला (कर्णाला) शब्दविषय दिला, त्वचेच्या इंद्रियाला म्ह० त्वगिंद्रियाला शीतोष्ण जाणण्याची शक्ति दिली, चक्षुरिंद्रियाला (डोळ्यांला) रूपविषय दिला, जिव्हेला रस चाखणें हा व प्राणाला (नाकाला) सुवास घेणें हा विषय दिला. याप्रमाणें वेगवेगळ्या इंद्रियांला वेगवेगळे विषय देऊन पंच ज्ञानेंद्रियें भिन्न केलीं. वायुपंचक म्ह० प्राण, अपान, उदान, समान आणि व्यान हे पंचप्राण, यांशीं आकाशपंचक म्ह० चित्त, अहंकार, बुद्धि, मन आणि अंतःकरण हें अंतःकरणपंचक मिसळून तें निःशंक फिरत ठेवलें व त्याला ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें सर्व पाहतां येईल असें केलें. कर्मेंद्रियांच्या योगानें जीव हा विषयोपभोग घेऊं शकतो असा उपाय ब्रह्मदेवानें केला (१–९). विषय उत्पन्न केले पण ते शरिरावांचून भोगतां येत नाहींत म्हणून नाना शरीरें निर्माण केलीं. अस्थिमांसांचें हें शरीर, पण त्यांत सत्व, रज, तम हे तीन गुण घातले. खचित शरिरासारखें दुसरें यंत्र नाहीं. अशीं शरीरें निर्माण करून विषयभोगानें तीं वाढविलीं. शरीरें लहानमोठीं अनंत आहेत. हाडामांसांचीं शरीरें जगदीश्वरानें मोठ्या विवेकानें गुणांचा विचार करून निर्माण केलीं. हाडामांसांचा हा पुतळा आहे पण ज्ञानकलेनें सकलकलाप्रवीण झाला आहे. ठिकठिकाणीं भिन्नभिन्न प्रकारचीं शरीरें झालीं आहेत ; पण तो भेदही कार्यापुरताच आहे तरी त्याचे गुण अनेक आहेत. सूक्ष्मबुद्धीवांचून हें काय कळणार आहे ? ईश्वराला (मूळमायेला) सारें करावें लागतें म्हणून त्यानें असा भेद (विविधता) केला आहे, बाकी ऊर्ध्वमुख होतां (ब्रह्माकडे पाहतां) भेदाला जागाच आहे कोठें ? (भेद मायेंत आहेत, ब्रह्मांत नाहींत.) सृष्टीच्या उत्पत्तिकार्यांत सर्व भेद होतात. पण संहारांत सर्व सपाट होऊन जातें. भेद आणि अभेद या कल्पना मायेंतल्या आहेत (१०–१७). अंतरात्म्याचा महिमा कळत नाहीं पण तो

चतुर्मुख ब्रह्मा । तोही संदेहीं पडे ॥ १८ ॥ पीळ पेंच कडोविकडी । तर्क तीक्ष्ण घडीनें घडी । मनासी होय तांतडी । विवरण करितां ॥ १९ ॥ आत्मत्वीं लागतें सकळ कांहीं । निरंजनीं हें कांहींच नाहीं । येकांतकाळीं समजोन पाहीं । म्हणिजे बरें ॥ २० ॥ देहसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदीश्वर । थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती ॥ २१ ॥ शेष कूर्म वराह जाले । येवढे देह विशाळ धरिले । तेणेंकरितां रचना चाले । सकळ सृष्टीची ॥ २२ ॥ ईश्वरें केवढें सूत्र केलें । सूर्यबिंब धांवाया लाविलें । धुकटाकरवीं धरविलें । अगाध पाणी ॥ २३ ॥ पर्वताऐसे ढग उचलिती । सूर्यबिंबासी आच्छादिती । तेथें सवेंचि वायोची गती । प्रगट होय ॥ २४ ॥ झिडकझिडकुं धांवे वारा । जैसा काळाचा म्हणियारा । ढग मारुनी दिनकरा । मोकळें करी ॥ २५ ॥ बैसवी विजांचे तडाखे । प्राणिमात्र अवचिता धाके । गगन कडकडून तडके । स्थळांवरी ॥ २६ ॥ येहलोकांसी येक वर्म केलें । महद्भूतें महद्भूत आळिलें । सकळ समभागें चालिलें । सृष्टिरचनेसी ॥ २७ ॥ ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैंचे । विवरतां विवरतां मनाचे । फडके होती ॥ २८ ॥ ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना । अगाध महिमा चतुरानना । काय कळे ॥ २९ ॥ आवाहन विसर्जन । हेंचि भजनाचें लक्षण । सकळ जाणती सज्जन । मी काय सांगों ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहक्षेत्रनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

सुद्धां मायेंतच आला, चतुर्मुख ब्रह्मा तोही भ्रमांतच पडतो. अंतरात्म्याचें विवरण करितां हरघडीला पीळ, पेंच, युक्ति, प्रयुक्ति व तीक्ष्ण तर्क लढवितां मनाची अगदीं तिरपीट उडून जाते. आत्म्याच्या संबंधीं या साऱ्या खटाटोपी कराव्या लागतात, ब्रह्माविषयीं विचार करितां या यातायातींचें कारणच नाहीं, एकांतांत हें विवरून पाहावें. देहसामर्थ्यानुसार सर्व कांहीं ईश्वर (मूळमाया) करितो, मोठें सामर्थ्य प्रगट होतें त्याला ' अवतार ' म्हणतात. शेष, कूर्म, वराह असे अवतार होऊन त्यांनीं मोठाले देह धारण केले म्हणून सृष्टि चालली आहे (१८–२२). ईश्वरानें सृष्टि हें केवढें प्रचंड यंत्र उभें केलें आहे पाहा ! — कीं त्यानें एवढ्या सूर्यबिंबाला धांवायला लावलें आहे. (ढग, धुकट) धूर याला पाणी धरायला लावलें आहे, पर्वताकार ढग उभे राहतात काय अन् सूर्यबिंबाला आच्छादतात काय ! लगेच तेथें झंझावात प्रगट होऊन घों घों वाहतात आणि काळाच्या सेवकांप्रमाणें (यमदूतांप्रमाणें) ढगांना मारून काढतात व सूर्यनारायणाला मोकळा करितात. विजांचे तडाखे बसतात आणि अकस्मात् प्राणिमात्र घाबरून जातात. आकाशांत कडकडाट होतात आणि जागोजाग पृथ्वी फाटून जाते. आणि ह्या सृष्टींत ईश्वरानें आणखी एक गूढ करून ठेवलें आहे कीं एक महद्भूत दुसऱ्या महद्भूताला ग्रासून टाकतें (आप पृथ्वीला, तेज आपाला याप्रमाणें) व सारी सृष्टिव्यवस्था कशी सुयंत्र (समभागें) चालली आहे. आत्म्याचे असे अनंत खेळ चालू आहेत, ते सारे मनुष्याला काय कळायचे आहेत? त्यांचा विचार करितां करितां मनाची दुर्दशा उडून जाते (२३–२८). माझी उपासना अशी आहे. उपासकांनीं तिचें मनन करावें. तिचा महिमा अगाध आहे, तो ब्रह्मदेवालाही कळणें दुरापास्त आहे ! आवाहन (मांडणी, उभारणी) आणि विसर्जन (मोडणी, संहार) हें आमच्या उपासनेचें लक्षण आहे. सर्व सज्जन हें जाणतात. मीं काय सांगावें ! (२९–३०) [द० २०, स० ८]

॥ श्रीराम ॥ मृत्तिकापूजन करावें । आणी सवेंचि विसर्जावें । हें मानेना स्वभावें । अंतःकरणासी ॥ १ ॥ देव पूजावा आणी टाकावा । हें प्रशस्त वाटे जीवा । याचा विचार पाहावा । अंतर्यामीं ॥ २ ॥ देव करिजे ऐसा नाहीं । देव टाकिजे ऐसा नाहीं । म्हणोनी याचा कांहीं । विचार पाहावा ॥ ३ ॥ देव नाना शरीरें धरितो । धरुनी मागुती सोडितो । तरी तो देव कैसा आहे तो । विवेकें वोळखावा ॥ ४ ॥ नाना साधनें निरूपणें । देव शोधायाकारणें । सकळ आपुलें अंतःकरणें । समजलें पाहिजे ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञानाचा उपाय । समजल्याविण देतां नये । पदार्थ आहे मा घे जाय । ऐसें म्हणावें ॥ ६ ॥ सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रत्यक्ष भेटवावा देव । परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे ॥ ७ ॥ विचार पाहातां तगेना । त्यास देव ऐसें म्हणावेना । परंतु जन राहेना । काय करावें ॥ ८ ॥ थोर लोक मरोनि जाती । त्यांच्या सुरता करुनी पाहाती । तैसीच आहे हेही गती । उपासनेची ॥ ९ ॥ थोर व्यापार ठाकेना जनीं । म्हणोनि केली रखतवानी । राजसंपदा तयाचेनी । प्राप्त कैंची ? ॥ १० ॥ म्हणोनी जितुका भोळाभाव । तितुका अज्ञानांचा स्वभाव । अज्ञानें तरी देवाधिदेव । पाविजे कैंचा ॥ ११ ॥ अज्ञानासी ज्ञान न माने । ज्ञात्यास अनुमान न माने । म्हणोनि सिद्धांचीये खुणें । पावलें पाहिजे ॥ १२ ॥ माया सांडून मूळास जावें । तरीच समाधान पावावें । ऐसें न होतां भरंगळावें । भलतीकडे ॥ १३ ॥ माया उलंघायाकारणें । देवासी नाना उपाय करणें ।

मृत्तिकेचें (मातीच्या हरिहरादि मूर्तींचें) पूजन करावें आणि लगेच तिचें (मूर्तीचें) विसर्जन करावें हें मनाला रुचत नाहीं, देव पुजावा आणि पुजून टाकावा हें जीवाला प्रशस्त वाटत नाहीं, पण याचा विचार मनांतच करून पाहावा. देव करावा म्ह० बनवावा, घडवावा असा नाहीं व टाकावा असाही नाहीं, म्हणून आवाहन व विसर्जन यांच्या अर्थाबद्दल खोल विचार झाला पाहिजे (१–३). देव (अंतरात्मा) अनेक शरीरें धारण करितो आणि टाकून देतो, तरी तो देव विवेकानें ओळखला पाहिजे. श्रवणमननादि साधनें, निरूपणें, सारीं देवाचा शोध लागावा यासाठीं करायचीं असतात, हें नीट मनीं धरावें. ब्रह्मज्ञानाचा उपाय स्वतः उकलल्याशिवाय दुसऱ्यांस सांगतां येत नाहीं, ब्रह्मज्ञान हा कांहीं असा दृश्य पदार्थ नाहीं कीं ज्याबद्दल दुसऱ्याला ' ये व हा घेऊन जा ' असें म्हणतां येईल. सर्वांच्या मनांत कीं ' मला देवाची भेट करून द्यावी, ' पण विवेकानें देव ठायीं पाडायचा मार्ग कांहीं और आहे. विचारांतीं टिकत नाहीं त्याला देव असें म्हणवत नाहीं, पण लोक धीर धरीत नाहींत याला काय करावें ! मोठमोठे लोक मरण पावले म्हणजे त्यांच्या मूर्ति, तसबिरी, पुतळे वगैरे करून ठेवतात, तसाच उपासनेचा प्रकार आहे. मोठ्या प्रमाणावर व्यापार करण्याची धमक नसली म्हणजे मजुरी (रखतवानी = मजुरीचें काम. शाईचा व्यापार असाही कोणी या शब्दाचा अर्थ करितात) करणेंच भाग आहे, राजैश्वर्य त्याला कोठून भोगायला मिळणार ? म्हणून भोळा भाव हा अज्ञानाचा स्वभाव होय, अज्ञानानें ज्ञानस्वरूप देवाधिदेव कसा ओळखतां यावा ? अज्ञानाला ज्ञानविचार मानवत नाहीं व ज्ञात्याला अनुमानिक गोष्टी पटत नाहींत म्हणून सिद्धांच्या (देव पावलेल्यांच्या) मार्गानेंच गेलें पाहिजे (४–१२). विवेकानें मायेचा त्याग करून मूळ गांठावें तरच देवप्राप्तीचें समाधान मिळेल, असें न केलें तर मग मन मानेल तिकडे खुशाल भटकावें ! मायानदीचा पलपार

अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ॥ १४ ॥ ऐसें न करितां लौकिकीं । अवघीच होते चुकामुकी । स्थिति खरी आणि लटकी । ऐसी वोळखावी ॥ १५ ॥ खोट्याचे वाटे जाऊं नये । खोट्याची संगती धरूं नये । खोटें संग्रहीं करूं नये । कांहीं येक ॥ १६ ॥ खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासीं तगेनात बालटें । मन अधोमुख उफराटें । केलें पाहिजे ॥ १७ ॥ अध्यात्म-श्रवण करीत जावें । म्हणिजे सकळ कांहीं फावे । नाना प्रकारींचे गोंवे । तुटोनि जाती ॥ १८ ॥ सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें । मानत मानत घालावें । मूळाकडे ॥ १९ ॥ सकळ कांहीं कालवलें । त्या सकळाचें सकळ जालें । शरीरीं विभागलें । सकळ कांहीं ॥ २० ॥ काये तें तेथेंचि पाहावें । कैसें तें येथेंचि शोधावें । सूक्ष्मांचीं चौदा नांवें । येथेंचि समजावीं ॥ २१ ॥ निर्गुण निर्विकारी येक । तें सर्वां ठाईं व्यापक । देहामध्यें तें निष्कळंक । आहे कीं नाहीं ॥ २२ ॥ मूळमाया संकल्परूप । अंतःकरणाचें स्वरूप । जड चेतवी चैतन्यरूप । तेंही शरीरीं आहे ॥ २३ ॥ समानगुण गुणसाम्य । सूक्ष्म विचार तो अगम्य । सूक्ष्म साधु जाणते प्रणम्य । तया समस्तांसी ॥ २४ ॥ द्विधा भासतें शरीर । वामांग दक्षिणांग विचार । तोचि अर्धनारीनटेश्वर । पिंडीं वोळखावा ॥ २५ ॥ तोचि प्रकृतिपुरुष जाणिजे । शिवशक्ती वोळखिजे । षड्गुणेश्वर बोलिजे । तया कर्दमासी ॥ २६ ॥ तयासीच्र म्हणिजे महत्तत्व । जेथें त्रिगुणाचें गूढत्व । अर्धमात्रा शुद्धसत्व ।

पावून देवाचा लाभ व्हावा यासाठीं अनेक उपाय करावे लागतात, तथापि निश्चयाचा उपाय हा कीं अध्यात्मश्रवणमार्गानें प्रत्यय घेत देव पावावा. असें न करितां लौकिकांत जे जे उपाय केले जातात त्यानें देव एकीकडे व शोध दुसरीकडे अशी चुकामूक होते, खरें आणि खोटें स्वच्छ ओळखलें पाहिजे. खोट्याच्या मार्गानें जाऊं नये, खोट्याची संगत धरूं नये, खोट्याचा संग्रह करूं नये. ' ब्रह्म सत्य ' हें खरें व त्यावेगळें मायिक सर्व खोटें. खोटें तें खोटेंच आहे त्याला खोटें म्हणून म्हणायचें काय ? खोटें (बालटें) खऱ्यापुढें कसा टिकाव धरील ? (कसें तगेल ?) सत्य ब्रह्म (खरा देव) पाहिजे तर मन जें अधोमुख म्ह० मायेकडे व मायिक जगाच्या पसाऱ्याकडे धांवत आहे तें – विवेकानें थोपवून – उलट ऊर्ध्वमुख करून उगमाकडे लावलें पाहिजे (१३–१७). अध्यात्मश्रवण करावें म्हणजे सर्व कांहीं कळतें. अनेक संशय नाहींसे होऊन जातात. सूत गुंतलें असलें म्हणजे तें जसें युक्तीनें सोडवितात तसें मन (विषयांतून) विवेकानें सोडवावें व मानत मानत त्याला मूळाकडे वळवावें. जडचंचळाचा काला होऊन सर्व कांहीं (पिंडब्रह्मांडरचना) झाली असून तेंच विभागशः सर्व शरिरांतून आलें आहे. जो कांहीं विचार करायचा तो येथेंच म्ह० नरदेहांतच करावा, शोधणें तें येथेंच शोधावें, सूक्ष्माचीं म्ह० मूळमायेचीं चौदा नांवें येथेंच विवरून पाहावीं. सर्वांवर जें निर्गुण निर्विकार परब्रह्म तें सर्वत्र संचलें आहे, तें आपल्या देहांतच निष्कलंक म्ह० तसेंच आहे नाहीं हें पाहावें म्ह. आहे हेंच समजून येईल (१८–२२). मूळमाया संकल्परूप आहे, आपल्या देहांत अंतःकरण हेंच तिचें रूप आहे, चैतन्य जडाला चेतवितें तेंही शरीरांतच आहे. समानगुण तेच येथें (देहांत) गुणसाम्यावस्थेंत आहेत ; तो सूक्ष्म विचार शब्दाला अगम्य आहे, तो जे जाणते साधु जाणतात त्या सर्वांना नम्रभावें वंदनच केलें पाहिजे. शरिरांत डावा व उजवा असे दोन भाग आहेत (एक आणीवरूप व वायुरूप), तोच पिंडांतला अर्धनारीनटेश्वर ओळखावा. तात्पर्य, चैतन्य, गुणसाम्य, अर्धनारीनटेश्वर, षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, शुद्धसत्व,

गुणक्षोभिणी ॥ २७ ॥ त्रिगुणें चालतें शरीर । प्रत्यक्ष दिसतो विचार । मूळींच्या कर्दमाचें शरीर । ऐसें जाणावें ॥ २८ ॥ मन माया आणि जीव । हाही दिसतो स्वभाव । चौदा नामांचा अभिप्राव । पिंडीं पाहावा ॥ २९ ॥ पिंड पडतां अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहतें । शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सूक्ष्मनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ धरूं जातां धरितां नये । टाकूं जातां टाकितां नये । जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ॥ १ ॥ जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें । सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्या ॥ २ ॥ बैसलें माणुस उठोन गेलें । तेथें आकाशचि राहिलें । आकाश चहूंकडे पाहिलें । तरी सन्मुखचि आहे ॥ ३ ॥ जिकडे प्राणी पळोन जातें । तिकडे आकाशचि भोंवतें । बळें आकाशाबाहेर तें । कैसें जावें ॥ ४ ॥ जिकडे जिकडे प्राणी पाहे । तिकडे तें सन्मुखचि आहे । समस्तांचे मस्तकीं राहे । माध्यानीं मार्तंड जैसा ॥ ५ ॥ परी तो आहे येकदेसी । दृष्टांत न घडे वस्तूसी । कांहीं येक चमत्कारासी । देउनी पाहिलें ॥ ६ ॥ नाना तीर्थें नाना देसीं । कष्टत जावें पाहावयासी । तैसें नलगे परब्रह्मासी । बैसले ठाईं ॥ ७ ॥ प्राणी बैसोनीच राहातां । अथवा बहुत पळोन जातां । परब्रह्म तें तत्वता । समागमें ॥ ८ ॥ पक्षी अंतराळीं गेला । भोंवतें आकाशचि तयाला । तैसें ब्रह्म प्राणियांला । व्यापून आहे ॥ ९ ॥ ब्रह्म पोकळ घनदाट । ब्रह्म सेवटाचा

गुणमाया, सत्व, रज, तम, मन, माया, अंतरात्मा हीं चौदा नामें त्या सूक्ष्म मूळमायेचीं आहेत. मूळमाया कर्दमरूप असून तिला हीं चौदा नांवें आहेत, अर्थात् शरीर याच कर्दमाचें आहे असें जाणावें. हा विचार पिंडांतच पाहावयाचा आहे. पिंड पडला[1] कीं सारें जातें, परब्रह्म एकटें राहतें. म्हणून तेंच शाश्वत आहे असा निश्चय करून त्या खऱ्या देवाला हृदयीं दृढ धरावें (२३-३०). [द० २०, स० ९]

परब्रह्म धरायला जातां धरवत नाहीं, टाकूं जातां टाकवत नाहीं, सर्वत्र आहेच आहे. जिकडे तिकडे आणि जेथें तेथें तें आहे. त्याकडे पाठ फिरविली तरी तें पुढेंच आहे, कांहीं केलें व कोठेंही गेलें तरी तें सन्मुखच ठाकतें. बसलेलें मनुष्य उठून गेलें तरी आकाश तेथें आहेच, तें कांहीं उठून जात नाहीं, कोठूनही पाहिलें तरी आकाश सन्मुखच आहे, जिकडे प्राणी पळून जातें तिकडे सभोंवार आकाशच असतें, हट्टानें आकाशाबाहेर कोण कसा जाऊं शकेल ? हट्टानें आकाशाबाहेर कोणाला कसें जाववेल ? प्राणी जिकडे पाहील तिकडे तें सन्मुख आहे, मध्यान्हसमयींच्या सूर्याप्रमाणें तें सर्वांच्या मस्तकीं आहे. पण सूर्याचा दृष्टांत एकदेशी आहे तो वस्तूला लागत नाहीं. मौजेसाठीं किंवा समजुतीसाठीं तो देऊन पाहिला इतकेंच. नाना देशांचीं नाना तीर्थें पाहायचीं असल्यास शरीरकष्ट घेऊन हिंडावें लागतें, तसें परब्रह्मास पाहावयासाठीं दूर जायला नको – तें बसावें त्या ठिकाणीं आहे. प्राणी बसून राहिला किंवा पळून गेला तरी ब्रह्म त्याच्या सांगातीं आहेच. पक्षी आकाशांत उडाला कीं त्याच्या सभोंवतें आकाशच असतें तसें ब्रह्म प्राणीमात्रांला व्यापून आहे (१–९). ब्रह्म पोकळ असून घनदाट

सेवट । ज्यासी त्यासी ब्रह्म नीट । सर्वकाळ ॥ १० ॥ दृश्यसबाह्यअंतरीं । ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं । अरे त्या विमळाची सरी । कोणास द्यावी ॥ ११ ॥ वैकुंठ-कैळासस्वर्गलोकीं । इंद्रलोकीं चौदा लोकीं । पन्नगादिकपाताळलोकीं । तेथेंहि आहे ॥ १२ ॥ कासीपासून रामेश्वर । अवघें दाटलें अपार । परता परता पारावार । त्यास नाहीं ॥ १३ ॥ परब्रह्म तें येकलें । येकदांचि सकळांस व्यापिलें । सकळांस स्पर्शोन राहिलें । सकळां ठाईं ॥ १४ ॥ परब्रह्म पाउसें भिजेना । अथवा चिखलानें भरेना । पुरामध्यें परी वाहेना । पुरासमागमें ॥ १५ ॥ येकसरें सन्मुख विन्मुख । वाम सव्य दोहींकडे येक । अधऊर्ध्व प्राणी सकळीक । व्यापून आहे ॥ १६ ॥ आकाशाचा डोहो भरला । कदापी नाहीं उचंबळला । असंभाव्य परसला । जिकडे तिकडे ॥ १७ ॥ येकजिनसी गगन उदास । जेथें नाहीं दृश्यभास । भासेंविण निराभास । परब्रह्म जाणावें ॥ १८ ॥ संतसाधुमहानुभावां । देवदानवमानवां । ब्रह्म सकळांसी विसांवा । विश्रांतिठाव ॥ १९ ॥ कोणेकडे सेवटा जावें । कोणेकडे काय पाहावें । असंभाव्य तें नेमावें । काय म्हणोनी ॥ २० ॥ स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कांहीं येकासारखें नव्हे । ज्ञानदृष्टीवीण नव्हे । समाधान ॥ २१ ॥ पिंडब्रह्मांडनिरास । मग तें ब्रह्म निराभास । येथून तेथवरी अवकाश । भकासरूप ॥ २२ ॥ ब्रह्म व्यापक हें तों खरें । दृश्य आहे तों हें उत्तरें । व्यापेंवीण कोण्याप्रकारें । व्यापक म्हणावें ॥ २३ ॥ ब्रह्मासी शब्दचि लागेना । कल्पना कल्पूं शकेना । कल्पनातीत निरंजना । विवेकें वोळखावें ॥ २४ ॥

आहे, ब्रह्म शेवटचा शेवट आहे, ब्रह्म प्रत्येक पदार्थाला सर्वकाळ सन्मुख आहे ब्रह्म ब्रह्मांडोदरीं किंबहुना सर्व दृश्याच्या आंतबाहेर भरलें आहे. अरे, या विमळ ब्रह्माची बरोबरी कोण करूं शकेल ? वैकुंठ, कैलास, स्वर्गलोक, इंद्रलोक, चतुर्दश भुवनें, पन्नगादि पाताळलोक, काशीपासून रामेश्वरापर्यंत – सर्वत्र घनदाट ब्रह्म अपार दाटलें आहे. त्याच्या पलीकडे, त्याच्या पलीकडे असें कितीही ' पलीकडे ' गेलां तरी त्याचा पारावार नाहीं, थांग लागत नाहीं, परब्रह्म एकलें आहे व एकदांच त्यानें सर्वांस व्यापिलें आहे, सर्वांस स्पर्शून सर्वत्र राहिलें आहे. परब्रह्म पावसानें भिजत नाहीं, चिखलानें (कर्दमानें, मायेच्या कर्दमानेंही) माखत नाहीं, पुरांत असून पुराबरोबर वाहवत नाहीं. तें निरंतर सन्मुख, विन्मुख, पाठमोरें, उजवें, डावें, वर, खालीं, ओतप्रोत भरलेलें आहे. आकाशाचा डोह भरला असून उचंबळत नाहीं, तर चहूंकडे पसरला आहे. आकाश उदास (अलिप्त) व एकजिनसी (एकमेवाद्वितीय) व दृश्यभासरहित असें निराभास असें कल्पिलें म्हणजे तेंच परब्रह्म आहे. मोठमोठे साधुसंत, देवदानव, मानव सर्वांना विसाव्याचें – विश्रांतिस्थान एक परब्रह्म आहे. त्याचा शेवट कोणीकडे आहे म्हणून म्हणावें ? कोणीकडे जावें, अमर्याद ब्रह्माची मर्यादा काय करावी ? तें स्थूल नव्हे, सूक्ष्म नव्हे, अमक्यासारखें आहे असें नव्हे, ज्ञानदृष्टीवांचून समाधान नाहीं (१०–२१). पिंडब्रह्मांडाचा म्ह० त्यांच्या अष्टदेहांचा निरास झाला कीं मग निराभास ब्रह्म – येथून तेथवर आकाशासारखेंच सर्व व्यापून आहे. ब्रह्म व्यापक आहे असें आपण म्हणतों, पण हें व्याप्य (दृश्य, जगत्) याच्या सापेक्षतेनें म्हणतों, वस्तुतः दृश्यच जर मिथ्या आहे म्ह० व्याप्यच जर नाहीं तर ब्रह्माला व्यापक तरी कसें म्हणावें ? ब्रह्माला शब्द पोंचत नाहीं – तें निःशब्द आहे त्याला कल्पना कल्पूं शकत नाहीं ; तें निर्विकल्प व निरंजन आहे – त्याला

शुद्ध सार श्रवण । शुद्ध प्रत्ययाचें मनन । विज्ञानीं पावतां उन्मन । सहजचि होतें ॥ २५ ॥ जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ । निर्गुणब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ २६ ॥ हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्वांचा । साध्य होतां साधनांचा । ठाव नाहीं ॥ २७ ॥ स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें । सहजचि अनिर्वाच्य जालें । बोलतां नये ॥ २८ ॥ ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसी बाणावें । जन्ममृत्यूंच्या नांवें । शून्याकार ॥ २९ ॥ भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें । समर्थ-कृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥ ३० ॥ वीसदशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध । मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ ३१ ॥ वीस दशक दोनशें समास । साधकें पाहावे सावकास । विवरतां विशेषविशेष । कळों लागे ॥ ३२ ॥ ग्रंथाचें करावें स्तवन । स्तवनाचें काय प्रयोजन । येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पाहावा ॥ ३३ ॥ देहे तव पाचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा । आणी कवित्वप्रकार मनुष्याचा । कशावरुनी ॥ ३४ ॥ सकळ करणें जगदीशाचें । आणी कवित्वचि काय मनुष्याचें । ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ॥ ३५ ॥ सकळ देहाचा झाडा केला । तत्वसमुदाय उडाला ।

विवेकानेंच ओळखलें पाहिजे. शुद्ध (विमल) सार (ब्रह्म) त्याचें श्रवण केलें व श्रवणाचें मनन करीत करीत प्रत्यय आला म्हणजे विज्ञान (साक्षात्कार) होऊन उन्मन सहजच होतें (२२–२५).

उपसंहार —(ओंवी २६ पासून शेवटपर्यंतच्या बारा ओंव्या नित्यनियमाचें रोजचें दोन किंवा अधिक समासांचें वाचन झाल्यावर म्हणण्याचा परिपाठ सांप्रदायिक लोकांत आहे. हें झाल्यावर आरती होत असते). साधनाचें (श्रवणापासून आत्मनिवेदनांपर्यंत नवविधा भक्ति केली तिचें) फळ प्राप्त झालें, संसार सफळ झाला म्ह० नरदेह मिळाल्याचें सार्थक होऊन जन्ममरणबंध सुटला, निश्चळ निर्गुण ब्रह्म अंतरीं ठसावलें, मायेचा हिशेब झाला, तत्त्वांचा निवाडा झाला (पंचीकरण व तत्त्वविचार झाला), साध्य (ब्रह्मरूप) होतांच साधनें मावळलीं (साध्य मिळवून दिल्यावर साधनें सफळ झाल्यामुळें आपोआप राहिलीं). अज्ञानस्वप्नांत जें जें पाहिलें होतें तें तें स्वरूपजागृतीनें उडून गेलें. सहजच अनिर्वाच्य समाधान झालें तें शब्दांनीं सांगवत नाहीं. ऐसें हें विवेकानें जाणावें व प्रत्ययानें निजखुणेस पावावें. आतां जन्ममरण खुंटलें. भक्तांचा अभिमान धरून म्ह० भक्तांच्या उद्धाराची कळकळ बाळगून दाशरथी रामानें कृपा केली म्हणून श्रीसमर्थरामाच्या कृपेचीं वचनें एकत्र ग्रथित होऊन हा श्रीदासबोधग्रंथ तयार झाला. दासबोधाचीं दशकें वीस आहेत. याच्या श्रवणानें आपला शोध घेतां मनन करणाऱ्यास परमार्थ उमडा होतो. वीस दशकांचे मिळून दोनशें समास आहेत. हे साधकानें सावकाश म्ह० सावधपणानें व संथपणानें वाचावेत. यांचें जसजसें मनन होईल तसतसा हा अधिकाधिक कळत आईल. ग्रंथाचें स्तवन करावें, पण स्तवनाचें कारणच काय आहे ? वाचकांना आत्मप्रत्यय येणें हें मुख्य आहे, तो आला म्हणजे झालें (हेंच त्याचें स्तवन होय), देह हा पंचभूतांचा आहे व त्यांत सर्व कर्तृत्व आत्मारामाचें आहे, आणि हें कवित्व (ग्रंथकर्तृत्व) मात्र मनुष्याचें हें कशावरून म्हणावें ! सर्व करणें जगदीशाचें (अंतरात्म्याचें) आहे, आणि कवित्व तेवढें मनुष्याचें हें बोलणें अप्रमाण आहे, हें बोलण्याचें काय कारण ? सर्व देहांचा (अष्टदेहांचा) झाडा झाला, तत्त्वांचा निवाडा होऊन तत्त्वें उडालीं

तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ॥ ३६ ॥ ऐसीं हीं विचाराचीं कामें । उगेंच भ्रमों नये भ्रमें । जगदीश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ॥ ३७ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

॥ श्रीरामचन्द्रार्पणमस्तु ॥

मग कोणत्या पदार्थाला ' मी किंवा माझें ' म्हणावें ? अशीं हीं विचाराचीं कामें आहेत, उगाच भलत्या भ्रमांत पडूं नये, सर्व कांहीं यथाक्रम जगदीशानें केलें आहे. (२६–३७). [द० २०, स० १०]

॥ समाप्त ॥

॥ श्री ॥

आरती श्रीदासबोधाची

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला ।
श्रुति शास्त्रग्रंथ गीता साक्ष संगम केला ।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला ।
अज्ञान जड जीवां मार्ग सुगम जाला ॥ १ ॥

जय देवा दासबोधा ग्रंथराज प्रसिद्धा ।
आरती वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा ॥ ध्रु० ॥

नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी ।
चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी ।
बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी ॥ २ ॥

वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे ।
नित्यनेमें विवरितां स्वयें ब्रह्मचि होये ।
अपार पुण्यगांठीं तरी श्रवण लाहे ।
कल्याणलेखकाचें भावगर्भ हृदयीं ॥ ३ ॥

आरती श्रीसमर्थांची

आरती रामदासा । सद्गुरु सर्वेशा ।
कायावाचामनोभावें । वोवाळूं परमेशा ॥ १ ॥

रामदास मूर्तिमंत । रामचंद्रअवतार ।
कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥ २ ॥

वैराग्य भक्ति ज्ञान । शांति क्षमा विरक्ती ।
विवेक सालंकृत । क्षमा दया सर्व भूतीं ॥ ३ ॥

सच्चिदानंदघन । रामदास केवळ ।
दिनकरकृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥